म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३७५५

एमिल बर्न्स


REFBK-0024929

मार्क्सवाद म्हणजे काय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

1987

(कृ. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ निबंध
3744
२४८२९
८२८४८६

मार्क्सवाद म्हणजे काय ?

REFBK-0024929

लेखक : एमिल बर्न्स
अनुवादिका : सरला कारखानीस


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
3744
दा. क. २४८२९
संदर्भ निबंध २८४८६

साहित्यमय गृह प्रा. लि., मुंबई-४०० ०२५.

म / ३१८

प्रथम प्रकाशन / १९६०
सुधारित दुसरी आवृत्ती / १९७२
तृतीयावृत्ती / १९७८
चौथी आवृत्ती / १९८३

मूल्य । पाच रुपये



मुद्रक ।
आर. जी. देसाई,
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
८५, सयानी रोड,
मुंबई ४०० ०२५.

प्रकाशक ।
आर. जी. देसाई,
लोकवाङ्मय गृह प्रा. लि.,
भुपेश गुप्ता भवन,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

चार शब्द।

'मार्क्सवाद म्हणजे काय?' हे पुस्तक मार्क्सवादी अभ्यास शिबीरासाठी व मार्क्सवादाकडे आकृष्ट झालेल्या तरुणांसाठी पाठ्य-पुस्तक म्हणून विख्यात आहे.

एमिल बर्न्स ह्या प्रख्यात मार्क्सवादी विचारवंताच्या मूळ 'WHAT IS MARXISM' चा हा अधिक अचूक अनुवाद दुसऱ्या मराठी अनुवादाच्या फरकासह असून त्याची ही चौथी आवृत्ती नव्या कार्यकर्त्यांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे.

'WHAT IS MARXISM' ह्या नव्या पुस्तकाच्या इंग्रजी आवृत्तीला अनुसरून या आवृत्तीत काही फरक केले आहेत. अनुवादातही किरकोळ बदल केले आहेत.

मूळ पुस्तकात नसलेला असा आणखी एक फरक आम्ही आमच्या जबाबदारीवर केला आहे, तो म्हणजे पोट-शीर्षके घालणे. मुळात पोट-शीर्षके नाहीत, परंतु पोट-शीर्षके घातल्याने विषयाची मांडणी अधिक सुबोध होईल असा विचार करून आम्ही पोट-शीर्षके घातली आहेत. पाठ्य-पुस्तक म्हणून अभ्यासूना त्याचा उपयोग होईल अशी आशा आहे.

मुंबई, मे १९८३

प्रकाशक

अनुक्रमणिका

	पान
१. जगावेगळचा शास्त्रीय दृष्टिकोन	१
२. समाजविकासाचे नियम	३
३. भांडवलशाहीचा समाज	१६
४. साम्राज्यशाही-भांडवलशाहीची अंतिम अवस्था	२९
५. वर्गसंघर्ष आणि राजसत्ता	४०
६. समाजवादी समाज	५३
७. निसर्गसंबंधी मार्क्सवादी दृष्टिकोन	६८
८. कृतीला मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान	७९

कार्यालय


मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दा. क. ३१५५

२

समाजविकासाचे नियम

मानवजातीचा इतिहास म्हणजे जणू काही राष्ट्रा-राष्ट्रांमधील युद्धांची आणि राजे, सेनापती व मुत्सद्दी यांच्या पराक्रमांची यादीच आहे असे भासविण्यात येते. या व्यक्तींच्या कृतींच्या मागच्या प्रेरणा जणू काही शुद्ध व्यक्तिगत होत्या असे कधीकधी सांगितले जाते.—त्यांनी देश का जिंकले तर ते महत्त्वाकांक्षी होते म्हणून; त्यांनी अमुकच धोरणे का स्वीकारली तर त्यांची नैतिक वा अनैतिक दृष्टीच तशी होती म्हणून. कधी कधी असेही सांगितले जाते की त्यांनी जे काही केले ते देशाच्या सन्मानासाठी, देशाच्या प्रतिष्ठेसाठी देशभक्तीने प्रेरित होऊन केले किंवा धर्मभावनेने प्रेरित होऊन केले.

इतिहाससंबंधीच्या अशा दृष्टिकोनाने मार्क्सवादाचे समाधान होत नाही.

सर्वप्रथम मार्क्सवादाचे हे म्हणणे आहे की, इतिहासाच्या खऱ्या शास्त्राने जनतेचा–जनसमुदायांचा–विचार केला पाहिजे; व्यक्तींचाच विचार करायचा तर तो जेव्हा व्यक्ती स्वतःपेक्षा फारच मोठ्या घटनेचे–उदाहरणार्थ, जनतेच्या एखाद्या चळवळीचे– प्रतिनिधित्व करतात तेवढ्यापुरताच केला पाहिजे.

स्पष्टीकरणासाठी इंग्लंडच्या इतिहासातील क्रॉमवेलचे उदाहरण घेऊ या. मार्क्सवादाच्या दृष्टीने क्रॉमवेलला जे महत्त्व आहे ते त्याच्या वैयक्तिक दृष्टिकोनामुळे अगर कृतीमुळे नाही; तर इंग्लिश लोकांच्या एका विभागाने केलेल्या चळवळीत त्याने बजाविलेल्या कामगिरीमुळेच आहे. त्याने व त्याच्या पुढाकाराखालील चळवळीने सरंजामशाहीचे कोट पाडले आणि ब्रिटनमध्ये भांडवलशाहीच्या विस्तृत विकासाचा मार्ग मोकळा केला. त्याने केलेल्या युद्धांची जंत्री, त्याचा धार्मिक दृष्टिकोन अगर त्याने रचलेली कारस्थाने महत्त्वाची नाहीत. ब्रिटनमधील उत्पादनाच्या व वाटपाच्या विकासातील त्याच्या कार्याचा अभ्यास, सरंजामशाही राजेशाहीविरुद्ध तेव्हाच व ब्रिटनमध्येच लढा का निर्माण झाला याचे ज्ञान, त्यावेळी प्रत्यक्षपणे घडून

आलेल्या बदलांचा अभ्यास--यांना महत्त्व आहे, इतिहासाच्या शास्त्राचा हाच आधार आहे. अशा अभ्यासातून (आणि इतर देशांच्या व कालखंडांच्या अभ्यासातून) प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग करून सामान्य सिद्धांतांची--म्हणजे समाजाच्या विकासाच्या नियमांची मांडणी करता येते; रसायन-शास्त्राच्या अगर इतर कोणत्याही शास्त्राच्या नियमांइतकेच हे नियम सत्य असतात. आणि एकदा ते आपल्याला माहीत झाले की, कोणत्याही शास्त्रीय नियमांचा जसा आपण उपयोग करतो तसा या नियमांचा उपयोग करून जे पुढे घडण्याची शक्यता आहे त्याचे भविष्य तर आपण वर्तवू शकतोच, पण ते निश्चितपणाने घडावे म्हणून कार्यही करू शकतो.

वर्ग आणि वर्गलढा

तेव्हा, सर्व मानवी इतिहासामधून धावणाऱ्या नैसर्गिक नियमांच्या धाग्याचा माग काढण्यासाठी मार्क्सवाद इतिहासाच्या अभ्यासाकडे वळतो आणि त्यासाठी तो समाजाकडे लक्ष देतो, व्यक्तींच्याकडे देत नाही. अशा रीतीने केलेल्या निरीक्षणात त्याला आढळून येते की, (आदिम साम्यवादी समाज-व्यवस्थेच्या नंतरच्या अवस्थांतील) समाजात निरनिराळे विभाग असतात; त्यातील काही समाजाला एका दिशेने ओढीत असतात, काही दुसऱ्या दिशेने —व्यक्तिशः नव्हे, वर्ग म्हणून.

हे वर्ग म्हणजे काय? सोप्या शब्दांत सांगायचे म्हणजे एकाच पद्धतीने उपजीविका चालविणारे समाजाचे विभाग म्हणजे वर्ग. सरंजामदारी समाजात राजा आणि सरंजामदारी सरदार "भूदासां" कडून कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारचे कर (प्रत्यक्ष सेवाचाकरी अगर वस्तूंच्या रूपात) वसूल करून उपजीविका करीत असत; हे भूदास मुख्यतः शेतावर काम करून, प्रत्यक्ष उत्पादनाचे काम करीत असत. म्हणजे त्या समाजात, सरंजामदारी सरदार हा एक वर्ग होता; या सरंजामी सरदारांचे, वर्ग या नात्याने हितसंबंध होते—भूदासांच्या श्रमातून जास्तीत जास्त उकळण्याची ते सर्वच इच्छा धरीत; स्वतःची जमीन व त्यावर काम करणारे भूदास यांत भर पडावी असे त्या सर्वांना वाटत असे. उलट पक्षी भूदास हाही वर्ग होता; भूदासांचेही वर्गीय हितसंबंध होते. आपण निर्माण केलेल्या उत्पादनातील मोठा हिस्सा मालकाला देण्या-ऐवजी स्वतःसाठी व स्वतःच्या कुटुंबासाठी ठेवावा, असे त्यांना वाटत असे;

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
दि. दा. क्र. ३७५५
वर्ग २३.८२९
१८४८

जगाबद्दलचा शास्त्रीय दृष्टिकोन

मार्क्सवाद ही एक सैद्धांतिक विचारधारा आहे; आपण राहतो या जगाबद्दलची आणि या जगाचा भाग असलेल्या मानवी समाजाबद्दलची सर्वसाधारण सैद्धांतिक विचारसरणी आहे. गेल्या शतकाच्या मध्य व उत्तर भागात, कार्ल मार्क्सने (१८१८–१८८३) फ्रेंडरिक एंगल्सच्या (१८२०–१८९५) मदतीने तिची मांडणी केली; म्हणून ती मार्क्सच्या नावाने ओळखली जाते.

मानवी समाज आज आहे अशाच का आहे, तो का बदलतो आणि भविष्यकाळात मानवजातीला आणखी कोणते बदल पाहावयास मिळणार आहेत या प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी केलेल्या अभ्यासातून ते अशा निष्कर्षाला येऊन पोहोचले की, बाह्य निसर्गातील बदलांप्रमाणेच हेही बदल काही विशिष्ट नियमांनुसार घडतात; योगायोगाने घडत नाहीत; आणि म्हणून, मानवाच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेली अशी समाजाबद्दलची शास्त्रीय सैद्धांतिक विचारधारा शोधून काढणे शक्य आहे. ही विचारधारा, धर्मश्रद्धा, वंशप्रेम व वीरपूजा, व्यक्तिगत कल अगर मनोराज्यवादी स्वप्ने यांच्यावर आधारलेल्या समाजाबद्दलच्या ज्या कल्पना जगापुढे मांडल्या जात असत (आणि अजूनही जातात) त्यांच्या अगदी विरुद्ध असेल.

हा सर्वसाधारण विचार मार्क्सने तो ज्या समाजात राहत होता त्याला– आणि मुख्यतः भांडवलदारी ब्रिटनला–लागू केला, आणि भांडवलशाहीच्या आर्थिक सिद्धांताची मांडणी केली. या सिद्धांताबद्दलच मार्क्सची विशेष प्रसिद्धी आहे. तरीसुद्धा, त्याचे नेहमीच आग्रहपूर्वक सांगणे असे की, त्याच्या आर्थिक सिद्धांतापासून त्याच्या ऐतिहासिक व सामाजिक सिद्धांतांना निराळे काढता येणार नाही. काही एका मर्यादेपर्यंतच वेतन व नफा यांचा केवळ आर्थिक प्रश्न म्हणून विचार करता येतो; परंतु ज्यांना प्रत्यक्ष जीवनाचा अभ्यास

करावयाचा आहे, केवळ अमूर्त कल्पनांचा नाही, अशा विद्यार्थ्यांना लवकरच समजून येते की, मालक व कामगार यांचा विचार केला तरच वेतन व नफा यांचे संपूर्ण आकलन होऊ शकते. तसेच मालक व कामगार यांचा विचार करताना समाजाच्या ज्या इतिहासदत्त अवस्थेत ते राहतात तिचाही अभ्यास करावा लागतो.

समाजविकासासंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोन

इतर सर्व शास्त्रांप्रमाणेच, समाजाच्या विकासासंबंधीचा शास्त्रीय दृष्टिकोनही अनुभवावर आणि इतिहासाच्या व आपल्या सभोवतालच्या जगाच्या वास्तव सत्यावर आधारलेला आहे. म्हणून मार्क्सवाद हा परिपूर्ण झालेला अगर पूर्णपणे तयार करण्यात आलेला सिद्धांत नाही. इतिहासाची दालने उघडली जातात, माणसाचे अनुभव वाढत जातात, त्याबरोबर मार्क्सवादाचा सतत विकास होत जातो आणि उजेडात आलेल्या नव्या वास्तव सत्यांना तो लागू केला जातो. अशा विकासात भर घालण्याचे सर्वांत महत्त्वाचे कार्य मार्क्स व एंगल्स यांच्या मृत्यूनंतर लेनिनने (१८७०–१९२४) केले.

समाजाचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून केल्यामुळे ज्ञान प्राप्त होते, आणि ज्याप्रमाणे शास्त्रीय ज्ञान बाह्य जग बदलण्यासाठी वापरता येते, त्याचप्रमाणे हे ज्ञान समाज बदलण्यासाठी वापरता येते. परंतु त्यावरून हेही सिद्ध होते की, समाजाच्या गतीचे नियंत्रण करणारे नियम आणि बाह्य जगाला लागू होणारे नियम एकाच प्रकारचे आहेत. मानव व सर्व चराचर वस्तू यांना सार्वत्रिक रीतीने लागू होणारे हे नियम म्हणजेच मार्क्सवादी तत्त्वज्ञान अगर जगासंबंधीचा मार्क्सवादी दृष्टिकोन होय.

पुढील प्रकरणात, आज ज्यांच्याबद्दल विशेष जिज्ञासा आहे अशा विषयांसंबंधीचे मार्क्सवादी सिद्धांत दिले आहेत. परंतु विद्यार्थ्यांनी प्रथमपासूनच लक्षात ठेवावे की, मार्क्सवादाला मान्यता प्राप्त झाली ती तो सत्य आहे म्हणून; जीवनाशी संबंध नसलेल्या अमूर्त नैतिक कल्पनांच्या आधारावर त्याने मान्यता मिळविलेली नाही. आणि तो सत्य आहे म्हणूनच, आजच्या जगात अनेकांना जी दुःखे व यातना सहन कराव्या लागतात त्यांतून मानवजातीला कायमचे मुक्त करण्यासाठी, आणि अधिक उच्च प्रकारच्या समाजात स्वतःचा पूर्ण विकास करून घेता यावा म्हणून सर्व स्त्री पुरुषांना मदत करण्यासाठी, मार्क्सवादाचा उपयोग करता येईल आणि तसा तो केला पाहिजे.

राजा व जुने जमीनदारी सरदार यांना हे सर्व करता येई; कारण त्यांचे राज्ययंत्रणेवर– म्हणजे सैन्य, न्यायाधीश व तुरुंग यांच्यावर–नियंत्रण होते; आणि कायदेही तेच करीत असत. आणि म्हणून, भांडवलदारवर्गाच्या वाढीबरोबर वर्गलढ्यांचे नवे प्रकारही वाढले. राजेशाही व सरंजामदारी जमीनदार यांच्याविरुद्ध भांडवलदारांना लढा करावा लागला; हा लढा अनेक शतकांपर्यंत चालू राहिला. तुलनात्मक दृष्टीने मागासलेल्या देशांत अजूनही तो चालू आहे; परंतु काही देशांत, उदाहरणार्थ, ब्रिटन व फ्रान्समध्ये, तो पूर्ण झाला आहे.

हे कसे घडून आले ?

भांडवलदारवर्गाने सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने पूर्वीच्या सरंजामदारी राज्यकर्त्यांच्या हातांतून सत्ता काढून घेतली तेव्हा ह्या लढ्याचा शेवट झाला. इतर देशांच्या मानाने ब्रिटनमध्ये ही परिस्थिती फार लवकर परिपक्व झाली; तेथे उगवत्या भांडवलदारवर्गाने चालविलेल्या करविरोधी व व्यापारावरील बंधनाविरुद्धच्या संघर्षाने आपला उत्कर्ष बिंदू १७ व्या शतकाच्या मध्यावर गाठला. या बंधनांमुळे भांडवलदारी पद्धतीच्या उत्पादनात अडथळे येत होते. ही बंधने शांततेच्या मार्गाने दूर करण्याचे भांडवलदारवर्गाने प्रयत्न केले– त्यांनी राजाकडे अर्ज-विनंत्या केल्या, कर देण्यास नकार दिला, परंतु या मार्गाने राज्ययंत्रणेविरुद्ध त्यांना म्हणण्यासारखे विजय मिळविता आले नाहीत. तेव्हा त्यांना शस्त्रांचा सामना शस्त्रांनीच करावा लागला; राजाविरुद्ध, अनियंत्रित करांविरुद्ध, व्यापारावरील बंधनांविरुद्ध, आणि सरंजामदारी पाश तोडण्याचे प्रयत्न करणाऱ्यांवर राज्याच्या न्यायाधीशांनी लादलेल्या दंडाविरुद्ध, व कारावासाविरुद्ध त्यांनी जनतेचा उठाव घडवून आणला. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, भांडवलदारांना सशस्त्र क्रांती घडवून आणावी लागली, राजाविरुद्ध व पिळवणुकीच्या जुन्या पद्धतींविरुद्ध सशस्त्र लढा करण्यासाठी त्यांना जनतेच्या अग्रभागी राहावे लागले–आधीच्या राज्यकर्त्यांचा लष्करी साधनांनी पराभव करावा लागला. इतके सर्व केल्यानंतरच, भांडवलदारवर्गाला सत्ताधारीवर्ग होता आले, भांडवलशाही विकासाच्या आड येणारे सर्व अडथळे दूर करता आले आणि त्यासाठी लागणारे कायदे करता आले.

बहुतेक सर्व इतिहासाच्या पुस्तकांतून इंग्लंडमधील या भांडवलदारी क्रांतीचे वर्णन, रोमन कॅथालिक धार्मिक वृत्तीचा, हुकूमशहा व कारस्थानी राजा पहिला चार्लस याच्या विरुद्ध झालेली लढाई, असे केले जाते आणि ही लढाई लढणारा क्रॉमवेल हा एक अत्यंत माननीय कॅथॉलिक-विरोधक व ब्रिटिश स्वातंत्र्याची उच्च ध्येये जतन करणारा होता, असे सांगण्यात येते, हे अगदी खरे आहे. थोडक्यात म्हणजे तो एक नैतिक व धार्मिक लढा होता, असे भासविण्यात येते. परंतु, मार्क्सवाद व्यक्तींचाच विचार करीत नाही, त्यांच्या पलिकडचे पाहतो; इतकेच नव्हे तर लढ्याच्या घोषणांच्याही पलिकडचे पाहतो. जुन्या सरंजामदारी राज्यकर्त्यांच्या हातातून सत्ता काढून घेण्यासाठी उगवत्या भांडवलदारवर्गाने केलेला संघर्ष हे त्या लढ्याचे मर्म मार्क्सवाद ओळखतो आणि खरोखरीच इतिहासाला नवे वळण देणारा, असा तो संघर्ष होता; या क्रांतीनंतर आणि १६८९ मध्ये तिची पुढची पायरी ओलांडल्यानंतर इंग्लंडच्या भांडवलदारवर्गाने राज्यसत्तेत महत्त्वाची भागीदारी मिळविली.

वर्गसंघर्ष : समाज विकासाची मुख्य प्रेरक शक्ती

इंग्लंडमध्ये भांडवलदारी क्रांती फार सुरुवातीच्या अवस्थेत झाल्यामुळे भांडवलदारांना निर्णायक व संपूर्ण विजय मिळाला नाही. याचा परिणाम असा झाला की, जुने भांडवलदारी संबंध बव्हंशी नष्ट केले गेले तरी, जमीन-मालकांचा वर्ग (नगरातील नवीन भरती झालेल्या श्रीमंतांसहित) बऱ्याच मर्यादेपर्यंत जीवंत राहिला आणि त्याचेच पुढे भांडवलदारी जमीनदारांत पर्यवसान झाले; पुढील दोन शतकांत त्यांचा पैसेवाल्यांच्या हितसंबंधांशी मिलाफ झाला आणि राज्यसत्तेच्या नियंत्रणात त्यांनी मोठी भागीदारी मिळविली.

परंतु फ्रान्समध्ये या सर्व घडामोडी नंतरच्या काळात झाल्या; तिथे इ. स. १७८९ पर्यंत भांडवलदारी क्रांती घडून आली नाही आणि ती घडली तेव्हा तिने फार मोठ्या प्रमाणावर दूरगामी बदल घडवून आणले. परंतु मार्क्सवादी विचारांप्रमाणे याचे कारण, रूसोप्रभृति विचारवंतांनी मानवाचे हक्क जाहीर करणारी पुस्तके लिहिली, अगर त्या क्रांतीची लोकप्रिय घोषणा "स्वातंत्र्य-समता-बंधुत्व" ही होती, हे नाही. ज्याप्रमाणे क्रॉमवेलच्या क्रांतीचे मर्म वर्ग-संघर्षात आहे, त्याच्या धार्मिक घोषणांत नाही, त्याचप्रमाणे फ्रेंच-क्रांतीचे मर्म वर्गसंबंधांत आहे—तिच्या निशाणावर लिहिलेल्या अमूर्त नीतितत्त्वात नाही.

त्यांना काम स्वतःसाठी करण्याचे स्वातंत्र्य पाहिजे होते; मालकाकडून होणाऱ्या कठोर जाचातून त्यांना स्वतःची सुटका करून घ्यावयाची होती आणि त्यांना जाच करणारे कायदे करणारे कोण, तर ते हे मालकच; न्यायनिवाडा करणारेही तेच! भूदासांची परिस्थिती व भावना व्यक्त करताना एका इंग्लिश लेखकाने त्यांचे त्यांच्याच शब्दांत पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे; भूदास म्हणतो : "मी खूप कष्ट करतो, पहाटे बैल घेऊन शेतावर जातो आणि बैल जुंपून तावडतोब कामाला लागतो. हिवाळा कितीही कडक असला, बर्फ पडत असले, तरी मालकाच्या धास्तीमुळे मला घरी राहण्याचा धीर होत नाही. दररोज एक एकरापेक्षा अधिक जमीन मला नांगरावीच लागते."

भांडवलशाहीतील नवे वर्ग

अशा परिस्थितीमुळे प्रत्येक सरंजामदारी राष्ट्रात भूस्वामी व भूदास यांच्यात सतत संघर्ष चालू असे; कधी कधी हा संघर्ष व्यक्तिगत असे, तर कधी कधी भूदासांचा एखादा गट त्यांच्या मालकाविरुद्ध उठाव करीत असे; कधी कधी संघर्ष फारच मोठ्या प्रमाणावर होई आणि जीवनाची स्थिती सुधारण्यासाठी खूप मोठ्या संख्येने भूदास बंड करीत. १३८१ साली इंग्लंडमध्ये जॉन बॉल व वॅट टायलर यांच्या पुढाकाराखाली झालेले बंड अशाच प्रकारचे होते. जर्मनी, रशिया व इतरही अनेक देशांतून अशाच तऱ्हेची भूदासांची अगर शेतकऱ्यांची बंडे झाली होती आणि लहान प्रमाणावरचे संघर्ष तर सतत चालूच होते.

भूदासांना त्यांच्या स्वामीच्या शेतावर काम सक्तीने करावे लागत असे. याशिवाय इतरही नाना प्रकारचे कर वस्तूंच्या रूपाने द्यावे लागत—त्यांच्या शेतावरील धान्यातील हिस्सा तर त्यांना द्यावा लागत असेच, शिवाय वर त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी तयार केलेल्या हस्तकारागिरीच्या वस्तूही द्याव्या लागत. या समाजात आणखी काही खास उत्पादक होते–उदाहरणार्थ, शस्त्रे व उत्पादनाची साधने तयार करणारे कारागीर आणि व्यापारी; हे व्यापारी वरकड माल विकत घेत असत आणि इतर प्रदेशांतील व देशांतील मालाबरोबर त्यांचा व्यापार करीत. व्यापार पुढे वाढत गेला आणि मालकांची गरज भागवून भूदासांजवळ जो वरकड माल शिल्लक राही त्या मालापेक्षाही अधिक उत्पादनाची गरज व्यापाऱ्यांना भासू लागली. आणि म्हणून मग

यांनी बाजारात विकण्यासाठी वस्तूंचे उत्पादन संघटित करण्यास प्रारंभ केला; त्यासाठी त्यांनी सरंजामदारी मालकांच्या पाशातून मुक्त झालेल्या अगर पळून आलेल्या भूदासांना पूर्ण वेळ कामाला ठेवले. स्वतंत्र झालेल्या काही भूदासांनी नगरांतून बस्तान बसविले आणि ते कापड, धातूंची भांडी व इतर वस्तू तयार करणारे स्वतंत्र कारागीर बनले. अशा रीतीने, हळूहळू, शेकडो वर्षांच्या कालखंडात स्वतंत्र कारागीर, व मजुरी देऊन काम करून घेणारे मालक, बाजारात विक्रीसाठी उत्पादन करू लागले; स्थानिक उपयोगासाठी निर्माण होणाऱ्या सरंजामदारी उत्पादनाच्या गाभ्यातच हे उत्पादन अस्तित्वात आले. कालावधीनंतर, स्वतंत्र कारागीरही कामगारांना कामावर ठेवणारे मालक बनले आणि रोजमजुरीसाठी काम करणारे "शिकाऊ कामगार" (ज्यांना त्या काळी "जर्नीमेन" म्हणत असत) त्यांच्याकडे खपू लागले. अशा रीतीने १६ व्या शतकापासून एक नवा वर्ग अस्तित्वात येऊ लागला— औद्योगिक भांडवलदारांचा वर्ग आणि त्याच्या जोडीला "सावलीप्रमाणे" औद्योगिक कामगारवर्गही अस्तित्वात येऊ लागला होता. ग्रामीण विभागांतही जुनी सरंजामदारी बंधने तुटली; सक्तीच्या वेठबिगारीच्या जागी कर आले; अनेक भूदासांचे परिवर्तन आपापल्या शेतांवर काम करणाऱ्या स्वतंत्र शेतकऱ्यांत झाले, आणि स्वतःच्या शेतांवर लागणाऱ्या श्रमशक्तीसाठी जमीनमालक मजुरी देऊ लागले. याच पद्धतीने, रोजमजुरी करणाऱ्या शेतमजुरांच्या जोडीला भांडवलदारी शेतकरी जन्माला आला.

परंतु नगरांत व खेड्यांत भांडवलदारीवर्गाची वाढ झाली म्हणून सरंजामदारी सरदारांचा पहिला राज्यकर्तावर्ग आपोआप नष्ट झाला नाही. उलट, राजेशाही, जुनी जमीनदारी सरदारशाही व चर्च यांनी नव्या भांडवलशाहीचा स्वतःच्या हितासाठी वापर करण्याची पराकाष्ठा केली. स्वतंत्र झालेले अगर नगरांत पळून आलेले भूदास मालकांना सरंजामदारी कर (वेठबिगार, वस्तू अगर पैसे) देण्याच्या कटकटीतूनही मुक्त झाले होते. परंतु या भूदासांचे वंशज जेव्हा पुढे काहीसे धनवान झाले तेव्हा त्यांना आढळून आले की खरोखरी ते स्वतंत्र नव्हते—राजा व सरंजामदारी सरदार त्यांच्याकडून अनेक प्रकारचे कर वसूल करीत असत, त्यांच्या व्यापारावर बंधने घालीत आणि त्यांच्या कारागिरी उत्पादनाच्या मुक्त विकासात अडथळे आणीत.

पणेच तात्त्विक संघर्ष चालू असत, अस्तित्वात असलेल्या संस्थाविरुद्ध बंड उभारले जाई.

भांडवलदारी पद्धतीचे उत्पादन प्रत्यक्षपणे सुरू होताच सरंजामदारी संबंधाविरुद्ध संघर्ष निर्माण झाला; कारण या नव्या उत्पादन पद्धतीत भांडवलाला व्यवहारात अग्रस्थान मिळवायचे होते. म्हणून मग नव्या, विरोधी तत्त्वांचा उदय झाला. राजाच्या "दैवी" हक्कांचे तत्त्व जाऊन त्याच्या जागी, "प्रतिनिधित्व नाही, तर कर नाही" हे तत्त्व आले; व्यापारस्वातंत्र्याचा हक्क मागण्यात येऊ लागला आणि अधिक वैयक्तिक हक्कांचा पाठपुरावा करणाऱ्या व मध्यवर्ती नियंत्रणाला विरोध करणाऱ्या धार्मिक कल्पना पुढे आल्या. या अमूर्त तत्त्वांसाठी व धार्मिक भावनांसाठी स्वतंत्र व्यक्ती मरण पत्करीत होत्या अशा स्वरूपात पुढे आलेली ही घटना म्हणजे वास्तवात उगवती भांडवलशाही व मावळती सरंजामशाही यांच्यातील संघर्ष होता; त्यातील तात्त्विक संघर्ष दुय्यम होता.

आणि याच कारणासाठी मार्क्सवादी विचारांचे लोक समाजाच्या संघटनेसाठी अमूर्त "तत्त्वे" पुढे मांडीत नाहीत; मनोराज्यवादी लोकच ते मांडतात. मार्क्सवादाचे म्हणणे आहे की, मानवी विचारांत पुढे आलेली अशी सर्व "तत्त्वे" म्हणजे विशिष्ट काळी व विशिष्ट जागी प्रत्यक्षपणे अस्तित्वात असलेल्या समाज-संघटनेचीच प्रतिबिंबे असतात आणि म्हणून ती सर्वकाळी व सर्वजागी लागू होत नाहीत व होऊ शकणार नाहीत. शिवाय जी तत्त्वे अक्षय्य वाटतात, त्याचा अर्थही समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांत एकच नसतो. उदाहरणार्थ, मानवाच्या समानतेचे तत्त्व घ्या. ग्रीक नगरराज्यांत समान हक्कांचे तत्त्व गुलामांना लागू नव्हते. महान फ्रेंच क्रांतीतील "स्वतंत्र्य-समता बंधुत्वा"चा अर्थ होता, उगवत्या भांडवलदारवर्गाला अनिर्बंध व्यापार-स्वातंत्र्याचा हक्क, भांडवलदारवर्गाला सरंजामी मालकांबरोबर समानता आणि या वर्गातील व्यक्तींचे परस्परांशी बंधुत्व–वर्गबंधुत्व; म्हणजेच सरंजामी जुलूम व नियंत्रणे यांविरुद्ध एकमेकांना बंधुभावाची मदत. या तत्त्व-त्रयींपैकी कोणतेही तत्त्व फ्रेंच साम्राज्यातील गुलामांना, किंबहुना खुद्द फ्रान्समधील जनतेच्या गरीब विभागांना लागू नव्हते.

म्हणूनच आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, बहुतेक सर्व तत्त्वे आणि विशेषतः समाजसंघटनेशी संबंधित असलेली तत्त्वे "वर्ग-तत्त्वे" असतात;

ती त्या समाजातील सत्ताधारीवर्गाची तत्त्वे असतात; आणि तो वर्ग प्रचार-साधनांची मालकी, शिक्षणाचे नियंत्रण आणि विरोधी विचारांना न्याय-कोर्टा-मार्फत बडतर्फी करून व इतर मार्गांनी चिरडून टाकण्याचे त्यांचे सामर्थ्य, यांच्या जोरावर आपली तत्त्वे बाकीच्या समाजावर लादीत असतो. याचा अर्थ असा नव्हे की, सत्ताधारीवर्ग स्वतःशी म्हणतो: "हे एक तत्त्व आहे; ते अर्थातच खरे नाही; पण आम्ही त्याच्यावर सर्वांना विश्वास ठेवायला भाग पाडू; निदान कोणालाही जाहीर रीतीने त्याला विरोध करू देणार नाही" असे होत नाही; उलट, अशी तत्त्वे सर्वसाधारणपणे, सत्ताधारी स्वतःच्या डोक्यातून पुढे आणीत नाहीत; ती प्रत्यक्ष जीवनातून वर येतात. उदाहरणार्थ, सरंजामदारी सरदाराची अगर उमरावपद प्राप्त झालेल्या उद्योगपतीची प्रत्यक्ष शक्ती हाच, "अमीर-उमराव इतरांपेक्षा श्रेष्ठ असतात," या विचाराचा भौतिक पाया असतो. परंतु एकदा हे विचार निर्माण होऊन दृढमूल झाले की, ते सर्वांनी मानलेच पाहिजेत अशी व्यवस्था करणे अधिकार गाजविणाऱ्या वर्गाला महत्त्वाचे वाटते; कारण लोकांनी ते मानले नाहीत तर ते त्यांना अनुसरून वागणार नाहीत--उदाहरणार्थ, ते राजाचा दैवी हक्क मानणार नाहीत आणि राजाचे डोके उडविण्यासही मागेपुढे पाहाणार नाहीत. म्हणून, सर्वकाळांतील व फक्त अमेरिकेतीलच नव्हे; तर सर्व देशांतील सत्ता-धारी वर्ग "भयंकर विचारां"चा फैलाव होऊ नये, म्हणून जे करता येईल ते सर्व काही करतात.

शास्त्रशुद्ध विचारांचे प्रभावी कार्य

परंतु प्रश्न असा विचारला जाईल की, तत्त्वांना व विचारांना जर दुय्यम स्थान असते आणि उत्पादन प्रकारांतील भौतिक बदल जर प्रथम दर्ज्याची महत्त्वाची घटना असते तर "भयंकर विचारां"चा उदय होतोच कसा? थोडक्यात म्हणजे, उत्पादनाचा नवा प्रकार अस्तित्वात येण्यापूर्वी लोक त्याच्याबद्दल विचार कसे करू लागतात?

उत्तर असे आहे की, उत्पादनाचे नवे प्रकार अस्तित्वात येण्याची परि-स्थिती निर्माण झाल्याशिवाय लोक विचार करू लागत नाहीत. परंतु परिस्थिती निर्माण झाल्यानंतर जुनी परिस्थिती आणि उत्पादनाच्या नव्या शक्ती यांच्या-तील संघर्षामुळे लोकांना विचार करणे **भाग पडते.**

अशा कालखंडाबद्दल मार्क्सने म्हटले आहे : "एखाद्या व्यक्तीचे मूल्यमापन ज्याप्रमाणे आपल्याला तिच्या स्वतःबद्दलच्या मतांवरून करता येत नाही, त्याप्रमाणे कोणत्याही क्रांतीसंबंधीचे मूल्यमापन आपल्याला तिच्या स्वतःच्या जाणीवेच्या आधारावर करता येत नाही."

क्रांतिकारक कालखंडांच्या आकलनासाठी, सत्तेसाठी झगडणारे वर्ग कोणते, जुन्या वर्गाच्या हातून सत्ता काढून घेत असलेला नवा वर्ग कोणता, हे पहाणे याला खरे महत्त्व आहे. जरी कळत अगर नकळत या नव्या वर्गाचे पुढारी वर्गहित अगर वर्गसत्ता यांच्याशी संबंधित नसलेल्या अमूर्त तत्त्वांसाठी अगर प्रश्नांसाठी लढत असल्याचे सांगत असले तरीसुद्धा आपण त्याचे खरे स्वरूप ओळखले पाहिजे.

झगडणाऱ्या वर्गांमधील संघर्ष ही मानवी समाजाच्या विकासाची मुख्य प्रेरक शक्ती असते, असे इतिहासाकडे पाहाणाऱ्या मार्क्सवादी दृष्टिकोनाचे म्हणणे आहे. परंतु, समाजातील वर्गविभागणी आणि नव्या वर्गाचा उदय जीवनाला आवश्यक असलेल्या वस्तूंचे उत्पादन करण्यासाठी ज्या उत्पादन शक्ती वापरल्या जातात त्यांच्या विकासाच्या अवस्थेवर अवलंबून असतो. बाष्प व विद्युत् शक्तीवर चालणाऱ्या यंत्रांच्या शोधांमुळे उत्पादनाने खूपच वरची अवस्था गाठली. पण या शोधांचे महत्त्व इतकेच नाही. त्यांच्यामुळे, चरखा व हातमाग चालवून कापड तयार करणाऱ्या कोष्ट्यांचा नाश झाला; कारण यंत्राच्या साहाय्याने काम करणारा कामगार एका दिवसात जितके कापड तयार करू शकतो. तितके हातमागावर एका आठवड्यातही तयार होत नाही. त्यामुळे चढाओढीत कोष्टी टिकू शकला नाही. याचा परिणाम असा झाला की, उत्पादनाच्या साधनाचा मालक असलेला, आणि त्यांच्या साहाय्याने काम करून स्वतः कापड तयार करणारा, कोष्टी जाऊन त्याच्या जागी दोन नवे वर्ग अस्तित्वात आले. एक नव्या यंत्रांचा मालक असलेला, पण स्वतः त्यांच्यावर काम न करणारा भांडवलदारवर्ग; आणि दुसरा, उत्पादनाच्या कोणत्याही साधनांचा मालक नसलेला पण (मजुरी घेऊन) त्यांच्यावर मालकांकरिता काम करणारा औद्योगिक कामगारवर्ग.

हा बदल नकळत झाला; त्याची कोणीही योजना आखली नव्हती. काही लोकांना नवे ज्ञान प्राप्त झाले; ते त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी उत्पादनाच्या

क्षेत्रात वापरले; त्याचे सामाजिक परिणाम काय होतील याची त्यांना कल्पना नव्हती; अगर तसे परिणाम व्हावेत अशी त्यांची इच्छाही नव्हती. त्याचा तो परिणाम होता. मानवी समाजात घडून आलेले सर्व बदल असेच घडून आले, असे मार्क्सचे म्हणणे आहेः माणूस सतत आपले ज्ञान वाढवीत गेला, ते त्याने उत्पादनासाठी वापरले आणि परिणामी महान सामाजिक बदल घडवून आणले. या सामाजिक बदलांमुळे वर्ग-संघर्ष निर्माण झाले; या संघर्षांना धर्म, राजकारण, न्याय इत्यादी तत्त्वांच्या व संस्थांच्या लढ्याचे स्वरूप प्राप्त झाले; कारण त्यावेळी अस्तित्वात असलेली तत्त्वे व संस्था उत्पादनाच्या जुन्या पद्धतीतून आणि जुन्या वर्गसंबंधांतून निर्माण झालेल्या होत्या.

विचारसंघर्ष : समाज विकासाची दुय्यम प्रेरक शक्ती

ही तत्त्वे व या संस्था कशामुळे अस्तित्वात आल्या होत्या? आणि त्यांचा अस्त कशामुळे झाला?–या प्रश्नाचे उत्तर देताना मार्क्सने दाखवून दिले आहे की, माणसांच्या प्रत्यक्ष व्यवहारातूनच सर्वत्र व सर्वकाळी तत्त्वे व संस्था उदयास आल्या. पहिली गोष्ट होती––अन्न, वस्त्र, आसरा या जीवनाच्या आवश्यक वस्तूंचे उत्पादन. त्याला अनुसरून इतिहासाच्या कालक्रमात एकामागून एक असे सामाजिक समवाय (गट) अस्तित्वात आले; जसे, आदिम जमातीचा समाज, गुलामगिरीवर आधारलेला समाज, सरंजामदारी समाज व आधुनिक भांडवलदारी समाज. या प्रत्येक समाजातील सभासदांच्या विभागांचे परस्पर संबंध उत्पादनाच्या पद्धतीवर अवलंबून होते. माणसांनी प्रथम विवाहसंस्था, धर्मसंस्था इत्यादी संबंधी विचार केला नाही; त्या त्या समाज गटाच्या चालीरीतींतून त्या संस्था तयार झाल्या; संस्था, कायदे, नैतिक व इतर कल्पना आधीच्या चालीरीतीतून साकार झाल्या आणि चालिरिती सरळ सरळ उत्पादनाच्या पद्धतीत निर्माण झाल्या होत्या.

आणि म्हणून, ज्यावेळी उत्पादनाची पद्धत बदलली—उदाहरणार्थ, सरंजामशाही जाऊन भांडवलशाही आली—त्यावेळी संस्था व तत्त्वेही बदलली. एका अवस्थेत जे नैतिक मानले जाई ते दुसऱ्या अवस्थेत अनैतिक ठरले, आणि त्याच्या उलट, जे एका अवस्थेत अनैतिक मानले जाई, ते नंतर नैतिक समजले जाऊ लागले. आणि ज्यावेळी हे भौतिक बदल घडून येत होते––म्हणजे उत्पादनाच्या पद्धतीत बदल घडत होते—त्यावेळी स्वाभाविक-

स्थित्यंतरांबद्दलचे पुरेसे ज्ञान मिळविले आहे; तो आता पुढील अवस्थेकडे जाणीवपूर्वक व योजनाबद्ध रीतीने जाऊ शकतो आणि जिच्यात उत्पादन जाणीवपूर्वक आणि योजनाबद्ध असेल अशा समाजाची स्थापना करू शकतो. अशा अवस्थेबद्दल एंगल्स म्हणतो :

"ज्यांनी आतापर्यंत इतिहासावर प्रभुत्व गाजविले त्या भौतिक बाह्य शक्ती या अवस्थेत मानवाच्या नियंत्रणाखाली येतील आणि या क्षणापासूनच माणसे पूर्ण जाणीव ठेवून स्वतःचा इतिहास घडवू लागतील."

३

भांडवलशाहीचा समाज

ब्रिटनमध्ये सरंजामशाहीच्या जागी प्रस्थापित झालेल्या, आणि गेल्या शतकात जगभर फैलावत गेलेल्या, उत्पादनाच्या नव्या पद्धतीचा--भांडवलशाहीचा--अभ्यास करण्यात मार्क्सच्या जीवनातील बरीच वर्षे खर्च झाली. त्याच्या अभ्यासाचा मुख्य उद्देश भांडवलदारी समाजाच्या "गतीचे नियम" शोधून काढणे, हा होता. भांडवलशाही नेहमीच अस्तित्वात नव्हती. तिचा हळू हळू उदय झाला. १८ व्या शतकाच्या अखेरीस, "औद्योगिक क्रांती"च्या काळात तिचे जे स्वरूप होते तेच पुढे मार्क्सच्या काळात राहिले नाही. मार्क्सचा उद्देश त्याच्या काळातील भांडवलदारी उत्पादनाच्या पद्धतीचे केवळ वर्णन करण्याचा नव्हता, तर तिचे विश्लेषण करून ती का व कोणत्या दिशेने बदलत होती हे दाखविण्याचा होता. विषयाकडे पाहाण्याचा हा दृष्टिकोन नवा होता. अर्थशास्त्रावरील इतर लेखकांनी भांडवलशाही जशी दिसत होती तसेच तिचे वर्णन केले आणि जणू काही ती स्थिर व शाश्वत पद्धती आहे असे मानले; मार्क्सच्या दृष्टीने मात्र इतिहासातील उत्पादनाच्या इतर पद्धतींप्रमाणे हीही पद्धती बदलत होती. आणि म्हणून त्याच्या अभ्यासाचाही परिणाम भांडवलशाहीचे केवळ वर्णन करण्यात झाला नाही, तर शास्त्रीय भविष्य वर्तविण्यात झाला. कारण भांडवलशाहीचा विकास खरोखरीच कोणत्या दिशेने होत होता हे त्याला समजून आले होते.

भांडवलदारी उत्पादनाचा जन्म सरंजामशाहीच्या काळातील वैयक्तिक उत्पादनांतून झाला. सरंजामदारी उत्पादनाचे मुख्य लक्षण 'स्थानिक उपभोगासाठी उत्पादन' हे होते; त्यावेळी भूदास अन्न, वस्त्र व इतर वस्तू स्वतःसाठी व त्यांच्या भूस्वामीसाठी तयार करीत. पुढे वरकड उत्पादन होऊ लागताच--म्हणजे, त्या त्या गटाला लागणाऱ्या जिन्नसांपेक्षा अधिक जिन्नस तयार होऊ लागताच--त्यांची देशातील इतर विभागांत तयार झालेल्या अगर दुसऱ्या

उदाहरणार्थ, मोलमजुरी करणाऱ्यांकडून उत्पादनाची प्रत्यक्ष वाढ होताच आणि नफा मिळविण्यासाठी उत्पादन विकण्याची आवश्यकता निर्माण होताच, प्रारंभीच्या भांडवलदाराचा सरंजामी व्यापारीनियंत्रणाविरुद्ध तीव्र संघर्ष निर्माण झाला. त्यातूनच व्यापारस्वातंत्र्य, कर देणाऱ्यांना ते ठरविण्याचा हक्क, इत्यादि विचारांचा जन्म झाला. त्या काळी भांडवलदारी समाजपद्धती अस्तित्वात आलेली नव्हती. परंतु भांडवलदारी समाजाच्या जन्माची परिस्थिती तयार झाली होती; आणि तिच्यातूनच भांडवलदारी विचारांचा जन्म झाला.

समाजवादी विचारही असेच जन्माला येतात. जेव्हा मोठ्या प्रमाणावरील उद्योगधंद्यांचा सर्वत्र विस्तार झाला आणि सतत येणाऱ्या अति-उत्पादनाच्या अरिष्टामुळे सामाजिक प्रगतीत भांडवलशाही अडथळे आणते हे सर्वांना दिसून आले, तेव्हांच समाजवादी समाजाच्या अभ्युदयाला योग्य अशी परिस्थिती निर्माण झाली आणि तेव्हाच समाजवादाबद्दलच्या मनोराज्यवादी कल्पना जाऊन त्यांच्या जागी समाजवादाचे शास्त्रशुद्ध तत्त्वज्ञान निर्माण झाले.

परंतु विचारांचा जन्म भौतिक परिस्थितीतूनच होत असला तरी, हे विचार एकदा अस्तित्वात आले म्हणजे मानवाच्या कार्यावर प्रभाव गाजवितात आणि त्यामुळे परिस्थितीवरही त्यांचा प्रभाव पडतो. उत्पादनाच्या जुन्या पद्धतीवर आधारलेले विचार नव्या परिस्थितीत जुनेपुराणे होतात; ते माणसाची प्रगती रोखून धरतात आणि म्हणूनच प्रत्येक कालखंडातील सत्ताधारीवर्ग ते समाजांत अधिकाधिक रुजवण्याचा प्रयत्न करतो. परंतु उत्पादनाच्या नव्या परिस्थितीतून उदयास येणारे विचार प्रगतिशील असतात; कारण ते समाजाचे नव्या पद्धतीकडे स्थित्यंतर करण्याच्या कार्याला उत्तेजन देतात; आणि म्हणूनच सत्ताधारीवर्ग त्यांना धोकादायक समजतो. आणि यामुळेच, 'नागरिकांची फार मोठी संख्या अर्धपोटी असताना, गव्हाच्या किंमती उतरू नयेत म्हणून धान्य जाळून टाकणारी समाजपद्धती वाईट आहे,' असे सांगणारी विचारधारा त्यांना "धोकादायकच" वाटते. कारण या विचारसरणीतून ज्या समाजपद्धतीत उत्पादन उपभोगासाठी असते, नफ्यासाठी नसते, अशा समाजपद्धतीबद्दलचे विचार तयार होतात, या विचारांतून समाजवादी व साम्यवादी पक्षांच्या संघटना उदयास येतात आणि त्या समाजाला नव्या समाजपद्धतीकडे नेण्यासाठी कार्य करू लागतात.

समाजविकासाचे अमोघ साधन : वर्गसंघर्ष + समाजवादाचे तत्त्वज्ञान

यावरून हे समजून येईल की, ("ऐतिहासिक भौतिकवाद," या नावाने प्रसिद्ध असलेला), समाजविकासासंबंधीचा मार्क्सवादी सिद्धांत भौतिकवादी "प्रारब्धवाद" नाही; माणसाच्या सर्व कृती केवळ सभोवतालच्या भौतिक परिस्थितीप्रमाणेच होत असतात, असे तो समजत नाही;उलट माणसाचे कार्य आणि त्याच्यामुळे घडून येणारे भौतिक बदल काही अंशी त्याच्या भोवतालच्या भौतिक जगाचे परिपाक असतात आणि काही अंशी या भौतिक परिस्थितीवर प्रभुत्व मिळविणाऱ्या त्याच्या ज्ञानाचे परिपाक असतात. परंतु, हे ज्ञानही त्याला भौतिक जगाच्या अनुभवातूनच मिळत असल्यामुळे भौतिक जगाच्या परिस्थितीला प्रथम क्रमांक दिला जातो. भौतिक जगाचा अनुभव माणसाला निष्क्रिय बसून, अमूर्त मार्गाने मिळत नाही; तर जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करीत असताना मिळतो. त्याचे ज्ञान जसे वाढत जाते, तो उत्पादनाच्या नव्या पद्धती जेव्हा शोधून काढतो व वापरात आणतो, तेव्हा सामाजिक संघटनेचे जुने प्रकार पराभूत होतात; ते उत्पादनाच्या नव्या पद्धतीच्या पूर्ण विकासात अडथळे आणतात. हे सर्व पिळला जाणारा वर्ग जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवांतून शिकतो आणि तो प्रथम, जुन्या प्रकारच्या समाज-संघटनेने निर्माण केलेल्या विशिष्ट अन्यायांविरुद्ध, विशिष्ट बंधनांविरुद्ध लढा उभारतो. परंतु पुढे तो अपरिहार्यपणे समाजपद्धती बदलण्यासाठी सत्ताधारी वर्गाविरुद्ध सार्वत्रिक लढ्यात ओढला जातो.

जुन्या उत्पादनपद्धतीतून नव्या उत्पादनपद्धतीचा विकास होण्याची प्रक्रिया काही एका मर्यादेपर्यंत अजाणता होत असते, योजनाहीत होत असते; त्याचप्रमाणे, जुनी उत्पादनपद्धती टिकवून धरणाऱ्या जुन्या समाजसंघटनांविरुद्धचा लढाही सुरुवातीला तसाच असतो. परंतु, अशी एक अवस्था येतेच की जेव्हा, नव्या उत्पादनशक्तीच्या पूर्ण वापराला जुने वर्गसंबंध अडथळे आणीत आहेत, हे स्पष्टपणे दिसू लागते; आणि त्याच अवस्थेत 'भविष्यकाळचा भाग्यविधाता असलेला वर्ग' जाणीवपूर्वक कार्य करू लागतो.

आता उत्पादनशक्तीचा विकास करण्याची क्रिया अजाण अगर योजनाहीन राहण्याची अवस्था उरलेली नाही. मानवाने पुरेसा अनुभव, सामाजिक

देशांतून आणलेल्या जिन्नसावरोवर अदलाबदल होऊ लागली. तरीसुद्धा उत्पादनाचा मुख्य भाग उत्पादक गटाच्या व त्याच्यावर सरंजामदारी हक्क सांगणाऱ्या भूस्वामीच्या उपभोगासाठीच असे.

जेव्हा सरंजामदारी घटकांचा नाश होऊ लागला तेव्हाच उत्पादनाच्या या प्रकारची जागा नफ्यासाठी होणाऱ्या उत्पादनाने घेतली; भांडवलदारी उत्पादनाची मुख्य निदर्शक खूण 'नफ्यासाठी उत्पादन' हीच असते. या पद्धतीच्या उत्पादनासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते: पहिली ही की, ज्यांच्या जवळ (माग, सूत कताईची यंत्रे. इ.) उत्पादनाची साधने विकत घेण्याइतकी संपत्ती आहे अशा व्यक्ती; आणि दुसरी ही की, ज्यांच्या जवळ स्वतःची उत्पादनाची साधने नाहीत, म्हणजे जिचा उपयोग करून जीवन जगता येईल अशी साधनसामुग्री नाही, असे लोक. दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, भांडवली उत्पादनासाठी उत्पादनाच्या साधनांचे मालक असलेले 'भांडवलदार' असायला पाहिजेत आणि भांडवलदारांच्या मालकीच्या यंत्रांवर काम केले तरच ज्यांना चरितार्थ चालविण्याची संधी मिळते, असे कामगार असायला पाहिजेत.

या तऱ्हेच्या उत्पादनात कामगारांनी केलेले उत्पादन स्वतःसाठी नव्हते अगर त्यांच्या नव्या "स्वामी"च्या म्हणजे भांडवलदारांच्या वैयक्तिक उपयोगासाठीही नव्हते, तर ते भांडवलदारांनी पैसे घेऊन विकण्यासाठी होते. अशा रीतीने बाजारात विकण्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या वस्तूंना "क्रय-वस्तू" म्हणतात. या क्रयवस्तूंच्या उत्पादनाबद्दल कामगारांना रोजमजूरी आणि भांडवलदारांना नफा मिळू लागला;—गिऱ्हाईकांनी पैसा देऊन वस्तू विकत घेतल्यानंतर आणि त्यातून कामगारांची मजुरी, कच्च्या मालाची किंमत व उत्पादनाचा इतर खर्च भांडवलदाराने भागविल्यानंतर त्याच्याजवळ राहणारी रक्कम म्हणजेच नफा.

नफ्याचा उगम कशातून होतो? मार्क्सने दाखवून दिले की: भांडवलदारांनी उत्पादनाच्या मूल्यापेक्षा अधिक किमतीला ते बाजारात विकले आणि नफा कमावला, असे होऊ शकत नाही; कारण त्याचा अर्थ सर्व भांडवलदार सदासर्वदा एकमेकांना फसवितात असा होईल; आणि अशा वेळी एकाला 'नफा' झाल्यास दुसऱ्याचे नुकसान होईल; म्हणजे नफानुकसान यांची गोळाबेरीज होऊन भांडवलदारवर्गाला सर्वसाधारण नफा उरणारच नाही. याचाच अर्थ असा की, उत्पादन

जेव्हा बाजारात विक्रीसाठी येते तेव्हाच त्याच्यात नफा अंतर्भूत असला पाहिजे; तो वस्तू निर्माण होत असतानाच निर्माण होत असला पाहिजे; वस्तूच्या विक्रीतून नव्हे.

नफ्याचे मूळ : अतिरिक्त मूल्य, म्हणजेच शोषण

आणि म्हणून नफ्याचा उगम शोधण्यासाठी, उत्पादनाच्या क्रियेचा अभ्यास करून तिच्यातील नफा निर्माण करणारा घटक—म्हणजे स्वमूल्यापेक्षा अधिक मूल्य भांडवलदारांना मिळवून देणारा असा एकादा घटक उत्पादन-क्रियेत आहे की काय याचा शोध घेतला पाहिजे.

त्यासाठी प्रथम "मूल्य" म्हणजे काय, या प्रश्नाचे बरोबर उत्तर दिले पाहिजे. सर्वसाधारण भाषेत "मूल्य" या शब्दाचे दोन निरनिराळे अर्थ होऊ शकतात. मूल्य म्हणजे कोणालाही वस्तूच्या उपयोगामुळे वाटते ते—जसे, तहानलेल्या माणसाला पेय "मूल्यवान" वाटते; किंवा एखाद्या व्यक्तीला विशिष्ट वस्तूबद्दल "भावनात्मक मूल्य" वाटते. हा झाला एक अर्थ. पण नेहमीच्या प्रचारात दुसराही एक अर्थ आहे— कोणत्याही विक्रेत्याकडून कोणत्याही गिऱ्हाइकाला बाजारात वस्तू ज्या मूल्यात विकली जाते ते. यालाच "विनिमय मूल्य" म्हणतात.

हे खरे आहे की, भांडवलदारी समाजातसुद्धा विशिष्ट तऱ्हेच्या वस्तू विशिष्ट गिऱ्हाइकांसाठीच तयार होऊ शकतात आणि त्याची खास किंमतही ठरविली जाऊ शकते. पण मार्क्स नियाच्या भांडवलदारी उत्पादनाबद्दल विचार करत होता. ज्या उत्पादनपद्धतीत सर्व प्रकारचा, कोट्यावधी टनांचा माल, बाजारात येणाऱ्या सर्वसाधारण गिऱ्हाइकांसाठी, जो कोणी विकत घ्यायला येईल त्याच्यासाठी, तयार केला जातो त्या उत्पादनपद्धतीचा मार्क्सने अभ्यास केला. बाजारात वस्तूंचे नित्याचे 'विनिमय मूल्य' कसे ठरते?— म्हणजे उदाहरणार्थ, एक वार कापडात एका टाचणीच्या विनिमय- मूल्याहून अधिक मूल्य का असते?

विनिमय-मूल्य पैशांत मोजले जाते; प्रत्येक वस्तूचे 'मूल्य' अमुक इतक्या रकमेइतके असते. परंतु भिन्न भिन्न वस्तूंच्या मूल्यांची पैशांच्या साहाय्याने अगर प्रत्यक्ष अदलाबदलीने तुलना करणे कशामुळे शक्य होते? मार्क्सने सांगितले की, सर्व क्रय-वस्तूंत काहीतरी समान-सारखे-एकच-(कॉमन)

असले पाहिजे; ते काही वस्तूंत अधिक प्रमाणावर तर काहींत कमी प्रमाणावर असते म्हणूनच त्यांची तुलना होऊ शकते. हा समान घटक म्हणजे रंग, वजन अगर कोणताही इतर भौतिक गुणधर्म असू शकणार नाही, किंवा वस्तूचं "उपयुक्तता मूल्य" ही असू शकणार नाही. (अन्न माणसाच्या जीवनाला मोटारीपेक्षा कितीतरी अधिक उपयोगी असते; पण त्याचे मूल्य मोटारीपेक्षा कितीतरी कमी असते.) सर्व वस्तूंत एकच घटक समान असतो आणि तो म्हणजे मानवी श्रम. कारण सर्व वस्तू मानवी श्रमांनीच निर्माण होतात. एखाद्या वस्तूच्या उत्पादनासाठी अधिक मानवी श्रम खर्च झाले असतील तर त्या वस्तूचे विनिमय मूल्य अधिक असते. तेव्हा वस्तूच्या निर्मितीसाठी खर्ची पडलेल्या "श्रम-काळा" वरूनच तिचे विनिमय-मूल्य ठरत असते.

परंतु हा श्रम-काळ प्रत्येक कामगाराला लागणारा वैयक्तित वेळ नसतो. जेव्हा वस्तू बाजारात विकल्या जातात अगर विकत घेतल्या जातात, तेव्हा त्यांचे विनिमय-मूल्य सरासरीवरून ठरते; विशिष्ट वजनाच्या व प्रकारच्या एक वार कापडाचे विनिमय-मूल्य, त्याच्या उत्पादनासाठी लागलेल्या "सामाजिक दृष्ट्या जरूर असलेल्या सरासरी श्रम-काळा" वरून ठरत असते.

मोलमजुरी, वरकड-मूल्य आणि नफा

भांडवलदारी उत्पादन-पद्धतीत तयार होणाऱ्या वस्तूंचे विनिमय-मूल्य सर्वसाधारणपणे या आधारावर ठरत असते; तेव्हा पुढचा प्रश्न असा की, प्रत्यक्षपणे या वस्तू निर्माण करणाऱ्या कामगारांची मजुरी कशाच्या आधारावर ठरविली जाते? याचे उत्तर शोधताना मार्क्सने ह्या प्रश्नाची मांडणी नेमकी याच पद्धतीने उपस्थित केली की, भांडवलदारी उत्पादन पद्धतीत माणसाच्या श्रम करण्याच्या शक्तीचेही बाजारात विनिमय-मूल्य ठरत असते; म्हणून ह्या दुसऱ्या वस्तू व श्रमशक्ती यांच्यांत समान घटक कोणता आहे? कोणत्याही वस्तूचे विनिमयमूल्य ठरविणारा घटक एकच असतो आणि तो म्हणजे त्याच्या उत्पादनासाठी लागणारा 'श्रम-काळ' हे आपण पाहिलेच आहे. श्रमशक्तीला तोच नियम लागू आहे. तेव्हा, श्रमशक्ती निर्माण करण्यासाठी लागलेला श्रम-काळ, म्हणजे काय? असा पुढचा प्रश्न उपस्थित होतो. त्याचे उत्तर कामगाराला कामगार म्हणून दर दिवशी जिवंत राहण्यासाठी लागणाऱ्या अन्न, वस्त्र, आसरा व इतर वस्तूंच्या निर्मितीत खर्च होणारा 'सामाजिक

दृष्ट्या आवश्यक, सरासरी श्रम-काळ', असे आहे. भांडवलदारी समाजात कामगारावरोवर कामगाराच्या कुटुंवाच्या पोषणाला लागणाऱ्या वस्तूंचाही विचार करावा लागतो. म्हणजे कामगार व त्याचे कुटुंव यांना जगण्यासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमकाळावरून, कामगाराच्या श्रमशक्तीचे विनिमय-मूल्य ठरत असते; ही श्रमशक्ती कामगार मजुरी घेऊन भांडवलदाराला बाजारात विकतो.

परंतु, आधुनिक भांडवलदारी समाजात, कामगाराची श्रमशक्ती टिकवून धरण्यासाठी दिवसाचे चारच तासांचे श्रम लागत असले, तरी काम करण्याची कामगाराची शक्ती आठ-दहा तास अगर जास्त वेळ टिकू शकते. आणि म्हणून, दिवसाच्या पहिल्या चार तासांच्या कामात, त्याच्या श्रमातून, त्याला मिळणाऱ्या मजुरीइतके उत्पादन होते; दिवसाच्या पुढील तासांत तो "वरकड मूल्य" निर्माण करतो आणि भांडवलदार ते गिळंकृत करतो. भांडवलदाराच्या नफ्याचा उगम हाच आहे—स्वतःच्या जीवनासाठी लागणाऱ्या मूल्यापेक्षा म्हणजे कामगाराला मिळणाऱ्या मजुरीपेक्षा, कामगार जे अधिक मूल्य निर्माण करतो, तोच भांडवलदाराचा नफा.

'मूल्य' 'किंमत' आणि 'मजुरी'

मूल्य व वरकड मूल्य यासंबंधीच्या मार्क्सच्या शिकवणीचा हा सारांश अनेक मार्गांनी अधिक काटेतोल पद्धतीने सांगण्याची आवश्यकता आहे; परंतु जागेच्या अभावी ते करता येणार नाही. तरीही काही कल्पनांसंबंधी थोडेसे स्पष्टीकरण देता येईल.

"विनिमयमूल्य" या शब्दप्रयोगाचा उपयोग सर्वत्र करण्यात आलेला आहे; कारण सर्व विश्लेषण त्यावरच आधारलेले आहे. परंतु प्रत्यक्ष जीवनात वस्तू-विनिमय-मूल्याइतक्याच किंमतीला विकल्या जातत असे नाही. भौतिक वस्तू काय किंवा मानवी श्रमशक्ती काय, बाजारात त्यांची किंमत कधी त्यांच्या विनिमयमूल्यापेक्षा अधिक असते, तर कधी कमी. एखाद्या वेळी बाजारात एखादे उत्पादन जादा प्रमाणात आलेले असले तर त्याची किंमत विनिमय-मूल्यापेक्षा कितीतरी कमी होईल आणि ज्यावेळी त्याची कमतरता असेल तेव्हा किंमत पुष्कळच अधिक होईल. किंमतींचा हा चढउतार "मागणी व पुरवठा" यांच्या परिस्थितीवर अवलंबून असतो. त्यामुळे अनेक भांडवलदारी

अर्थशास्त्रज्ञांना वाटते की, मागणी व पुरवठा यावरूनच वस्तूच्या किंमती ठरत असतात. परंतु थोडा खोलवर विचार केला की दिसून येते की, मागणी व पुरवठा यांत फरक झाल्यास किंमतीत जो चढउतार होतो तो एका निश्चित पातळीच्या भोवती होतो. किंमतीची ती पातळी कोणती असेल, एक पैसा की शंभर रुपये असेल, हे काही मागणी व पुरवठ्यावरून ठरत नाही; ती वस्तूच्या निर्मितीसाठी खर्ची पडलेल्या श्रमकाळावरून ठरते.

श्रमशक्तीची प्रत्यक्ष किंमत, म्हणजे कामगारांना प्रत्यक्षपणे मिळणारी मजुरी, मागणी-पुरवठ्यानुसार काही अंशी वरखाली होते; त्याचप्रमाणे इतरही परिस्थितीचा तिच्यावर परिणाम होतो. उदाहरणार्थ, कामगार संघटनांच्या ताकदीचा तिच्यावर परिणाम होतो. तरीसुद्धा सर्वसाधारणपणे भांडवलदारी समाजात, श्रमशक्तीची किंमत—म्हणजे कामगारांची मजुरी—एका विशिष्ट पातळीभोवतीच वरखाली होत असते; ती कामगारांच्या उपजीविकेची पातळी असते. हे विधान करताना कामगारांच्या वेतनश्रेणी निरनिराळ्या असतात हे नजरेआड केलेले नाही; परंतु हे राहणीमानही पूर्वीच्या कामगार चळवळीतून मिळालेल्या यशामुळे ठरलेले असते; जगण्यास आवश्यक असलेल्या किमान दर्ज्याच्या वरचा दर्जा कामगारांच्या काही गटांनी चळवळीच्या जोरावरच प्राप्त करून घेतलेला असतो.

निरनिराळ्या दर्ज्याच्या कामगारांची श्रमशक्ती मात्र एकसारखी नसते; एखाद्या वाकबगार इंजिनिअरच्या एका तासाच्या कामाने अकुशल कामगाराच्या एका तासाच्या कामापेक्षा निश्चितपणे अधिक मूल्य निर्माण होते. मार्क्सने दाखवून दिले आहे की, वस्तू बाजारात विकल्या जातात तेव्हा हे सर्व फरक लक्षात घेतले जातात; अधिक कुशल कामगारांचे एका तासाचे उत्पादन आणि अकुशल कामगारांचे एका तासाचे उत्पादन यांच्यांत एक निश्चित संबंध तेथे नोंदला जात असतो.

मूल्यांतील हा फरक कसा निर्माण होतो ?

मार्क्सने उत्तर दिले आहे : कुशलता नैतिकदृष्ट्या अकुशलतेपेक्षा वरच्या दर्ज्याची असते, अशा तऱ्हेच्या कोणत्याही "तात्त्विक" कल्पनेमुळे हा फरक पडत नाही; कुशल कामगारांच्या श्रमशक्तीचे विनिमय-मूल्य अकुशल कामगारांच्या श्रमशक्तीच्या विनिमय-मूल्यापेक्षा अधिक असते याचे कारण, आणि आगबोटीची किंमत होडीपेक्षा जास्त असते याचे कारण, एकच;

त्याला तयार करण्यासाठी अधिक मानवी श्रम खर्ची पडलेले असतात. कुशल कामगाराच्या शिक्षणासाठी, आणि त्याचे कौशल्य टिकवून धरण्यास आवश्यक असलेल्या राहणीमानासाठी, अधिक श्रमकाळ लागत असतो.

दुसरा मुद्दा असा की, पूर्वीपेक्षा श्रमाचा ताण वाढविल्यास त्याचा परिणाम श्रमकाळ वाढविल्याप्रमाणेच होतो; आठ तासांच्या ताण वाढविलेल्या श्रमांतून पूर्वीच्या श्रमांच्या दहा अगर बारा तासांच्या श्रमाइतके मूल्य निर्माण होत असते.

नफा हेच वर्गसंघर्षाचे मूळ आहे

नफ्याचा उगम दाखविण्यासाठी मार्क्सने केलेल्या विश्लेषणाचे महत्त्व कशात आहे? भांडवलदारी कालखंडातील वर्गलढ्याचे मर्म त्यावरून समजून येते, हे त्याचे महत्त्व आहे. प्रत्येक कारखान्यात अगर गिरणीत कामगाराला मिळणारी मजुरी तो जितके मूल्य निर्माण करतो तितकी नसते; ती निम्म्या उत्पादन-मूल्याइतकीच अगर त्यापेक्षाही कमी असते. कामाच्या दिवसाच्या उरलेल्या वेळात (म्हणजे त्याला मिळणाऱ्या मजुरीइतके काम त्याने केल्यानंतर), त्याने निर्माण केलेले सर्व मूल्य मालक सरळ आपल्या खिशात टाकीत असतो. आणि म्हणून कामगाराकडून काढून घेण्याची ही रक्कम वाढविण्याचा मालक सतत प्रयत्न करीत असतो. तो त्यासाठी अनेक मार्गांचा अवलंब करतो; उदाहरणार्थ, तो वेतन कपात लादतो; याचा अर्थ असा की, कामगार स्वतःसाठी पूर्वीपेक्षा कमी वेळ काम करतो आणि मालकासाठी अधिक वेळ काम करतो. हाच परिणाम कामवाढीमुळे किंवा 'कामाचा वेग' अगर कामाचा ताण वाढविल्यामुळे होतो; कामगार आपल्यासाठी कमी वेळ काम करू लागतो आणि मालकासाठी अधिक वेळ काम करू लागतो. हाच परिणाम कामाचे तास वाढविल्यामुळे होतो; मालकासाठी होणाऱ्या कामाच्या तासांचे प्रमाण वाढू लागते. याच्या उलट कामगार, वेतनवाढ, कामाचा कमी तासांचा दिवस यांची मागणी करतो, कामवाढीला विरोध करतो आणि आपली परिस्थिती सुधारण्यासाठी लढा देतो.

आणि म्हणून भांडवलदार व कामगार यांच्यांत सतत संघर्ष चालू राहतो व जोपर्यंत उत्पादनाची भांडवलदारी पद्धत अस्तित्वात असते तोपर्यंत त्याचा शेवट होऊ शकत नाही. एखादा कामगार अगर कामगारांचा एखादा गट आणि

त्यांचा मालक यांच्यात लढ्याला आरंभ होऊन पुढे त्याचा विस्तार हळूहळू वाढत जातो, एका बाजूला कामगार संघटना (ट्रेड युनियन्स), आणि दुसऱ्या बाजूला मालक-संघ आपआपल्या वर्गाचे मोठे विभाग एकमेकांविरुद्ध लढण्यासाठी उभे करतात. या वेळेपर्यंत कामगारांच्या राजकीय संघटनाही निर्माण होतात आणि जशी जशी त्यांची वाढ होत जाते त्या प्रमाणात ते सर्व औद्योगिक गटांना व जनतेच्या समुदायांना भांडवलदारवर्गाविरुद्ध लढण्यासाठी तयार करतात. या लढ्यांचा उत्कर्षबिंदू म्हणजे क्रांती–भांडवलदारवर्गाच्या सत्तेचे उच्चाटन आणि ज्या समाजात कामगारांना दुसऱ्या वर्गासाठी दिवसाच्या काही भागात काम करावे लागत नाही अशी उत्पादनपद्धती असलेल्या समाजाची स्थापना, असा या क्रांतीचा अर्थ असतो. या प्रश्नांची अधिक चर्चा पुढील प्रकरणात केलेली आहे. येथे ही गोष्ट लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे की, भांडवलदारी समाजातील वर्गलढ्याचे कारण भांडवलदारी उत्पादनाचे विशिष्ट स्वरूप हेच आहे; या पद्धतीत दोन वर्गांचे हितसंबंध परस्पर-विरोधी असतात आणि उत्पादनाच्या नव्या क्रियेत त्यांचा परस्पराशी सतत संघर्ष येत असतो. हे जे या उत्पादनाचे विशिष्ट स्वरूप आहे तेच त्याचे कारण आहे.

भांडवल : नफा निर्माण करणारी मालमत्ता

मजुरी व नफा यांचे विवरण केल्यानंतर आता आपण भांडवलाबद्दल विचार करू या.पहिली गोष्ट ही की, उत्पादन करताना कामगारांनी निर्माण केलेले सर्वच्या सर्व वरकड मूल्य त्याच्या मालकाजवळ राहात नाही. तो जणू काही एकप्रकारचा निधी असतो, त्यातून भांडवलदारांचे निरनिराळे गट आपापले हिस्से काढून घेत असतात; जमीनमालक खंड घेतो, बँक व्याज घेते, अडत्या 'व्यापारी नफा' घेतो आणि मग शिल्लक राहतो तो औद्योगिक भांडवलदारांचा नफा. या खुलाशामुळे, अर्थातच पूर्वीच्या स्पष्टीकरणाला बाधा येत नाही याचा अर्थ इतकाच की, भांडवलदारांच्या निरनिराळ्या विभागांत लुटीच्या वाटणीसाठी एक दुय्यम संघर्ष चालू असतो. मात्र कामगारांकडून शक्य तितके सर्व काढून घेण्याबद्दल त्या सर्वांची पूर्णपणे एकवाक्यता असते.

भांडवल म्हणजे काय ? भांडवलाचे अनेक भौतिक प्रकार आहेत. यंत्रे, इमारती, कच्चा माल, जळण, उत्पादनासाठी लागणारी इतर सर्व सामुग्री, इत्यादी. उत्पादनासाठी लागणाऱ्या मजुरीच्या पैशांचाही त्यात समावेश होतो.

परंतु केवळ यंत्रे, इमारती इत्यादी किंवहुना पैसा म्हणजे सुद्धा भांडवल नव्हे. उदाहरणार्थ; आयर्लंडच्या पश्चिम किनाऱ्यावरील एखाद्या शेतकऱ्याचे रहाते घर, त्याभोवतालचे लहानसे अंगण, त्याच्या जवळच्या गाई-कोंबड्या, एखादी होडी किंवा त्याच्या जवळ असलेला थोडासा पैसा सुद्धा—तो शेतकरी स्वतःच स्वतःचा मालक असेल आणि इतर कोणाचा मालक नसेल, तर त्याची मालमत्ता भांडवल नाही. सोविएत युनियनमधील शेतकरी आज असाच आहे.

(कोणत्याही स्वरूपातील) मालमत्ता ज्यावेळी वरकड मूल्य उत्पादन करण्यासाठी वापरली जाते, त्यावेळीच तिला आर्थिकदृष्ट्या भांडवल असे म्हणतात; त्याचा अर्थ असा की, मालमत्तेचा उपयोग करून जेव्हा कामगारांना कामावर ठेवले जाते आणि कामगार उत्पादन करीत असताना वरकड मूल्य निर्माण करतात तेव्हाच त्या मालमत्तेला भांडवलाचे स्वरूप येते.

भांडवलाचे उगमस्थान : लूट आणि जमिनीची लुबाडणूक

अशा भांडवलाचे उगमस्थान कोणते? इतिहासाच्या अभ्यासकांना माहीत आहे की, भांडवलाचा प्रारंभीचा संचय मुख्यतः उघड उघड लुटालूट करूनच झालेला आहे. साहसी लोकांनी अमेरिका, भारत व आफ्रिकेतील सोने, चांदी व इतर मूल्यवान धनसंपत्ती फार मोठ्या प्रमाणावर लुटली. परंतु लुटालूट करून भांडवल जमा करण्याचा हा केवळ एक मार्ग झाला. खुद्द ब्रिटनमध्ये "कुंपण कायद्या"च्या नावाखाली सामाजिक मालकीची अफाट जमीन भांडवलदारी शेतकऱ्यांनी स्वहितासाठी चोरली आणि असे करताना त्यांनी शेतकऱ्यांचे उपजीवीकेचे साधन हिसकावून घेतले आणि अशा रीतीने त्यांना कामगार बनविले. आता त्यांना नव्या मालकांच्या फायद्यासाठी त्यांच्याच जवळून काढून घेतलेल्या जमिनीवर राबण्याखेरीज चरितार्थाचा दुसरा मार्गच उरला नाही. मार्क्सने सांगितले की : भांडवलाचे ("प्राथमिक संचयाचे") खरे उगमस्थान हेच आहे. काही लोक सांगतात की, काही काटकसरी लोकांनी काटकसर करून आपल्या लहानशा मिळकतीतून 'शिल्लक' टाकून भांडवल जमवले. या दंतकथेचा मार्क्सने 'भांडवल' या आपल्या ग्रंथात चांगलाच परामर्श घेतला आहे; त्यातील एक उतारा पुढे दिला आहे :

"(खिस्ती) पुराणात आदि-मानवाच्या पहिल्या मूळ पतनाला जे स्थान आहे तेच अर्थशास्त्रात या प्राथमिक धनसंचयाला आहे. आदमने ते फळ खाल्ले

आणि मानवजातीचा अधःपात झाला;...तसेच....फार फार वर्षांपूर्वी पृथ्वीच्या पाठीवर दोन प्रकारची माणसे राहात होती; पहिल्या प्रकारची माणसे हुशार, कामसू व मुख्य म्हणजे काटकसरी होती; आणि दुसऱ्या प्रकारची माणसे आळशी बदमाश व चैनीत पैशाची उधळपट्टी करणारी होती... अखेरीस पहिल्या प्रकारच्या लोकांजवळ पैसा साठला आणि दुसऱ्या प्रकारच्या लोकांवर अशी पाळी आली की त्यांना स्वतःला विकून पोट जाळण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नाही आणि आदिकालातील या मूळ पापातूनच बहुसंख्य लोकांचे दारिद्र्य जन्माला आले; त्यामुळेच या राबणाऱ्यांना स्वतःला विकण्याखेरीज जगण्याचे साधन उरलेले नाही; आणि अगदी थोड्या श्रीमंत लोकांची संपत्ती मात्र, त्यांनी काम करण्याचे कधीच सोडून दिले आहे तरी सतत वाढत आहे." (**भांडवल**, खंड १ ला, प्रकरण २६)

भांडवलाची वाढ आणि तिचे परिणाम

परंतु भांडवलाची पातळी नंतर प्राथमिक संचयाइतकीच राहिली नाही ते अफाट प्रमाणावर वाढले आहे. प्राथमिक भांडवलाचा संचय प्रत्यक्षपणे लुटालूट करून झाला असला तरी त्यानंतर त्याच्यात ही जी विलक्षण वाढ झाली आहे ती कशी झाली?

मार्क्सने उत्तर दिले : अप्रत्यक्ष लुटालुटीने. कामगारांना त्यांच्या जीवनाला लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाच्या काळापेक्षा अधिक काळ काम करायला लावून, त्या काळातील मूल्य—'वरकड मूल्य—' भांडवलदार लुबाडून घेतात. या वरकड मूल्यातील एक हिस्सा भांडवलदार स्वतःच्या उपयोगासाठी वापरतो, शिल्लक राहिलेली संपत्ती **नवे भांडवल** म्हणून वापरतो, म्हणजे ते तो आपल्या पहिल्या भांडवलात मिळवितो; मग तो अधिक कामगारांना कामावर ठेऊ शकतो आणि उत्पादनाच्या नंतरच्या फेऱ्यांत अधिक वरकड मूल्याचा मालक बनतो; याचा अर्थ त्याचे भांडवल आणखी वाढते–आणि असेच अनंतकाळपर्यंत चालू राहाते.

किंवा खरे पहाता असे म्हणायला हवे की, ते असेच अनंतकाळपर्यंत चालू राहिले असते; पण तसे ते चालू रहात नाही, कारण इतर आर्थिक व सामाजिक नियमांचाही प्रभाव पडावयास लागतो.

दूरवर विचार करता सर्वांत महत्त्वाचा अडथळा असतो वर्गलढ्याचा. वर्गलढ्याने या एकंदर प्रक्रियेलाच वेळोवेळी खीळ पडते आणि वर्गलढाच अखेर भांडवली उत्पादन बंद पाडतो. परंतु भांडवलशाहीच्या सुरळीत विकासाच्या मार्गात इतरही अडथळे असतात. भांडवलशाहीच्या मूळ स्वरूपातच त्यांचा उगम होतो.

आर्थिक अरिष्टे येऊ लागतात. ती भांडवलाच्या विकासाला खीळ घालतात आणि कित्येकदा आधी साठविलेल्या भांडवलाचा हिस्साही धुळीला मिळवितात. (कम्युनिस्ट जाहीरनाम्यात) मार्क्सने या अरिष्टासंबंधी म्हटले आहे :

"ह्या अरिष्टांच्या वेळी जणू काय एका रोगाची साथ सुरू होते. त्याचे नाव अति उत्पादन. पूर्वीच्या कोणत्याही युगातील लोकांना हे अशक्यच वाटले असते." सरंजामदारी समाजात गव्हाचे पीक अमाप आले तर सर्वांना पोटभर खायला मिळत असे; भांडवदालारी समाजात गव्हाचे पीक फार आले तर अनेक कामगारांना बेकारीमुळे उपासमारीने मरण्याची पाळी येते; कारण सर्व गहू विकला जात नाही, त्यामुळे पुढच्या वर्षी त्यांना कमी गव्हाची लागवड करायची असते आणि म्हणून शेतावरच्या अनेक कामगारांना बेकार करण्यात येते.

भांडवलशाहीतील आर्थिक अरिष्टे आता सर्वांच्या परिचयाची झालेली आहेत. अति-उत्पादन झाले म्हणजे मग नव्या उत्पादनात काट करण्यात येते, त्यामुळे कामगार बेकार होतात; कामगार बेकार होतात याचाच अर्थ बाजारात मालाला मागणी आणखी कमी होते. म्हणून मग आणखी कारखाने उत्पादन कमी करतात; नवे कारखाने उघडले जात नाहीत आणि काही जुने तर मोडले जातात; इंग्लंडच्या ईशान्य किनाऱ्यावरील जहाजे बांधण्याच्या गोद्यांत किंवा लँकेशायरच्या गिरण्यांत गहू व इतर पदार्थ जाळण्यात येतात; त्याच वेळी बेकारांच्या घरांत उपासमार व आजारीपणाचे थैमान चालू असते. असा हा मूर्खाचा बाजार चालू होतो; पण अखेरीस उत्पादनाचा साठा संपतो किंवा नष्ट केला जातो. पुन्हा उत्पादन वाढू लागते, व्यापार वाढतो, पुन्हा रोजगार मिळू लागतो. एक दोन वर्षे सर्वत्र तेजी येते. उत्पादनाची अमर्याद वाढ होणार असा आभास निर्माण होतो, आणि तितक्यात पुन्हा अति उत्पादनाची परिस्थिती निर्माण होते, अरिष्ट येते आणि पुन्हा एकदा पूर्वीप्रमाणेच हे चक्र फिरू लागते.

आर्थिक अरिष्टांचे मूळ कशात आहे ?

या अरिष्टांचे कारण काय ? मार्क्स म्हणतो : भांडवलदारी उत्पादनाचा हा नियम आहे की, भांडवलाचा प्रत्येक विभाग अधिकाधिक नफा कमाविण्यासाठी आपला पसारा वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न करतो; अधिक उत्पादन करून, अधिक विक्री करण्याचा प्रयत्न करतो. ज्याच्या जवळ अधिक भांडवल तो अधिक उत्पादन करतो. पण त्याच बरोबर, अधिक भांडवल गुंतविले गेले कीं कमी कामगारांना कामावर घेतले जाते; कामगारांच्या जागी यंत्रे काम करू लागतात, (उद्योगधंद्यांत "रॅशनालायझेशन" सुरू होते). याचा अर्थ असा नव्हे की अधिक भांडवल तर अधिक उत्पादन पण कमी रोजगार व त्यामुळे मालाला मागणीही कमी. (कदाचित एक गोष्ट सांगायला हवी. याचा अर्थ असा नव्हे की कारखान्यात वाटल्या जाणाऱ्या एकूण वेतनातच घट येते. ही घट सापेक्ष अमते आणि त्यातूनच साधारणतः अरिष्टे निर्माण होतात–तेजीच्या काळात एकूण वेतनात वाढही होऊ शकते; पण ही वाढ एकूण उत्पादनाच्या मानाने कमी असते. आणि त्यामुळे उत्पादनाच्या मानाने मागणी कमी होते.)

भांडवलाचा विस्तार आणि कामगारांकडून मालाच्या मागणीचा तुलनात्मक संकोच हेच अरिष्टांचे प्रमुख कारण आहे. परंतु अरिष्ट कोणत्या क्षणी येईल आणि कोणत्या तऱ्हेने येईल हे विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून राहते. उदाहरणार्थ, १९५० पासून अमेरिकेत शस्त्रास्त्रांचे अफाट उत्पादन सुरू झाले आहे–भांडवलदारी नित्याच्या उत्पादनापेक्षा सरकारी "मागणी" बरहुकूम होणारे हे उत्पादन निराळ्या स्वरूपाचे आहे, त्यामुळे आर्थिक अरिष्ट येणे कदाचित लांबणीवर पडेल; कदाचित ते अंशतः लपविले जाईल; पण ते येणार हे नक्की.

याशिवाय, भांडवलशाहीच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा घटक असतो, तो म्हणजे चढाओढ. भांडवलदारी पद्धतीतील प्रत्येक घटकाप्रमाणे याचेही दुहेरी परस्परविरोधी परिणाम घडत असतात. आपला माल अधिक प्रमाणावर विकण्यासाठी चढाओढ करणारे भांडवलदार मुख्यतः वेतनखर्चात बचत करून उत्पादनाचा खर्च कमी करण्यासाठी धडपडू लागतात. त्यासाठी ते सरळ सरळ पगार कापतात किंवा कामवाढीचे अनेक मार्ग हाताळतात. त्याच वेळी ज्यांना पुरेसे भांडवल मिळालेले असते असे भांडवलदार तांत्रिक सुधारणा घडवून आणतात, कमी कामगारांना कामावर ठेवतात आणि अशा

रीतीने एकूण वेतनात घट करून बाजारातील मालाच्या मागणीतही घट निर्माण करतात.

स्पर्धायुक्त भांडवलशाहीचे मक्तेदारी भांडवलशाहीत परिवर्तन

तरीदेखील, तांत्रिक सुधारणा करणाऱ्या कारखान्यांना काही काळपर्यंत नफ्याचा दर अधिक मिळतो. त्यानंतर त्या कारखान्यांशी चढाओढ करणारे भांडवलदार त्याचे अनुकरण करतात आणि कामगारकपात करतात. परंतु सर्वच भांडवलदार असे करू शकत नाहीत. कारखाने जसे मोठे होत जातात तसे त्यांच्या आधुनिकीकरणासाठी भांडवलही फार मोठ्या प्रमाणावर लागू लागते आणि अशा कंपन्या फार थोड्या असतात. बाकीच्या सर्व कंपन्या चढाओढीत हार खातात, त्यांचे दिवाळे वाजते आणि त्यांचे कारखाने मोठे भांडवलदार आपल्या हातात घेतात अगर ते बंद पडतात. 'एक भांडवलदार अनेकांना ठार मारतो.'

"अशा रीतीने, उद्योगधंद्याच्या प्रत्येक शाखेतील स्वतंत्र कंपन्यांची [कारखाने वगैरे चालविणाऱ्या भांडवलदारांच्या गटांची] संख्या कमी कमी होत जाते; मोठमोठे ट्रस्ट स्थापन होतात आणि ते त्या-त्या धंद्यावर प्रभुत्व गाजवू लागतात. अशा रीतीने भांडवलदारी चढाओढीतून त्याचा अगदी विरोधी पर्याय–भांडवलदारी मक्तेदारी निर्माण होते. भांडवलदारी मक्तेदारीचे खास विशिष्ट गुणधर्म असतात; त्यांची चर्चा पुढील प्रकरणात केली आहे.

साम्राज्यशाही : भांडवलशाहीची अंतिम अवस्था

रूढ अर्थाने साम्राज्यशाही म्हणजे राज्यविस्ताराचे धोरण; साम्राज्य स्थापन करण्याच्या हेतूने मागासलेले देश जिंकण्याचे धोरण. या धोरणात आपल्या देशाचे निशाण शक्य तेवढ्या विस्तृत प्रदेशावर फडकलेले पाहण्याच्या अमूर्त इच्छेहून अधिक काही तरी आहे या दृष्टीने विचार करता असे दिसून येते की, या विस्तारवादी धोरणाच्या मागे काहीतरी आर्थिक कारण असते. उदाहरणार्थ, कधी कधी असे म्हटले जाते की त्याच्या मागचे कारण बाजारपेठांचा शोध हे असते, किंवा नवा कच्चा माल आणि अन्नासाठी चाललेला शोध हे असते; किंवा स्वदेशात लोकवस्ती फार वाढली, तिला बाहेर पडण्यासाठी रस्ता मोकळा करून दिला पाहिजे म्हणून जमिनीसाठी घेतलेला शोध, हे असते.

परंतु परदेशांत उत्तम बाजारपेठा मिळू शकतात. कच्च्या मालाचा आणि अन्नधान्याचा पुरवठा परदेशातून होऊ शकतो आणि वस्ती करण्यासाठी जमीन पाहिजे म्हणावे तर स्वदेशातील जनतेला देशोधडीला लावून दुसऱ्या कोणाच्या तरी देशात चरितार्थाचे साधन शोधायला कोण लावते? ही परिस्थिती भांडवलशाहीच निर्माण करते. तेव्हा साम्राज्यवादी विस्ताराची कारणे वेगळीच असली पाहिजेत. ती कोणती?

आधुनिक साम्राज्यशाहीबद्दलचे पहिले मार्क्सवादी विश्लेषण लेनिननी केले. लेनिननी दाखवून दिले की, साम्राज्यशाहीचे खास वैशिष्ट्य म्हणजे भांडवलाची निर्यात. जिंकलेल्या देशांत भांडवल पाठविणे आणि तेथे तयार माल पाठविणे, यांत फरक आहे. भांडवल निर्यातीची ही नवी प्रथा खुद्द भांडवलशाहीमध्ये घडून आलेल्या बदलांचा परिणाम असते आणि म्हणून लेनिननी साम्राज्यशाहीचे वर्णन भांडवलशाहीची एक खास अवस्था असे केले.—ज्या वेळी प्रमुख भांडवलदारी देशांत मक्तेदारी फार मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित झालेली असते त्या वेळची ही अवस्था.

औद्योगिक भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या दिवसांत कारखाने, खाणी वगैरे उद्योगधंदे फारच लहान होते. ते एखाद्या कुटुंबाच्या अगर भागीदारांच्या लहानशा गटाच्या मालकीचे असत. भांडवल थोडे लागे आणि हे गट ते उभे करू शकत. परंतु पुढे नवे नवे तांत्रिक शोध लागू लागले आणि तांत्रिक प्रगतीबरोबर अधिक भांडवलाची गरज भासू लागली. एकीकडे हे घडत असताना दुसरीकडे प्रथम इंग्लंड व नंतर इतर देशांत हस्तोद्योगांना बाजूला सारून औद्योगिक मालाची बाजारपेठ एकसारखी वाढत चालली होती. साहजिकच कारखान्यांचा आकारही झपाट्याने वाढू लागला. रेल्वे व आगबोटी चालू होताच; प्रथम लोखंडाचे व पुढे पोलादाचे उद्योग वाढू लागले आणि कारखाने अधिकाधिक मोठे बनू लागले. धंदा कोणताही असला तरी कारखाना जितका मोठा तितका आर्थिकदृष्ट्या तो अधिक फायद्याचा, अधिक नफा देणारा ठरू लागला आणि जोराने वाढू लागला. लहान कारखाने चढाओढीत मागे पडून बंद झाले अगर मोठ्या प्रतिस्पर्ध्यांनी ते स्वतःच्या ताब्यात घेतले.

अशा रीतीने, दुहेरी क्रिया सुरू झाली; उत्पादन मोठमोठ्या कारखान्यांतून केंद्रित होऊ लागले आणि त्याच वेळी मूठभर अतिधनाढ्यांच्या नियंत्रणाखालील उत्पादनाचे प्रमाणही एकसारखे वाढू लागले.

आपल्या काळातही ही प्रक्रिया घडत होती, ही गोष्ट मार्क्सच्या ध्यानात आली होती. तंत्रदृष्ट्या वाढते केन्द्रीकरण होत आहे, उत्पादन मोठ्या कारखान्यात एकवटत आहे आणि उत्तरोत्तर लहान होत जाणाऱ्या मूठभर व्यक्तींच्या गटाकडे भांडवलाची मालकी आणि नियंत्रण जात असून, या गटाच्या हातात भांडवल एकवटत चालले आहे, या गोष्टीकडेही मार्क्सने जनतेचे लक्ष वेधले होते. त्याने इशारा दिला होता की, याचा अपरिहार्य परिणाम म्हणून भांडवलदारांत चालणाऱ्या स्वतंत्र चढाओढीच्या जागी मक्तेदारी येईल आणि त्यामुळे भांडवलदारी उत्पादनात अंतर्भूत असलेल्या अडचणी फारच तीव्र स्वरूप धारण करतील.

साम्राज्यशाहीची प्रमुख आर्थिक वैशिष्ट्ये

२० व्या शतकाच्या प्रारंभी, अर्थशास्त्रावरील लेखकांनी (आणि विशेषत: ब्रिटनमध्ये जे. ए. हॉबसन यांनी) अनेक धंद्यांतून प्रस्थापित झालेल्या मक्तेदारीची नोंद घेण्यास सुरुवात केली होती. १९१६ साली, पहिले महायुद्ध

चालू असताना, लेनिननी "**साम्राज्यशाही : भांडवलशाहीची सर्वोच्च अवस्था**" हा ग्रंथ लिहिला; त्यात त्याने मक्तेदाऱ्यांसंबंधी ज्ञात असलेली विविध माहिती एकत्रित मांडली आणि मक्तेदारीच्या राजकीय, सामाजिक व निव्वळ आर्थिक स्वरूपासंबंधीही निष्कर्ष काढले. मार्क्सच्या मृत्यूनंतर झालेल्या घडामोडींचा अभ्यास करून त्याने मार्क्सने काढलेल्या निष्कर्षांचा अधिक विस्तार व विकास केला. सन १९०० पर्यंत प्रस्थापित झालेल्या भांडवलशाहीच्या सर्वांत उच्च, म्हणजे साम्राज्यशाही अवस्थेची, पाच प्रमुख आर्थिक वैशिष्ट्ये लेनिननी पुढीलप्रमाणे सांगितली आहेत :

(१) उत्पादन व भांडवल यांचे इतके केंद्रीकरण झाले आहे की, त्यातून मक्तेदाऱ्या निर्माण झाल्या आहेत आणि आर्थिक जीवनावर त्यांचा फार मोठा परिणाम झाला आहे.

प्रत्येक भांडवलदारी देशात ही अवस्था निर्माण झाली आहे. पण जर्मनीत व अमेरिकेत ती सर्वांत अधिक प्रमाणात अस्तित्वात आली आहे. इतर सर्वत्रही ह्या क्रियेचा विकास चालू आहे. (ब्रिटनमधील प्रत्येकी १० कोटींवर भांडवल असलेली इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीज व युनिलीव्हर ही त्याची उदाहरणे आहेत.) या कालात प्रत्येक धंद्यातील व्यापाराचा मोठा भाग कोणत्यातरी मूठभर मोठ्या कंपन्यांच्या ताब्यात असतो; त्यांचेही एकमेकांशी किंमती ठरविण्याबद्दल वगैरे करार झालेले असतात आणि अशा रीतीने प्रत्येक धंद्यात एक संयुक्त मक्तेदारी निर्माण होते.

(२) बँक भांडवल औद्योगिक भांडवलात मिसळून गेले असून, प्रत्येक देशात "भांडवल पुरवठा" करणाऱ्यांचा म्हणजे मूठभर बँक भांडवलवाल्यांची, अधिसत्ता स्थापन झाली आहे. आणि देशाच्या जीवनाच्या सर्व नाड्या त्यांच्या हातात केंद्रित झाल्या आहेत.

या मुद्याचे थोडेसे विवेचन केले पाहिजे. सुरुवातीच्या काळात औद्योगिक भांडवलदार बँकवाल्यांपेक्षा निराळे होते; त्या वेळी बँक-मालक भांडवलदारांना धंद्यासाठी पैसे देत असत आणि त्यांना मिळणाऱ्या फायद्याचा हिस्सा ते व्याजाच्या रूपाने घेत असले तरी उद्योगधंद्यात त्यांचे प्रत्यक्ष हितसंबंध गुंतलेले नसत. परंतु पुढे जेव्हा उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर शेअर कंपन्या

निघू लागल्या, तेव्हा बँक-मालक औद्योगिक कंपन्यांचे शेअर्स घेऊन उद्योगधंद्यात शिरले; आणि श्रीमंत उद्योगपति बँकांचे शेअर्स घेऊ लागले. अशा प्रकारे अत्यंत श्रीमंत भांडवलदार–मग त्यांची सुरुवात उद्योगपती म्हणून झालेली असो, की बँकर म्हणून झालेली असो–अखेर बँकर-उद्योगपती बनले. भांडवल-कार्याची विविध सूत्रे एकाच गटाच्या हातात पडल्यामुळे त्यांचे सामर्थ्य भरमसाठ वाढले. (विशेषतः ब्रिटनमध्ये तर बडे जमीनदारसुद्धा या गटात विलीन झाले.) ज्या धंद्यांशी बँकेचा असा संबंध असेल त्यांना कर्ज देऊन आणि ज्या कंपन्या त्यांच्या धंद्याकडून माल घेतील त्यांनाच कर्ज देण्याचा करार करून, बँका आपल्या गटातील धंद्यांना मदत करू लागल्या. अशा रीतीने या बँकभांडवलदारांची संपत्ती वेगाने वाढली आणि एका मागून दुसऱ्या धंद्यावर त्यांनी आपले नियंत्रण बसविले; आणि मग त्यांच्या प्रत्येक शब्दाला सत्ताधाऱ्यांकडूनही मान मिळू लागला हे सांगायलाच नको.

बँकांचे उद्योगधंद्यांशी हे जे मीलन घडते त्याचे सर्वोत्कृष्ट उदाहरण द्यायचे तर बँकांचे डायरेक्टर्स वाढत्या प्रमाणात इतर कंपन्यांचेही डायरेक्टर्स होत चालले आहेत, हे आहे. पण याचा अर्थ असा नसतो की, या सर्व उद्योगधंद्यांची मालकी बँकांच्याकडे असते. मुद्दा हा आहे की, बँकेच्या क्षेत्रातील बडी धेंडेच उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या क्षेत्रातील बड्या व्यक्ती बनतात. उदाहरणार्थ, ज्यांच्या भांडवलाचा ओघ साऱ्या ब्रिटिश भांडवलशाहीमध्ये वहात आहे त्या श्रीमंत व्यक्तींचा गट हा एकच आहे. "बडे पांच" या नावाने पुढे प्रसिद्धीस आलेले बँक-डायरेक्टर्स आणि बँक ऑफ इंग्लंड यांच्याकडे १८७० मध्ये १५७ इतर कंपन्यांची डायरेक्टरशिप होती; १९१३ मध्ये ती ३२९ कंपन्यांची झाली आणि १९३९ मध्ये त्यांच्या हाती ११५० कंपन्यांची डायरेक्टरशिप आली. या आकड्यांचे खरे महत्त्व लक्षात येण्यासाठी ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, १९३९ च्या आकड्यात युनिलीव्हर व इंपीरियल केमिकल इंडस्ट्रिज अशा बड्या कंपन्यांचाही समावेश होता आणि खुद्द या कंपन्यांनीच अनेक लहान लहान कंपन्या गिळंकृत केलेल्या होत्या.

(३) या काळात वस्तूंच्या निर्यातीपेक्षाही भांडवलाच्या निर्यातीचे महत्त्व वाढू लागले.

भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या काळात, ब्रिटनमधून इतर देशांत कापड व इतर तयार माल निर्यात होत असे आणि त्यांच्या बदली ब्रिटनमध्ये तेथील स्थानिक माल आयात होत असे; अशा रीतीने तयार मालाच्या बदली ब्रिटन आपल्या उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल व अन्न मिळवीत असे. परंतु गेल्या शतकाच्या उत्तरार्धात आणि त्यातही विशेषतः त्याच्या अखेरी अखेरीस बँक भांडवलदार भांडवलाच्या निर्यातीत जास्त जास्त लक्ष घालू लागले. आता त्यांचा हेतू व्यापारातला फायदा मिळविणे हा नव्हता; दिलेल्या भांडवलावर सालोसाल व्याज मिळविणे हा होता. परदेशी सरकारांना आणि कंपन्यांना कर्जाऊ पैसे देणे, किंवा रेल्वे, बंदरे अगर खाणी उभारण्यासाठी पैसा पुरविणे –ब्रिटिश वसाहतींना भांडवलाची निर्यात होई ती या मार्गाने आणि ही निर्यात एका अटीवर करण्यात येई. ती अट अशी की, या उद्योगांच्या उभारणीसाठी लागणारा माल या बँकांशी संबंध असलेल्या ब्रिटिश औद्योगिक कंपन्यांकडूनच घेतला पाहिजे. अशा रीतीने बँक-भांडवलाच्या दोन्ही शाखा अमाप नफा मिळवू लागल्या आणि त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या मालाची नाकेबंदी केली.

(४) भांडवलदारांचे आंतरराष्ट्रीय मक्तेदारी संघ स्थापन झाले आणि त्यांनी आपापसांत जगाची वाटणी करून घेतली.

हा प्रकार पोलाद, तेल इत्यादि धंद्यांतून प्रामुख्याने अस्तित्वात आला; निरनिराळ्या देशांतील मक्तेदारी गटांनी एकूण परदेशी व्यापारातील आपापले हिस्से ठरवून घेतले, पुष्कळदा बाजारपेठांची वाटणी करण्यात आली व किंमतीही निश्चित करण्यात आल्या (अशा स्वरूपाच्या त्यांच्या करारांच्या मर्यादांची चर्चा पुढे करण्यात आलेली आहे.)

(५) बड्या भांडवलदारांनी जगाचा भौगोलिक प्रदेशही जवळजवळ संपूर्णपणे वाटून घेतला. (१८७६ मध्ये आफ्रिकेचा फक्त ११ टक्के भाग युरोपियन राष्ट्रांच्या ताब्यात होता; १९०० मध्ये ९० टक्के भाग त्यांनी पादाक्रांत केला.)

या गोष्टीचे महत्त्व असे की, जगाची वाटणी झाल्यामुळे नवे नवे दुबळे देश जिंकून घेणे त्यानंतर सोपे राहिले नाही. अतिधनाढ्य राज्यातील बँक-भांडवलदार गटांना **एकमेकांचे गळे कापल्याखेरीज** स्वतःच्या नियंत्रणाखालील प्रदेशांचा विस्तार करणे आता अशक्य होऊन बसले—म्हणजेच जगाच्या

फेरवाटणीसाठी प्रचंड प्रमाणावर युद्धे करणे आणि विजय मिळवून आपल्याला अनुकूल अशी वाटणी करून घेणे हाच एक मार्ग त्यांना शिल्लक उरला.

साम्राज्यशाहीचे विविध परिणाम

या प्रश्नाबाबत लेनिननी मांडलेल्या अनेक मुद्यांपैकी एक मुद्दा आजच्या परिस्थितीत खास लक्षात घेण्यासारखा आहे. साम्राज्यविस्तारासाठी ही प्रत्येक साम्राज्यवादी देशाची जी धडपड चाले तिचा हेतू वासाहतिक देश पादाक्रांत करणे एवढाच आहे असे काही लोक मानीत. लेनिननी सांगितले असेच नाही; ही धडपड केवळ मागासलेल्या देशांविरुद्धच होती असे नाही; तर परिस्थिती अनुकूल असल्यास युरोपातील इतर राज्यांच्या विरुद्धही तिचा रोख असे. नाझींच्या कालखंडात जर्मन भांडवलदारांनी याच मार्गाचा अवलंब केल्याचे आपल्याला माहीतच आहे.

लेनिननी काढलेल्या या निष्कर्षांतील सत्य आता अनुभवाने सिद्ध झालेले आहे; त्याच्या आधारावर त्याने पुढे सांगितले की, भांडवलशाहीच्या साम्राज्यवादी अवस्थेत, अधिक तीव्र स्वरूपाची आर्थिक अरिष्टे आणि जागतिक प्रमाणावरील युद्धे यांचा उद्भव होतो; त्याचबरोबर कामगार क्रांत्या व साम्राज्यवादी शोषणाविरुद्ध वसाहत व निम-वसाहत राष्ट्रांतील जनतेच्या उठावांचाही उद्भव होतो.

मूठभर लोकांच्या लहान गटांच्या हातात भांडवल केंद्रित होताच, या गटांनी राज्य-यंत्रणेवरही अधिकाधिक ताबा मिळविला; आणि त्यामुळे निरनिराळ्या राष्ट्रांच्या सरकारांची धोरणे या संकुचित गटांच्या हिताशी निगडीत झाली. यामुळेच, प्रत्येक देशातील बँक-भांडवलार गटाला परकीय प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध जकाती, व्यापारी नियंत्रणे वगैरे बसविणे आणि अखेरीस युद्ध पुकारून त्यांना दाबण्याचा प्रयत्न करणे शक्य होऊ लागले.

निरनिराळ्या प्रतिस्पर्धी गटांत हा संघर्ष अपरिहार्यपणे का निर्माण होतो ? त्यांना परस्परांत जगाची वाटणी करून घेण्याचा करार करणे का जमत नाही ?

निरनिराळ्या देशांतील मक्तेदारी गट जगाच्या बाजारपेठा आपसात वाटून घेण्यासाठी करार करतात, असे वर म्हटले आहे; त्यावरून चढाओढ संपूर्णपणे नष्ट होऊन, भांडवलदारांचे आंतरराष्ट्रीय हितसंबंध कायमचे एक होतात, असा

आभास निर्माण होण्याचा संभव आहे; परंतु लेनिननी उदाहरणे देऊन दाखवून दिले की, असे आंतरराष्ट्रीय करार कधीच फार काळ टिकत नाहीत. समजा, १९५० साली इंग्लंड, अमेरिका, जर्मनी व फ्रान्स या राष्ट्रांनी जगाच्या बाजार-पेठांच्या वाटणी-संबंधी करार केला; तर हा करार त्या वेळच्या या राष्ट्रांच्या उत्पादनक्षमतेच्या परिस्थितीला अनुरूप असा असेल. परंतु विषम विकास हा भांडवलदारी उत्पादनाचा एक प्रमुख नियम आहे. त्यामुळे यापैकी कोणत्याही राष्ट्रातील गटाचे उत्पादनसामर्थ्य वाढले की, पहिला करार त्यांना असमाधानकारक वाटू लागतो आणि ते तो धुडकावून लावतात. इतर गटांनी जर तावडतोब माघार घेतली नाही तर पुन्हा बाजारपेठेसाठी एक नवा आणि पूर्वीपेक्षाही तीव्र संघर्ष सुरू होतो. सर्व करारांचा शेवट वास्तविक असाच होतो; आणि असमान विकासाचा हा नियम केवळ काही विशिष्ट औद्योगिक गटांनाच लागू असतो असे नाही; देशोदेशींच्या भांडवलांनाही तोच नियम लागू असल्यामुळे हे आर्थिक करार निरनिराळ्या देशांतील बँक-भांडवलदारांत सतत चालणाऱ्या व्यापारी युद्धातील मध्यंतरीचे तात्पुरते शांतता-तह मात्र ठरतात.

साम्राज्यशाही युद्धे आणि मार्क्सवादाचे धोरण

परंतु केवळ आर्थिक युद्धाने प्रश्न सुटत नाही. म्हणून, बँक-भांडवलदार प्रथम आपापल्या राष्ट्रांतील राज्यसत्तेच्या साहाय्याने, प्रतिस्पर्ध्याविरुद्ध व्यापारी जकाती बसवतात, आयातीवर नियंत्रण बसवून घेतात, दुसऱ्या देशाबरोबर स्वहिताला अग्रक्रम देणारे करार घडवून आणण्याचे प्रयत्न करतात, आपली मक्तेदारी असलेल्या प्रदेशांचा विस्तार करू पाहतात, आणि अखेरीस युद्धाची तयारी करतात. अशा युद्धांत विजय मिळाल्यास आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध तात्पुरता वरचढपणा प्रस्थापित करण्याची त्यांची मनीषा असते.

प्रत्येक देशातील बँक-भांडवलदारांच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होताच त्याचा परिणाम जागतिक स्वरूपाची युद्धे, बड्या राष्ट्रांमध्ये घनघोर लढाया निर्माण होण्यात झाला; अशारीतीने उत्पादनाचे व भांडवलाचे केंद्रीकरण या दिसायला पूर्णपणे आर्थिक स्वरूपाच्या प्रक्रियेतून सामाजिकदृष्ट्या महाभयंकर अशा युद्धापर्यंत आपण ओढले गेलो आहोत.

युद्धाकडे पाहण्याचा मार्क्सवादी दृष्टिकोन पोकळ शांततावादी नाही. मुलुखगिरीसाठी केलेल्या साम्राज्यवादी युद्धाचा, तसेच स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या परतंत्र राष्ट्रांतील जनतेला चिरडणाऱ्या साम्राज्यवादी युद्धांचा मार्क्सवाद धिक्कार करतो. या युद्धांना मार्क्सवाद अन्याय्य युद्धे समजतो. परंतु साम्राज्यवाद्यांच्या मुलुखगिरीचा प्रतिकार करण्यासाठी अगर स्वातंत्र्यासाठी चालणाऱ्या जनतेच्या युद्धांना मार्क्सवाद न्याय्य समजतो, त्याचप्रमाणे शोषण नष्ट करण्यासाठी चालणाऱ्या देशांतर्गत यादवी युद्धांनाही तो पाठिंबा देतो. कारण शोषण करणाऱ्यांचा पराभव करून जनतेने विजय मिळविला तरच युद्धांना जन्म देणाऱ्या परिस्थितीचा नायनाट करता येतो.

एखाद्या साम्राज्यवादी देशाच्या सरकारने जर अन्यायाने युद्ध सुरू केले असेल तर त्याला सर्वशक्तिनिशी विरोध करणे हे त्या देशातील कामगारवर्गाचे कर्तव्य आहे; आणि कामगारवर्गाची ताकद चांगली संघटित व भक्कम असेल तर त्याने या काळात आपल्या सरकारचा पाडाव करून सत्ता हातात घेतली पाहिजे, युद्धाचा शेवट केला पाहिजे, आणि समाजवादाकडे जाण्याचा मार्ग मोकळा करून घेतला पाहिजे.

प्रतिस्पर्धी साम्राज्यवादी देशांमधील चढाओढीमुळे सर्वसाधारण परिस्थिती अधिकच विकोपाला जाते. तांत्रिक रॅशनलायझेशनच्या–म्हणजे कामगारांना बेकार करणाऱ्या यंत्रांच्या साहाय्याने फार मोठ्या प्रमाणावर कामवाढ केली जाते. उत्पादनखर्च कमी करण्यासाठी आणि बाजारपेठ मिळविण्यासाठी किंवा टिकविण्यासाठी पगार-कपात लादण्यात येते. शेतीमालाला मक्तेदार भांडवलदार गट कमी किंमती ठरवून देतात. युद्धाच्या तयारीसाठी व शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठी समाजकल्याण कार्यावरील खर्च एकदम कमी करण्यात येतो. अधिक तीव्र व अधिक दीर्घ मुदतीची आर्थिक अरिष्टे येऊ लागतात.

या सर्व कारणांमुळे वर्गलढे व वसाहती राष्ट्रांचे स्वातंत्र्यलढेही अधिक तीव्र होतात; भांडवलशाहीची साम्राज्यवादी अवस्था हा केवळ युद्धाचाच नव्हे तर क्रांत्यांचाही कालखंड ठरतो.

अतिरिक्त नफा आणि पुढारलेल्या देशांतील कामगारवर्ग

साम्राज्यशाहीच्या अवस्थेतील भांडवलशाहीचे आणखी एक वैशिष्ट्य लेनिनने शोधून काढले, ते हे की, या काळात **साम्राज्यशाही राष्ट्रांतील**

मक्तेदारी गट मागासलेल्या राष्ट्रांकडून सर्वसामान्य सरासरी नफ्यापेक्षा अतिरिक्त नफा, अधिक नफा; मिळवू लागतात. त्याला कारणे अनेक आहेत; पहिले हे की वसाहत देश मागासलेले असल्यामुळे त्यांच्या उत्पादनपद्धती पुराणकाळच्या असतात आणि राहणीमान कमी दर्ज्याचे असते. दुसरे कारण हे की, साम्राज्यवादी सत्तांनी व भांडवलदारांनी त्यांना अत्यंत निर्घृणपणाने विकट अवस्थेत दडपलेले असते. तिसरे कारण हे की, यंत्रोत्पन्न माल व हस्तोत्पन्न माल यांचा विनिमय होताना यंत्रोत्पन्न मालाला भरमसाट नफा मिळविता येतो. (येथे केवळ पैशाच्या दृष्टीने विचार केलेला नाही, तर विनिमय होणाऱ्या प्रत्यक्ष वस्तूंच्या दृष्टीने विचार अभिप्रेत आहे.) कारण कोणत्याही उत्पादनाचे विनिमयमूल्य त्याच्या उत्पादनाला लागलेल्या सामाजिक आवश्यक श्रमावरूनच ठरत असते. म्हणून ब्रिटनमध्ये १ वार कापड यंत्रावर तयार करण्याला जो सामाजिक आवश्यक श्रमकाल खर्ची पडतो, तो तितकेच कापड हातमागावर तयार करायला लागणाऱ्या श्रमकालाच्या केवळ $\frac{1}{40}$ किंवा $\frac{1}{50}$ असतो. परंतु इंग्लंडमध्ये यंत्रावर तयार झालेले कापड जेव्हा हिंदुस्तानात येते तेव्हा त्याची अदलाबदल १ वार हिंदी कापडाच्या मूल्याशी होते. याचाच अर्थ असा की, हिंदुस्तानात त्याचा विनिमय इंग्लंडमधील त्याच्या मूल्यापेक्षा कितीतरी अधिक मूल्याबरोबर होतो. ह्या जास्त मूल्याचा कच्चा किंवा इतर हिंदी माल जेव्हा इंग्लंडमध्ये आणला जाऊन तेथे विकला जातो तेव्हा १ वार ब्रिटिश कापड ब्रिटनमध्येच विकून ब्रिटिश भांडवलदाराला जो फायदा मिळाला असता त्याच्या कितीतरी पट अधिक फायदा त्याला या मार्गाने मिळतो. दोन्ही देशांत तशीच यंत्रे असली तरी सुद्धा तंत्रज्ञानातील वेगळ्या पातळीमुळे असाच फरक पडतो आणि परिणामी, मोठ्या प्रमाणावर नफा मिळतो. असा हा ज्यादा नफा केवळ कापडावरच नव्हे तर सर्व पदार्थांवर मिळत राहतो आणि बँक-भांडवलदार गट अमाप पैसा कमावतात; उदाहरणार्थ एलरमनने ४ कोटी पौंडांची व यूलने २ कोटी पौंडांची मालमत्ता या नफ्यातूनच जमविली आहे.

वसाहत देशांतून उकळल्या जाणाऱ्या या अतिरिक्त नफ्याचा कामगार चळवळीशी एक खास संबंध आहे. मार्क्सने प्रथमच निदर्शनास आणले होते की, ब्रिटिश भांडवलदारांनी जगभर यंत्रोत्पन्न माल विकण्याच्या क्षेत्रात आघाडी मारल्यामुळे कोट्यवधी रुपयांची संपत्ती मिळविली आणि या संपत्तीमधून

कामगारवर्गाच्या दडपणापुढे मान वाकवून त्यातील एका विभागाच्या (कुशल व तंत्रविशारद कामगारांच्या) मागण्या त्यांना पुरवता आल्या. त्यामुळे इतर देशांच्या मानाने ब्रिटनमधील इंजिनिअर्स व कुशल कापड कामगारांना खूपच अधिक वेतन मिळू लागले; या परिस्थितीत वसाहतीच्या पिळवणुकीत आपलेही हित आहे असे त्यांना वाटू लागले. लेनिनने दाखवून दिले की, कोणतेही राष्ट्र साम्राज्यवादी झाले की त्याच्या बाबतीत हाच प्रकार घडत असतो. सबलती असलेले कामगारांचे विभाग, विशेषतः त्यांचे पुढारी "संधिसाधू" बनू लागतात, म्हणजे देशातील बहुसंख्य कामगारांची परिस्थिती नजरेआड करून ते केवळ आपल्या विभागाच्या हितासाठी भांडवलदारांबरोबर करार-मदार करू लागतात. साम्राज्यशाही अवस्थेची वाढ होऊ लागली तशी ही प्रवृत्ती वाढू लागली. त्यामुळे कामगार व समाजवादी चळवळीचे पुढारीगट आपापल्या देशाच्या बँक-भांडवलदार गटाच्या साम्राज्यवादी हितसंबंधांशी पूर्णपणे एकरूप होऊन गेले. पहिल्या महायुद्धाच्या काळात फक्त रशियातील बोल्शेविकच मार्क्सवादी राहिले; बाकी युरोपातील सर्व देशांतील अधिकृत कामगारचळवळी आपापल्या देशांच्या साम्राज्यवाद्यांच्या बरोबर युद्धात सामील झाल्या आणि भांडवलदारांचा पराभव करून सत्ता हातात घेण्याची युद्धामुळे निर्माण झालेली संधी त्यांनी वाया घालविली.

अनेक देशांतील कामगारवर्गाच्या पक्षांच्या पुढाऱ्यांनी हे जे 'संधिसाधू' धोरण–आपल्या वर्गाच्या हिताचा राज्यकर्त्यावर्गाच्या हिताशी पाट लावण्याचे धोरण–स्वीकारले, त्यामुळेच १९१४–१८ च्या पहिल्या महायुद्धानंतर मार्क्सवादाप्रमाणे चालणाऱ्या आणि कामगार चळवळीला मार्क्सवादाकडे ओढण्यासाठी कार्य करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांची स्थापना करणे आवश्यक झाले.

वसाहत देशांतील स्वातंत्र्य-लढे

या साम्राज्यशाही अवस्थेत वसाहत देशांतील स्वातंत्र्य-लढे अधिक निकराचे व विस्तृत होतात. वसाहत देशाचे पारतंत्र्य व तेथे झालेला भांडवलाचा शिरकाव यामुळे तेथील उत्पादनाच्या जुन्या पद्धती नष्ट होतात आणि त्यामुळे हजारो लोकांच्या उपजीविकेचा आधार उखडला जातो. लँकेशायरच्या कापडाच्या चढाओढीने हिंदी कोष्ट्यांचे उपजीविकेचे साधन नष्ट झाले आणि त्यांना परत शेतीवर जाण्याखेरीज दुसरा मार्गच उरला नाही.

त्यामुळे शेतीवर जगणाऱ्यांची संख्या भलतीच वाढली. साम्राज्यशाही अवस्थेत सर्व जनतेवरचे करांचे बोजेही वाढतात; कारण कर्जावरील व्याज आणि साम्राज्य सत्तेच्या लष्करी व मुलकी यंत्रणेचा खर्च, याच उत्पन्नातून भागविला जातो अशा रीतीने जमिनीवर दुहेरी दडपण येते आणि त्यांच्या मालाच्या किंमती साम्राज्यवादी मक्तेदार बळजबरीने खालच्या पातळीवर आणून ठेवतात. याचे पर्यवसान दारिद्र्य व उपासमारीचे राज्य जनतेवर लादण्यात होते आणि ठिकठिकाणी शेतकऱ्यांचे उठाव होऊ लागतात. शहरांतून औद्योगिक उत्पादन अत्यंत भयानक परिस्थितीत होत असते; कामगार संघटनांना अडथळे आणण्यात येतात, शक्य असेल तेथे त्या दडपल्या जातात. मध्यमवर्गाला– विशेषतः "बुद्धीजीवी" मध्यमवर्गाला साम्राज्यसत्तेची बंधने जाणवू लागतात. आपल्या विकासावर बंधने पडत आहेत ही गोष्ट उगवत्या देशी भांडवलदारांच्या निदर्शनाला येते. अशा रीतीने स्वातंत्र्यासाठी व्यापक संग्राम सुरू होतो. प्रत्येक वसाहत देशात–अर्थात निरनिराळ्या परिस्थितीत–हीच क्रिया घडत राहते.

भांडवलशाही शोषणामधून अपरिहार्यपणे असेच लढे निर्माण होणार आणि साम्राज्यवादी गटांच्या पाडावानंतरच त्यांचा शेवट होणार, हे साम्राज्यवादी देशांतील मार्क्सवाद्यांना स्पष्ट दिसते आणि म्हणून साम्राज्यवादी देशांतील बँक-भांडवलदार गट आपले व वसाहती जनतेचे समान शत्रू आहेत हे ते ओळखतात व वसाहती जनतेशी गट्टी करतात.

पहिले महायुद्ध बड्या राष्ट्रांतील बँक-भांडवलदारी गटांतील संघर्षाच्या परिपाकातूनच निर्माण झाले होते आणि या महायुद्धापासूनच **भांडवलशाहीवरील सार्वत्रिक अरिष्टाला प्रारंभ झाला.** १९१७ मध्ये लेनिन यांच्या पुढाकाराखाली रशियातील बोल्शेविक पार्टीने भांडवलदारांची व जमीनदारांची सत्ता उलथून पाडली आणि इतिहासातील पहिल्या समाजवादी राज्याच्या उभारणीस आरंभ केला. त्या वेळेपासून जगाची दोन भागांत विभागणी झाली. एक समाजवादी विभाग. त्याचे सामर्थ्य व प्रभाव दिवसेंदिवस वाढत आहे आणि दुसरा भांडवली विभाग. साम्राज्यशाही अवस्थेतील या भांडवलदारी विभागातील अंतर्विरोधामुळे भांडवलदारी समाजव्यवस्थेचा राजकीय व आर्थिक पाया झपाट्याने ढासळत चालला आहे.

वर्ग-संघर्ष आणि राज्यसत्ता

दुसऱ्या प्रकरणात वर्ग-संघर्षाबद्दलचा मार्क्सचा सर्वसाधारण सिद्धांत स्पष्ट करण्यात आला आहे. वर्गसंघर्षांचा उगम ज्या उत्पादन पद्धतीत समाजांची दोन वर्गांमध्ये विभागणी होते तिच्यातून होतो; त्यातील एक वर्ग (म्हणजे गुलाम, भूदास व कामगार) प्रत्यक्षपणे उत्पादन करतो आणि दुसरा वर्ग म्हणजे (गुलामांचा मालक, भूस्वामी व भांडवलदार) उत्पादनाचे कार्य न करावे लागता त्यातील एका हिश्श्याचा उपभोग घेतो. प्रत्येक काल-खंडात या दोन वर्गाखेरीज आणखीही इतर वर्ग असतात. मागासलेल्या (वसाहत अगर निम-वसाहत) देशात (परकीय भांडवलदारांशिवाय) उगवता देशी भांडवलदारवर्ग आणि मोठा होत जाणारा कामगारवर्ग आहेत. त्यांच्याच जोडीला आजही सरंजामदारी जमीनदार व शेतकरी आहेत,—हे शेतकरी जवळ जवळ भूदासासारखेच आहेत.

या वर्गात चालणाऱ्या संघर्षामुळे समाजाला उत्पादनाच्या वरच्या अवस्थेत जाण्यास मदत होते. यशस्वी क्रांती झाली म्हणजे मग वरच्या पातळीवरचा उत्पादन प्रकार अस्तित्वात येतो अगर त्याचा मोठ्या प्रमाणावर विस्तार होतो. ब्रिटनमध्ये भांडवलशाहीच्या विकासाचा मार्ग क्रॉमवेलच्या क्रांतीनंतर आणि १६८९ च्या 'गौरवशाली क्रांतीनंतर' खुला झाला. हीच कामगिरी फ्रान्समध्ये १७८९ च्या महान क्रांतीनंतर आणि त्यानंतरच्या इतर क्रांत्यांनी पार पडली.

परंतु अशा सर्वसाधारण पद्धतीने वस्तुस्थितीचे वर्णन करून मार्क्सचे समाधान झाले नाही; त्याने त्याच्या काळातील लढ्यांचा खोलवर अभ्यास, वर्गा-वर्गांमध्ये चालणाऱ्या संघर्षाचे **नियम** शोधून काढण्याच्या हेतूने केला.

याचा अर्थ त्याने लढ्याचे तांत्रिक बारकावे शोधून काढले असा नाही. सामाजिक विकासाचे आकलन करून घ्यायचे असेल तर नव्या उत्पादन-

प्रकाराचा विकास करणाऱ्या क्रांतीमधील वर्गशक्तीचे विश्लेषण करणे या गोष्टीला खरे महत्त्व आहे हे मार्क्सला दिसून आले. आणि युरोपातील अनेक देशांत १८४८ मध्ये ज्या क्रांतिकारक घटना घडल्या त्यांची छाननी करून त्यात काही सर्वसाधारण वैशिष्ट्ये आहेत, हे सिद्ध करणे त्याला शक्य झाले.

क्रांतीमध्ये दिसून येणारी ही सर्वसाधारण वैशिष्ट्ये (अगर नियम) कोणते ?

क्रांतीचे पुढारीपण नवा सत्ताधारी वर्ग करतो

पहिला हा की, नव्या उत्पादनपद्धतीत सत्तेवर येऊ पाहणारा वर्गच नेहमी लढा चालवितो ! परंतु हे कार्य हा वर्ग एकटा करीत नाही. उदाहरणार्थ, १७८९ च्या महान् फ्रेंच क्रांतीमध्ये उगवत्या भांडवलदारवर्गाच्या जोडीला सरंजामदारी समाजातील उत्पादक असलेला शेतकरीवर्ग, लहान व्यापारी, स्वतंत्र कारागीर आणि भविष्यकाळातील कामगारवर्गाचे अंकुरही होते. जुन्या जमान्याच्या सत्ताधारीवर्गाविरुद्ध जनतेच्या या सर्व विभागांनी, त्यांचे एकमेकांचे हितसंबंध निरनिराळे असताही, क्रांतीच्या लढ्यात भाग घेतला; कारण जुनी राजवट म्हणजे दडपशाही आणि जीवनाची बिकट व अधिकाधिक बिकट होत जाणारी परिस्थिती हे त्यांना समजून चुकले होते.

अनेक युरोपियन देशांत या नंतरच्या काळात झालेल्या, सरंजामदारी राजेशाही उखडून टाकून भांडवलदारी उत्पादनाचा मार्ग मोकळा करणाऱ्या क्रांत्यांमध्येही असाच प्रकार घडला. पूर्वीच्या राज्यकर्त्यांविरुद्ध जनतेचे इतर सर्व विभाग संघटित झाले आणि प्रारंभीच्या अवस्थांत नेहमीच क्रांतीचे **पुढारीपण** नव्या सत्ताधारी वर्गाकडे, म्हणजे उगवत्या भांडवलदारीवर्गाकडे होते. क्रांतिलढ्याच्या क्रमात, विशेषतः ज्या ठिकाणी कामगारवर्गाने विकासाची विशिष्ट अवस्था गाठलेली होती, तेथे नवे दोस्तीचे संबंध जोडले गेले. स्वहितासाठी लढ्यात उतरलेले श्रमिक जनतेचे विभाग क्रांतीनंतर आपल्या मागण्या पुढे मांडू लागले, परंतु नवा सत्ताधारी भांडवलदारवर्ग त्या पूर्ण करण्यास तयार नव्हता. अशा परिस्थितीत श्रमिक जनतेचे विभाग आपला हक्क प्रस्थापित करण्यासाठी झगडू लागले; आणि भांडवलदारवर्ग कामगारांविरुद्ध मदत मिळविण्यासाठी अधिक प्रतिगामी वर्गांबरोबर संगनमत करू लागला. क्रॉमनवेलच्या काळातही असेच काहीसे घडले होते आणि फ्रान्समध्ये १८४८ पर्यंत अनेकदा असे घडत राहिले.

१८४८ च्या जूनमध्ये पॅरिसच्या कामगारांनी नव्याने जिंकलेल्या आपल्या हक्कांचे संरक्षण करण्याचे प्रयत्न केले, परंतु फेब्रुवारी क्रांतीनंतर सत्तेवर आलेल्या नव्या भांडवलदारी सरकारने त्यांचा पराभव केला. त्याचवेळी मार्क्सने भाकित केले की, पॅरिसच्या कामगारांची इतकी तयारी झालेली आहे की, पुढील वेळी क्रांतीच्या काळात भांडवलदारांच्या केवळ मागे राहाण्याऐवजी ते क्रांतीचा **पुढाकार** घेतील आणि १८७१ मध्ये खरोखरीच तसे घडले; त्यावेळी कामगारांच्या पुढाकाराखाली पॅरिसमध्ये कम्यूनची स्थापना झाली आणि १० आठवडे पॅरिस शहर त्यांनी आपल्या ताब्यात ठेवले. यावेळी इतिहासात प्रथमच कामगारांनी क्रांतीचे नेतृत्व केले. याचा अर्थ ते एकटे लढले, असा होत नाही—मोठ्या जमीनदारांनी व भांडवलदारांनी फ्रान्सला युद्धाच्या खाईत ढकलले होते आणि ते कामगारांचा पराजय व उपासमार यांचा फायदा घेऊन स्वतः अधिक श्रीमंत होऊ पाहत होते. यांच्या सरकाराविरुद्ध त्यांनी उठाव केला होता आणि या मोठ्या जमीनदार व भांडवलदारांच्या विरुद्ध कामगारांच्या जोडीने इतरही वर्ग उभे राहिले. सरकारने कर्ज व व्याज स्थगित करण्यास नकार देऊन ज्यांचा विनाश जवळ आणला होता, असे छोटे दुकानदार, जर्मनीचा युद्धात जय झाल्यामुळे व जर्मनीबरोबर जर्मनांच्या अटी मान्य करून केलेल्या करारामुळे चिडलेल्या सर्व वर्गांतील देशभक्त, इतकेच नव्हे तर सरकार अनियंत्रित राजेशाहीची स्थापना करील अशी भीती वाटणारे भांडवलदारी लोकशाहीवादीही लढ्यात उतरले. पॅरिसच्या कामगारांचा मुख्य कमकुवतपणा त्यांनी स्वतःच्या जोडीला शेतकऱ्यांनाही लढ्यात ओढण्याचा प्रयत्न गंभीरपणे केला नाही, हाच राहिला.

क्रांतीत, क्रांतिप्रवण वर्गाचा संयुक्त मोर्चा उभारावा लागतो

तरीसुद्धा मुख्य मुद्दा यावरूनही सिद्ध होतो तो हाच की, प्रत्येक खरी क्रांती प्रस्थापित सत्ताधारीवर्गाचे उच्चाटन करून सत्तेवर येणाऱ्या एका वर्गाचीच क्रांती नसते; तर प्रस्थापित सत्ताधारीवर्गाकडून दडपल्या गेलेल्या व खुंटित झालेल्या सर्व वर्गांची क्रांती असते. क्रांतीच्या एका विशिष्ट अवस्थेत सरंजामदारी राजेशाही व जमीनदार यांच्या विरुद्ध भांडवलदार क्रांतीचे नेतृत्व करतात, परंतु ज्यावेळी कामगारवर्गाचा विकास होतो तेव्हा तो क्रांतीत सामील होणाऱ्या सर्व विभागांचे नेतृत्व करतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर इतिहासाने हेच

दाखविले आहे :की, प्रत्येक क्रांतीत समाजाचे विस्तृत विभाग मुख्य शत्रू विरुद्ध संयुक्त मोर्चा उभारतात. त्यातील नवी बाब ही आहे की बड्या जमीनदार व भांडवलदारांच्या विरुद्धच्या क्रांतीत अशा संयुक्त मोर्चाचे पुढारीपण कामगारवर्ग स्वीकारतो.

उत्पादनात असलेल्या विरोधी हितसंबंधांमुळे वर्गावर्गांत सतत संघर्ष चालू असतो; नवी उत्पादन-पद्धती अस्तित्वात आणणारा नवा वर्ग सत्तेवर येण्यासाठी होणारी क्रांती ही या संघर्षाचा सर्वोच्च बिंदू असतो इतकेच. औद्योगिक भांडवलशाहीच्या प्राथमिक अवस्थेत संघर्ष तुरळक प्रमाणावर चालतात आणि तेही बहुधा एखाद्या कारखान्यातील वेतन व परिस्थिती याबद्दल असतात. 'परंतु उद्योगधंद्यांच्या विकासाबरोबर कामगारांची केवळ संख्याच वाढत नाही; त्यांचे केंद्रीकरणही होते, त्यांचे सामर्थ्य वाढू लागते आणि या वाढणाऱ्या सामर्थ्याबद्दलची त्यांची जाणीवही वाढू लागते.' (मार्क्स-कम्युनिस्ट जाहिरनामा, १८४८) कामगार ट्रेड युनियन संघटना स्थापन करतात; त्यातून राष्ट्रव्यापी आंदोलन चालविण्यास समर्थ असलेल्या बलाढ्य संघटना तयार होतात; गिऱ्हाईक या नात्याने स्वतःच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कामगार सहकारी संस्था स्थापन करतात. आणि त्यानंतरच्या अवस्थेत ते आपला स्वतःचा राजकीय पक्ष उभारतात. हा पक्ष वर्ग या नात्याने त्यांच्या हिताचे प्रतिनिधित्व करतो आणि त्यासाठी लढतो.

हा लढा कसा चालविला जातो ?

क्रांतीत कम्युनिस्ट पक्षाची कामगिरी

मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, कामगारवर्गाच्या पक्षाचे ध्येय, सत्ताधारी भांडवलदारवर्गाचे उच्चाटन करणारी क्रांती संघटित करण्याची तयारी करणे आणि नव्या प्रकारच्या उत्पादन-पद्धतीची, म्हणजे समाजवादाच्या संघटनेची उभारणी करणे, हे असते.

या तयारीच्या कार्यात कामगारवर्गाच्या सर्व तऱ्हेच्या संघटनांना विशेषतः ट्रेड युनियन संघटनांना, मदत करणे आणि अशा रीतीने कामगारवर्गाचे सामर्थ्य व 'त्या सामर्थ्याची जाणीव वाढविणे,' या गोष्टीचा प्रामुख्याने समावेश असतो. त्याचप्रमाणे वेतनवाढ, कामाच्या परिस्थितीत सुधारणा, इत्यादी ताबडतोबीच्या मागण्यांसाठी लढाच्या,

मैदानात उतरणाऱ्या कामगारवर्गाच्या सर्व विभागांना मदत करणाऱ्या कार्याचाही त्यांत अंतर्भाव असतो. या लढ्यातून कामगारांना पुष्कळदा सवलती मिळतात; पण त्या कायम स्वरूपाच्या नसतात. 'लढ्याचे मुख्य यश तात्कडतोबीच्या परिणामांत नसते, ते कामगारांच्या वाढत्या एकजुटीत असते.' लढ्याच्या मैदानात कामगारांना समजून येते की त्यांचा एक वर्ग आहे आणि भांडवलदारवर्गाच्या विरुद्ध त्यांचे हितसंबंध एक आहेत. ही त्यांची जागीव अधिक वाढविण्यासाठी कामगारवर्गाचा राजकीय पक्ष त्यांना मदत करतो आणि भांडवलदारी उत्पादन-पद्धत चालू असेपर्यंत वर्गसंघर्ष सतत का चालू राहतात हे त्यांना समजावून देतो. या काळात आर्थिक अरिष्टे व महायुद्धे यांच्या यमयातनांतून कामगारांना जावेच लागते. त्यांना पक्ष हेही समजावून देतो की, संघर्ष व हालअपेष्टा यांचा शेवट उत्पादनाची पद्धत बदलून करता येतो आणि हा बदल सर्वसाधारणपणे जबरदस्तीने राजसत्ता उलथून पाडूनच करता येतो.

इतिहासावरून मार्क्सने काढलेल्या या सर्वसाधारण निष्कर्षाला त्याच्या राज्यसंस्थेसंबंधीच्या अध्ययनाने दुजोरा मिळाला.

राज्यसंस्था : दमनाचे साधन

पुष्कळदा राज्यसंस्था म्हणजे पार्लमेंट असा अर्थ केला जातो. परंतु मार्क्सने दाखवून दिले की, इतिहासाच्या दाखल्यावरून प्रातिनिधिक संस्था व राज्यसंस्थेचा विकास यांच्यात फारसा संबंध नसतो, **प्रथमपासूनच सत्ताधारी वर्गाच्या इच्छा इतर सर्व लोकांवर लादण्याचे साधन, हेच राज्यसंस्थेचे स्वरूप होते.** प्राथमिक समाजात राज्यसंस्था नव्हती, परंतु जेव्हा मानवी समाजाची वर्गांत विभागणी झाली, तेव्हा मालमत्ताधारीवर्गाला स्वतःच्या नियंत्रणाखाली असलेल्या व स्वहिताचे रक्षण करणाऱ्या सशस्त्र फौजेशिवाय मालमत्ता टिकविणे अशक्य झाले. "हे 'लोक-शासन यंत्र' सर्व शासन-संस्थांत अस्तित्वात असते. आणि त्यात फक्त सैन्याचाच अंतर्भाव होतो असे नव्हे तर त्याला पूरक असणाऱ्या तुरुंग आणि दडपशाही करणाऱ्या इतर सर्व प्रकारच्या संघटना यांचाही समावेश होतो." ("राज्यसंस्था व क्रांती"— ह्या पुस्तकांत, पहिल्या प्रकरणात, लेनिननी दिलेले एंगल्सचे अवतरण) सैन्य, तुरुंग व दडपशाहीच्या यंत्रणेचे कार्य प्रस्थापित व्यवस्था कायम टिकवून धरणे

हे असते; म्हणजे, प्रचलित वर्गभेद व वर्गअधिकार सुरक्षित राखणे हे असते; राज्यसत्ता जणू काही समाजापासून अलग, वरच्या पातळीवर असते. "निःपक्षपाती" असते, तिचा एकमेव हेतू 'कायदा व सुव्यवस्था' टिकविणे हा असतो असा भास उत्पन्न करण्याचे प्रयत्न होतात, पण **कायदा व सुव्यवस्था टिकविणे म्हणजेच प्रस्थापित समाजव्यवस्थाही टिकविणे होय.** समाज-पद्धती बदलण्याचा जरा देखील प्रयत्न केला तरी तिचा दंडा उगारला जातो, "राजद्रोही" लोकांना पकडून तुरुंगात टाकण्यात येते, "राजद्रोही" साहित्यावर बंदी घातली जाते वगैरे; आणि हे सर्व वरकरणी शांततेच्या मार्गाने केले जाते; परंतु आंदोलनाला व्यापक स्वरूप प्राप्त होताच पोलीस उघड उघड बळाचा उपयोग करतात आणि आवश्यक तर लष्करही बोलाविले जाते. **सत्ताधारीवर्गाच्या बाजूने कार्य करणारी दडपशाहीची यंत्रणा हे राज्य संस्थेचे एक आवश्यक लक्षण असते.**

राज्यसंस्था आणि पार्लमेंट

राज्यसंस्थेवर पार्लमेंटचे अगर दुसऱ्या एखाद्या प्रातिनिधिक संस्थेचे नियंत्रण चालते काय? जोपर्यंत देशाची प्रातिनिधिक संस्था सत्ताधारीवर्गाचेच प्रतिनिधित्व करते, तोपर्यंत राज्ययंत्रणेवर तिचे नियंत्रण असल्याचा भास होतो. परंतु ज्यावेळी या संस्थेत सत्ताधारीवर्गाला पुरेसे प्रतिनिधित्व राहात नाही, आणि सत्ताधारीवर्गाला त्रस्त बनविणारे कायदे ती पास करण्याचा प्रयत्न करते, त्यावेळी राज्ययंत्रणा तिच्या नियंत्रणाखाली नसते हे स्पष्ट होते. सत्ताधारीवर्गापेक्षा निराळ्या वर्गाच्या हिताचे रक्षण करू पाहणाऱ्या प्रातिनिधिक संस्थांची अनेक उदाहरणे इतिहासात झाली आहेत. पण तशीच आवश्यकता उत्पन्न झाली तेव्हा त्या बरखास्त करण्यात आल्या, किंवा जरूर पडल्यास लष्कराच्या मदतीने त्या उधळून लावण्यात आल्या. जेथे जेथे उगवत्या वर्गाने उदाहरणार्थ -- क्रॉमवेलच्या काळातील ब्रिटनने-- जुन्या पद्धतीवर जो विजय मिळविला, तेथे तेथे त्यांनी केवळ पार्लमेंटमध्ये बहुमत मिळवून मिळविला नाही, तर राज्यसंस्थेविरुद्ध-- म्हणजे जुन्या सत्ताधारीवर्गाच्या लष्कराविरुद्ध-- आपले नवे लष्कर उभारून मिळविला.

प्रातिनिधिक संस्थेत काहीही घडो, उत्पादन-पद्धतीत वरचढ असलेला वर्ग राज्यसंस्थेवर आपली अधिसत्ता चालवीतच असतो आणि म्हणून सत्तांतर जर

खरे व्हावयाचे असेल तर जुन्या राज्यनियंत्रणेविरुद्ध बळाचा उपयोग करावाच लागतो, कारण समाजपद्धती बदलू इच्छिणाऱ्या नव्या वर्गावर जुन्या वर्गाची दमनशक्ती पूर्ण बलाने लोटली जाते.

मार्क्सच्या या विचारांना त्यानंतरच्या इतिहासात घडलेल्या अनेक घटनांनी दुजोरा मिळाला आहे. फॅसिझमचा संपूर्ण आधार सर्व तऱ्हेच्या प्रातिनिधिक संस्थांचा लष्कराच्या जोरावर केलेला नाश, हाच होता. त्या वेळी फॅसिस्ट संघटना ही नवी दमन-शक्ती होती—राज्यसंस्थेची जुनीच शक्ती नव्हती, तरीसुद्धा वरील विवेचन तिला तंतोतंत लागू झाल्याशिवाय राहात नाही. १९३६ मध्ये, स्पेनमध्ये, फ्रँकोने केलेल्या उठावावरून, सरकारी सशस्त्र दलांवर जनतेच्या घटनेनुसार निवडलेल्या प्रातिनिधिक संस्थांचे किती थोडे नियंत्रण असते, हे सिद्ध झाले आहे.

वरवर पाहाता राज्ययंत्रणेवर आणि विशेषतः सशस्त्र दलांवर पार्लमेंटचे 'घटनात्मक' नियंत्रण असते, असा भास होतो; परंतु त्यावर सत्ताधारी-वर्गाचे स्वतःचे स्वतंत्र नियंत्रण असते. हे कसे घडते? या प्रश्नाचे उत्तर राज्ययंत्रणेच्या स्वरूपातच सापडते. प्रत्येक देशात सशस्त्र दल, न्याय खाते व राज्यकारभार खाते यातील प्रमुख जागांवर सत्ताधारीवर्गातील व्यक्तींची अगर त्यांच्या विश्वासू नोकरांचीच नेमणूक होत असते. नेमणुकीच्या व नोकरांना बढती देण्याच्या व्यवस्थेतून हे कार्य साधण्यात येते, प्रातिनिधिक संस्था कितीही लोकशाहीच्या तत्त्वानुसार चालल्या तरी राज्ययंत्रणेच्या पोलादी गाभ्यात त्यांचा शिरकाव होऊ शकत नाही. जोपर्यंत कोणतेही गंभीर प्रश्न उपस्थित झालेले नसतात तोपर्यंत राज्ययंत्रणा व लोकशाही पद्धतीने चालणारे पार्लमेंट या अलग अलग संघटना आहेत हे समजूनही येत नाही. परंतु आपल्यासमोर ब्रिटनमधीलच आणखी एक उदाहरण आहे; ते म्हणजे १९१४ मधील कराघ बंडाचे; त्यावेळी आयर्लंडला स्वातंत्र्य देण्याच्या कायद्याच्या अंमलबजावणीविरुद्ध प्रतिगामी गट उठाव करण्याच्या धमक्या देत होते, आणि त्यांच्या विरुद्ध उत्तर आयर्लंडमध्ये फौज पाठविण्यात आली असता सैन्याच्या अधिकाऱ्यांनी तो हुकूम मानण्यास नकार दिला.

तेव्हा जुन्या सत्ताधारीवर्गाच्या हितसंबंधाच्या चालू स्थितीविरुद्ध नव्हे तर ती कायम टिकविण्यासाठीच राज्ययंत्रणा काम करीत राहते. **अर्थात राज्य-यंत्रणेचा परामर्ष केल्याशिवाय उत्पादनाच्या उच्चतर पद्धतीचा**

जन्म होऊ शकत नाही, मग त्या काळातील प्रातिनिधिक संस्था कशाही असोत.

संसदीय लोकशाहीच्या लढ्याचे महत्त्व

आणि तरीसुद्धा लोकशाही संस्थांना मार्क्सने नेहमीच पाठिंबा दिलेला आहे. ऐतिहासिक दृष्ट्या ते वर्गलढ्याचे एक रणक्षेत्र ठरले आहे; पहिल्या चार्ल्स् राजाच्या काळात इंग्लंडमध्ये त्या जनमत चाचपडण्याचे उगवत्या भांडवलदारवर्गाचे व्यासपीठ बनल्या; त्यांच्या साहाय्याने एकीकडे भांडवलदार-वर्गाने सवलती मिळविल्या आणि त्याच वेळी सरंजामदारी राजेशाहीविरोधी लढ्याला जनतेचा पाठिंबा मिळविला. त्याप्रमाणे काही सवलती मिळविण्या-साठी आणि त्याच वेळी सत्ता काबीज करण्याच्या निर्णायक लढ्यासाठी काम-गारांना तयार करण्याचे एक साधन म्हणून, आजच्या पार्लमेंटचाही उपयोग होऊ शकतो आणि म्हणून पार्लमेंटरी लोकशाहीसाठी चालणारा संघर्ष अर्थ-शून्य नसतो, तो संपूर्ण लढ्याचा एक भाग असतो. केवळ त्याच्याच साहाय्याने नवा समाज अस्तित्वात येऊ शकत नाही इतकेच. (या संदर्भात हेही लक्षात घेतले पाहिजे की, जनतेचा विरोध व्यक्त करण्याची संधी या संस्थांमुळे मिळते, ती मिळू नये म्हणूनच फॅसिझम सर्वत्र सर्व पार्लमेंटरी संस्था नष्ट करतो.)

आणि म्हणूनच गेल्या शतकात, युरोपात जेथे जेथे हुकूमशाही स्वरूपाच्या राजवटी होत्या तेथे तेथे त्यांच्या विरुद्ध संसदीय लोकशाहीच्या लढ्याला मार्क्सने अत्यंत महत्त्व दिले; आणि जेथे हुकूमशाही राजवटीचा अंत झाला होता तेथे लोकशाही हक्कांच्या विस्ताराला त्याने महत्त्व दिले. परंतु त्याने त्याचबरोबर याही बाबीवर भर दिला की, जोपर्यंत (प्रथम स्पष्टीकरण केलेल्या अर्थाने) अनियंत्रित राजवट अगर भांडवलदारवर्ग अस्तित्वात असतो तोपर्यंत लोकशाही सुरक्षितही नसते, अगर परिणामकारकही नसते. फक्त ज्यावेळी कामगारवर्ग भांडवलदारी राज्ययंत्राचा पराजय करून ते मोडून तोडून टाकतो त्यावेळीच तो सत्ताधारीवर्गाच्या स्थानावर आरूढ होऊ शकतो आणि अशा रीतीने "लोकशाहीचा लढा जिंकू शकतो." दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, ज्या वेळी जनतेच्या मार्गात असलेला सशस्त्र कोट म्हणजे भांडवलदारी राज्यसत्तेची यंत्रणा नष्ट केली जाते त्यावेळीच जनतेच्या इच्छाशक्तीचा परिणामकारक प्रभाव पडू शकतो.

परंतु पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांच्या राज्ययंत्राचा पराजय करून ते पोडून तोडून टाकल्याने कार्य समाप्त होत नाही. कामगारवर्गाला स्वतःच्या राज्ययंत्रणेचीही स्थापना करावी लागते; आपल्या केंद्रित, बलसंपन्न राज्ययंत्राची उभारणी करूनच त्याला भांडवलदारवर्गाचा संपूर्ण पराभव करता येतो आणि अंतर्गत व बाह्य हल्ल्यापासून स्वतःच्या नव्या पद्धतीच्या राज्याचे संरक्षण करता येते.

त्याचप्रमाणे कामगारवर्गाला आपल्या स्वतःच्या पद्धतीचे सरकार स्थापन करावे लागते; त्याचे स्वरूप भांडवलदारी समाजातील सरकारपेक्षा अनेक महत्त्वाच्या बाबतीत निराळे असते; कारण त्याचे ध्येय निराळे असते, १८७१ च्या पॅरिस कम्यूनच्या अनुभवानंतर मार्क्सचे त्यासंबंधीचे विचार सुस्पष्ट झाले. त्याने दाखवून दिल्याप्रमाणे पॅरिस कम्यूनची खास वैशिष्ट्ये ही होती की: "ते सरकार कार्य करणारे सरकार होते, ती पार्लमेंटरी संस्था नव्हती; ती कायदे करणारी व ते अंमलात आणणारी, दोन्ही कामे एकाच वेळी करणारी एकत्र संस्था होती. निवडून दिलेल्या कम्यूनच्या जुन्या सभासदाऐवजी नव्याची निवडणूक मतदार केव्हाही करू शकत असत—कम्यूनच्या सभासदांपासून ते थेट लहानातल्या लहान नोकरापर्यंत सर्वांना कामगारांच्या पगाराइतकाच पगार घेऊन काम करावे लागत असे. 'मॅजिस्ट्रेट व न्यायाधीशांचीही निवडणूक होत असे आणि मतदार त्यांना केव्हाही बदलू शकत असत. पूर्वीच्या कायम लष्कराच्या जागी—" राष्ट्रीय दलाची योजना करण्यात आलेली होती आणि त्यात मुख्यत्वेकरून श्रमिक जनतेचा भरणा होता." या सर्व वैशिष्ट्यांचा उद्देश, राज्ययंत्रणा व दडपशाहीची यंत्रणा कामगारवर्गाच्या अधिकात अधिक जवळ आणण्याचा होता,—तोपर्यंत जुन्या यंत्रणेवर ताबा बसवून असलेल्या भांडवलदारी नियंत्रणाच्या जागी कामगारवर्गाचे नियंत्रण बसविण्याचा होता. नव्या प्रकारचे हे सरकार म्हणजेच "लोकशाहीचा लढा विजयी झाल्याची" साक्ष होती. स्वतःच्या जीवनावर सामान्य जनतेने मिळविलेल्या प्रत्यक्ष नियंत्रणातील हिश्श्याचा तो एक प्रचंड विस्तार होता.

आणि तरी सुद्धा पॅरिस कम्यूनविषयी लिहिताना त्याचे वर्णन एंगल्सने, **"ती कामगारवर्गाची सर्वाधिकारी सत्ता होती,"** या शब्दांनी केले आहे. पॅरिस कम्यूनमध्ये भांडवलशाही राजवटीतील पार्लमेंटरी लोक-

शाहीपेक्षा जनतेच्या लोकशाही हक्कांचा अधिक विस्तार झालेला होता, हे मार्क्सचे विधान आणि, "ते कामगारवर्गाचे सर्वाधिकारी सरकार होते" हे एंगल्सचे विधान यांत विसंगती आहे का? नाही, ही एकाच राज्यव्यवस्थेची दोन अंगे आहेत. बहुसंख्य जनतेच्या इच्छाआकांक्षा प्रत्यक्षात उतरविण्यासाठी, एक नवे लोकशाही सरकार पॅरिस कम्यूनच्या रूपाने अस्तित्वात आले, परंतु जनतेची इच्छा अंमलात आणण्याचे कार्य त्याला सर्वाधिकारित्व गाजवूनच करता येणे शक्य होते. पूर्वी हुकूमशाही गाजविणाऱ्या आणि कम्यूनच्या काळात अर्थव्यवहारातील मोडतोडीपासून, सशस्त्र प्रतिकारापर्यंत, सर्व मार्गांचा अवलंब करून. जनतेची इच्छा पायदळी तुडविण्यासाठी उठाव करणाऱ्या वर्गाविरुद्ध, अल्पसंख्य लोकांविरुद्ध, बलाचा व दडपशाहीचा वापर करूनच करता येणे शक्य होते.

सोविएत राज्य : कामगारांच्या अधिसत्तेचा एक प्रकार

१८७१ मध्ये पॅरिस कम्यूनच्या अनुभवांवरून मार्क्स व एंगल्स यांनी काढलेल्या निष्कर्षांतील सत्य, त्यानंतरच्या कामगारक्रांत्यांच्या अनुभवांतही प्रत्ययास आले आहे. रशियातील १९०५ च्या क्रांतीत झारविरुद्धचा लढा पुढे चालविण्यासाठी कामगारवर्गाच्या संघटनांतील प्रतिनिधींची मंडळे (सोविएत्स) स्थापित करण्यात आली. पुढे १९१७ च्या मार्चमधील क्रांतिकाळातही अशीच "सोविएत्स" (म्हणजे मंडळे) क्रांतिकारक परिस्थिती निर्माण होताच स्थापन झाली. पॅरिस कम्यूनच्या काळानंतरच्या काळात झालेल्या कामगारवर्गाचा महान विकास लक्षात घेऊन लेनिननी ओळखले की, ह्या प्रतिनिधीमंडळाच्या रूपानेच नवे कामगारवर्गाचे सरकार राज्य करील. ह्या प्रतिनिधीमंडळात प्रथम कारखान्यांतील कामगार-प्रतिनिधी होते, (पण क्रांतीच्या विस्ताराबरोबर त्यांत शेतकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींचाही समावेश झाला होता.) अशा रीतीने हे प्रतिनिधी प्रत्यक्ष कामगारांतून निवडण्यात आलेले होते आणि मतदार, त्यांना कोणत्याही क्षणी परत बोलावू शकत असत. याचाच अर्थ असा की, भांडवलदारी प्रभाव त्यांच्या निर्णयावर पडू शकत नव्हता, आणि म्हणून कामगारवर्गाच्या खऱ्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यास ती मंडळे समर्थ होती. त्याबरोबरच बळावर अधिष्ठित असलेल्या अधिसत्तेच्या मार्गानेच हे कार्य पार पाडता येण्यासारखे होते,

कारण नव्या सोविएत सरकारला उलथून पाडून नष्ट करण्यासाठी हर तऱ्हेच्या साधनांचा उपयोग करणाऱ्या जुन्या सत्ताधारीवर्गाविरुद्ध अशा अधिसत्तेची आवश्यकता होती.

कामगारवर्गाच्या सर्वाधिकारी सत्तेतील खऱ्या लोकशाहीच्या गाभ्याची कल्पना मार्क्सने १८४८ मध्ये लिहिलेल्या कम्युनिस्ट जाहीरनाम्यात पुढीलप्रमाणे मांडली आहे : "ह्या पूर्वीच्या सर्व ऐतिहासिक चळवळी अल्पसंख्यांकांच्या चळवळी होत्या किंवा अल्पसंख्याकांच्या हितासाठी होत्या. कामगार चळवळ प्रचंड बहुसंख्येची आणि प्रचंड बहुसंख्येच्या हिताची स्वतंत्र चळवळ असते व तिला स्वतःला या गोष्टीची जाणीव असते."

कामगारवर्गीय क्रांतीनंतरही कामगार शासन हवेच!

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, कामगारक्रांतीच्या विजयाबरोबर सर्व वर्गसंघर्षाचा तावडतोब शेवट होती असे मार्क्स मानीत नव्हते. उलट समाजाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ती घटना असते. त्यानंतर प्रथमच सरकारी यंत्रणा पूर्वीप्रमाणे कामगारवर्गाच्या विरुद्ध न राहता त्यांच्या हातात येते. १९१८ च्या जानेवारीत भरलेल्या सोविएतच्या काँग्रेसमध्ये लेनिननी हा मुद्दा स्पष्ट करताना पुढील प्रसंग सांगितला. ते आगगाडीतून प्रवास करीत होते आणि आजुबाजूला काही बोलणे चालले होते, ते नीटसे त्यांच्या लक्षात येत नव्हते. तितक्यात एक माणूस त्यांच्याकडे वळून म्हणाला, "ही म्हातारी बाई काय म्हणते समजलं का? ती सांगत आहे, 'आता बंदूकवाल्या शिपायाला घाबरायचे कारण राहिलेले नाही. एके दिवशी मी जंगलात असताना बंदूकवाला माणूस तेथे आला, पण नेहमीप्रमाणे मी गोळा केलेला लाकूडफाटा माझ्याजवळून हिसकावून घेण्याऐवजी त्याने मला आणखी थोडी लाकडे गोळा करण्यास मदत केली." तेव्हा, दडपशाहीची शक्ती सोविएत क्रांतीनंतर कामगाराबर रोखलेली राहिली नाही, उलट त्याना ती मदत करीत होती, ती फक्त जे कामगारांच्या प्रकृतीत अडथळे आणतील त्यांच्या विरुद्धच वापरली जाणार होती.

आणि अर्थातच कामगारवर्गाने, सत्ता हातात घेतल्यानंतर असे लोक राहतातच. दुसऱ्या देशांतील सत्ताधाऱ्यांच्या मदतीने जुना सत्ताधारीवर्ग जमेल तितकी सशस्त्र फौज जमा करतो आणि कामगारवर्गाच्या राज्यसत्ते-

विरुद्ध उघड युद्ध करू लागतो. १८७१ च्या पॅरिस कम्यूनचा पराभव असाच करण्यात आला. युद्धात जिंकलेल्या हजारो फ्रेंच कैद्यांना जर्मनीने सोडून दिले आणि पॅरिसबाहेर व्हर्सायमध्ये असलेल्या फ्रेंच प्रतिगाम्यांच्या फौजेत भरती करण्यासाठी त्यांना त्यांनी पाठवून दिले. त्या प्रतिगाम्यांच्या फौजेला मग कम्यूनच्या हातातून पॅरिस काढून घेणे आणि कम्यूनला पाठिंबा देणाऱ्यांची अत्यंत क्रूर कत्तल करणे शक्य झाले. १९१८ ते १९२० च्या दरम्यान रशियातील सोविएत सरकारला फक्त झारच्या पाठिराख्यांच्या फौजेविरुद्धच नव्हे, तर ब्रिटन, फ्रान्स व अमेरिकेसहित अनेक परकीय सत्तेच्या फौजांना तोंड द्यावे लागले. यावरून कामगारवर्गाने हातात सत्ता घेतल्यानंतर दीर्घ काळपर्यंत, त्याला राज्यसत्ता टिकवून धरावी लागेल आणि तरच त्याला स्वतःचे संरक्षण करणे व समाजवादी-पद्धतीचे उत्पादन सुरू करण्यासाठी तो पुनर्संघटना करीत असतो त्या काळात स्वतःचे नियंत्रण बसविणे शक्य होईल, हा मार्क्सचा निष्कर्ष बरोबर असल्याचे इतिहासाने दाखवून दिले आहे.

१८७१ चे पॅरिस कम्यून आणि १९१७ त स्थापन झालेली रशियातील सोविएतची राज्यसत्ता हे कामगारवर्गाच्या राज्यसत्तेचे पहिले प्रकार होते. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस कामगार चळवळीच्या वाढत्या ताकदीमुळे आणि सामर्थ्यशाली सोविएत सरकारच्या अस्तित्वामुळे कामगारवर्गाच्या सत्तेचा एक नवा प्रकार निर्माण करणे शक्य झाले; त्याला **"जनतेची लोकशाही"** म्हणतात, त्याची चर्चा शेवटच्या प्रकरणात येईल.

कम्युनिझम्मध्ये शासनसंस्था आपोआपच विरून जाईल

समाजवाद आणि समाजवादाची पुढची अवस्था साम्यवाद (कम्युनिझम) म्हणजे काय, मार्क्सच्या मनात त्याचा नेमका अर्थ कोणता होता त्याचे विवरण पुढील प्रकरणात केले आहे. परंतु वर्गसंघर्ष व राज्यसत्ता या विषयांवरील विवेचन पूर्ण करण्यापूर्वी या सर्व प्रक्रियेचा शेवट कसा होईल याविषयीचा मार्क्सचा दृष्टिकोन सांगितला पाहिजे. उत्पादनात विरोधी हितसंबंध असलेल्या वर्गात मानवी समाजाची विभागणी झाली; त्यातून वर्गसंघर्ष आणि त्यावरोबर सत्ताधारीवर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करणाऱ्या राज्ययंत्रणेचा जन्म झाला. **जोपर्यंत मानवी समाजाची वर्गामध्ये विभागणी**

कायम आहे, तोपर्यंत वर्गलढे व राज्यसंस्था इतिहासात कायम राहतील; परंतु वर्गविभागणीचा अंत करण्यासाठी रहातील. कामगारवर्ग जेव्हा सत्ता हाती घेतो तेव्हा ती ज्या उत्पादनप्रकारात दुसऱ्या वर्गाच्या श्रमावर जगणारा एकही वर्ग अस्तित्वात नाही अशी उत्पादनपद्धती अस्तित्वात आणण्यासाठी घेतो; म्हणजे ज्यात सर्वजण समाजासाठी श्रम करतात, अशा वर्गविहीन समाजाच्या उभारणीसाठी घेतो. जेव्हा जागतिक प्रमाणावर वर्गविहीन समाजाची स्थापना होईल त्यावेळी वर्गसंघर्ष उरणार नाही, कारण त्यावेळी निरनिराळे हितसंबंध असलेले वर्ग असणार नाहीत आणि म्हणून राज्यसंस्थेचीही-दडपशाहीच्या एका साधनाची-आवश्यकता राहणार नाही; कारण तेव्हा एका वर्गाच्या हितसंबंधाचे दुसऱ्या वर्गाकडून बळाच्या जोरावर रक्षण करण्याचा प्रश्नच राहणार नाही.

तेव्हा मग राज्यसंस्था "गळून, कोमेजून, नष्ट होऊन जाईल." एकापाठोपाठ दुसऱ्या क्षेत्रातून तिची आवश्यकता नाहीशी होत जाईल. आणि जी काही मध्यवर्ती संघटना उरेल ती उत्पादन व त्याचे विभाजन संघटित करण्यासाठीच उरेल. एंगल्सने म्हटल्याप्रमाणे, "त्यावेळी व्यक्तींवर राज्य चालविणाऱ्या सरकारच्या जागी, वस्तूंची व्यवस्था व उत्पादन-क्रियेची दिशा ठरविणाऱ्या संघटना स्थापन होतील."



समाजवादी समाज

भांडवलशाहीनंतर येणाऱ्या नव्या समाजव्यवस्थेचे सविस्तर वर्णन मार्क्सच्या कोणत्याही लिखाणात नाही. त्याच्या पूर्वीच्या लेखकांनी लिहिले त्याप्रमाणे "मनोराज्यवादी" लेखन मार्क्सने कधीही केले नाही. ज्यातून सद्यःकालीन समाजातील सर्वठळक दोष नाहीसे झालेले आहेत अशा समाजाचे चित्र मनोराज्यवाद्यांनी रेखाटले आणि त्याला "समाजवादी समाज" हे नाव दिले. पण मार्क्सने, समाजाच्या विकासाच्या सर्वसामान्य नियमांना धरूनच नव्या समाजाचे स्वरूप आणि त्याच्या विकासाचा मार्ग यांचे विवेचन केले, हे मार्क्सच्या शास्त्रीय विचारसरणीचे वैशिष्ट्य आहे.

समाजवादाचा जन्म भांडवलशाहीच्या उदरात होतो

मार्क्सने मांडलेला पहिला उल्लेखनीय व एका अर्थी अत्यंत सुस्पष्ट असलेला मुद्दा हा होता की, नव्या संघटनेचा प्रारंभ कोऱ्या पाटीवर होणार नाही आणि म्हणून 'स्वतःच्या पायावर विकास पावलेल्या' समाजरचनेचे चित्र रंगविणे निरर्थक आहे. सर्व चांगले गुण निवडून काढून त्यांचे मिश्रण बनवून समाजवादी समाजाच्या चित्राला रंग चढविणे आणि असा समाज आपण शून्यातून निर्माण करणार आहोत असे समजणे चूक होईल. असा दृष्टिकोन पूर्णपणे अशास्त्रीय असून त्यांतून तयार होणारे विचार वस्तुस्थितीशी न जुळणारे ठरण्याचा फारच संभव असतो.

याच्या उलट, पूर्वीच्या सर्व समाजरचनांप्रमाणेच, प्रत्यक्ष समाजवादी समाजही, त्याच्या पूर्वी जो समाज अस्तित्वात होता त्याच्या पायावर अस्तित्वात येईल, म्हणजे समाजवादी समाजपद्धती ही भांडवलदारी समाजपद्धतीच्या उदरातून नुकतीच **बाहेर पडणारी** समाजपद्धती असेल आणि म्हणून आर्थिक, नैतिक व वैचारिक या सर्व बाबतींत ज्या जुन्या समाजाच्या गर्भातून ती बाहेर येते, तिच्या जन्मखुणा तिच्यावर राहतीलच."

वस्तुतः, समाजवादाचा मार्ग भांडवलदारी समाजातील प्रत्यक्ष विकासातूनच तयार होतो आणि स्थित्यंतराचे स्वरूपही तोच निदर्शित करतो. उत्पादन अधिकाधिक सामाजिक होत जाते, म्हणजे प्रत्येक वस्तू तयार करण्याच्या कामात अधिकाधिक लोकांना भाग घ्यावा लागतो, कारखाने मोठमोठे होऊ लागतात आणि कच्च्या मालातून तयार जिन्नस बनविण्याच्या स्थित्यंतरात उत्पादन क्रिया जनतेला फार मोठ्या प्रमाणावर एकत्रित आणते. आता लोक एकमेकांवर अधिकाधिक अवलंबून राहू लागतात, भांडवलशाहीने जुने सरंजामदारी स्थानिक संबंध व दुवे कधीच निखळून टाकले; परंतु त्यांच्या जागी भांडवलशाहीने फारच विस्तारित स्वरूपाचे नवे संबंध निर्माण केले आहेत. त्याचे स्वरूप इतके व्यापक आहे की, प्रत्येक व्यक्तीला सबंध समाजात घडणाऱ्या घडामोडींवर कमी-अधिक प्रमाणात अवलंबून राहावे लागते.

प्रमुख उत्पादनसाधनांचे सामाजीकरण : समाजवादाचे पहिले पाऊल

भांडवलदारी उत्पादनाची ही अखंड प्रवृत्ती आहे, तरी सुद्धा वस्तुस्थिती ही आहे की, समाजाच्या सहकार्याने निर्माण झालेली संपत्ती सबंध समाजाची मालमत्ता न बनता एखाद्या व्यक्तीची, अगर गटाची मालमत्ता बनते. **म्हणून समाजवादी समाजाच्या रचनेतील पहिले पाऊल समाजाने निर्माण केलेले उत्पादन त्याला परत देणे हे असले पाहिजे. म्हणजे उत्पादनांची साधने खाणी, यंत्रे, जहाजे इत्यादी सर्व—जी भांडवलदारी समाजात खाजगी मालकीची असतात ती सर्व समाजाच्या मालकीची झाली पाहिजेत.**

परंतु उत्पादनांच्या साधनांचे हे सामाजीकरणसुद्धा जुन्या समाजाकडून नव्या समाजाला जो वारसा मिळतो त्याच्या आधारावरच होते. आणि त्यातही तुलनात्मकदृष्ट्या जे अवाढव्य कारखाने असतात तेच काय ते समाजाने ताब्यात घेण्याच्या परिस्थितीत असतात. भांडवलदारी विकासानेच त्यांना तसे तयार केलेले असते. अशा कारखान्यांतून मालक व उत्पादन क्रिया यांच्यांत पूर्ण फारकत झालेली असते. फक्त शेअर होल्डर्सना दिले जाणारे डिव्हिडंड अगर व्याज हाच एक त्यांना जोडणारा दुवा असतो. उत्पादनाचे सर्व कार्य कामगार व कारकून पार पाडीत असतात, कारखान्याची मालकी

संबंध समाजाकडे गेल्याने त्यांच्या कामात फरक होत नाही आणि म्हणून, **मोठे कारखाने तावडतोब समाजाला हातात घेता येतात.**

लहान उद्योगधंद्यांच्या बाबतीत, विशेषतः जेथे स्वतः मालक उत्पादनाच्या कामात महत्त्वाचे भाग घेतो त्या धंद्यांच्या बाबतीत, परिस्थिती निराळी असते. अनेक लहान लहान व अलग अलग धंद्यांची व्यवस्था पाहणे कठीण असते आणि कामगारवर्गाच्या सरकारच्या सुरुवातीच्या अवस्थेत त्याला ते फारच कठीण असते. त्यांच्या बाबतीत आवश्यक गोष्ट ही असते की शहरातील छोटे उद्योग व खेड्यांतील लहान शेते यांच्या केंद्रित कारभाराचा मार्ग तयार करणे.

छोट्या उद्योगांचे सहकारीकरण

या दिशेने कोणती व्यावहारिक पावले टाकता येण्यासारखी असतात? त्याची सर्वसाधारण पद्धत म्हणजे पहिले पाऊल या दृष्टीने सहकाराला उत्तेजन देणे, त्याचा हेतू असा की, त्यातून ह्या छोट्या उत्पादकांनी सामाजिक रीतीने उत्पादन करावयास शिकावे आणि अनेक लहान लहान उत्पादक घटकांच्या जागी एक मोठे उत्पादनकेंद्र तयार व्हावे. अशा लहान मालकांबद्दल एंगल्सने म्हटले आहे :

"छोट्या शेतकऱ्यांच्या वैयक्तिक उत्पादनाचे मालकीचे रूपांतर सहकारी उत्पादन व सहकारी मालकीत करणे हे आपले पहिले कार्य आहे, अर्थात हे कार्य सक्तीने करावयाचे नसते, तर उदाहरण घालून देऊन आणि त्या कार्यासाठी सामाजिक मदत देऊन करावयाचे असते."

"सक्तीने नव्हे, तर उदाहरणांच्या साह्याने व सामाजिक मदतीने घडवून आणलेले स्थित्यंतर" हाच समाजवादी समाजाची उभारणी करण्याच्या मार्क्सवादी दृष्टिकोनाचा मूलभूत पाया आहे. अर्थात, पूर्वीच्या प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमणे, मार्क्सला हे माहीत होते की, आधीचा सत्ताधारीवर्ग, हा बदल निमूटपणे मान्य करणार नाही! आणि शक्य होईल त्या मार्गाने व त्या काळपर्यंत तो जुनी समाजव्यवस्था पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत राहील आणि म्हणूनच त्याच्या या हल्ल्यांचा प्रतिकार करून, त्याचा पराभव करण्यासाठी कामगारवर्गाला बलशाली राज्यसंस्थेची आवश्यकता वाटते. परंतु **नव्या समाजाची उभारणी ही मुख्यतः आर्थिक व सामाजिक प्रक्रिया असून ती बलाच्या वापरावर अवलंबून नाही.**

कामगारसत्ता : समाजवादाची पूर्वअट

तेव्हा निष्कर्ष हा निघतो की, कामगारवर्गाने एकदा पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांची बंडाळी मोडून काढली आणि आपली सत्ता प्रस्थापित केली की तो बँका, रेल्वे आणि इतर उद्योगधंद्यांची व व्यापाराची "सर्वोच्च शिखरे" आणि बडे कारखाने ताब्यात घेतो, परंतु एकदमच तो **सर्व** उत्पादन व व्यापार हातात घेत नाही आणि म्हणूनच क्रांती झाल्यावरोबर प्रत्येकावर तो 'तुम्ही समाजवाद मान्य केलाच पाहिजे' अशी **सक्ती** करीत नाही. आणि या कारणासाठी, **क्रांतीची तावडतोबीची फलश्रुती समाजवाद नसते व असू शकत नाही, तर समाजवादाच्या उभारणीसाठी कामगारसत्तेची स्थापना ही असते** आणि ही उभारणी पूर्ण होण्यास पुष्कळ वर्षे लागतात, म्हणजे सर्व उत्पादन व विभाजन समाजवादी पायावर प्रस्थापित करण्यास बराच काळ जावा लागतो.

समाजवादाचे पहिले आवश्यक क्षण हे की, समाजवादी पद्धतीत उत्पादनाची साधने खाजगी मालकांच्या हातातून काढून घेतली जातात आणि ती सर्व समाजाच्या उपभोगासाठी वापरली जातात. परंतु मार्क्सवादाप्रमाणे हे कोणत्याही नैतिक "तत्त्वावर" आधारलेले नाही, उत्पादनसाधनांवर खाजगी मालकी राहिली तर उत्पादनात खंड पडतो, मानवाने निर्माण केलेल्या उत्पादक शक्तींचा पूर्ण उपयोग होऊ शकत नाही हे त्याचे साधे कारण आहे. तेव्हा उत्पादनसाधने सबंध समाजाच्या मालकीची करणे ही निव्वळ पूर्वतयारी आहे. त्यानंतरचे पाऊल म्हणजे उत्पादन-शक्तीचा नियमबद्ध व हेतूपूर्ण विकास घडवून आणणे.

उत्पादकशक्तींची वाढ

१९१७ मध्ये रशिया होता त्याप्रमाणे औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या देशांसाठीच अशा विकासाची आवश्यकता असते, असे समजणे चूक आहे. सत्ता हातात आल्यानंतर, "कामगारवर्ग आपले राजकीय वर्चस्व....एकूण उत्पादन-शक्तींची शक्य तितक्या वेगाने वाढ करण्यासाठी वापरले", हे जेव्हा मार्क्सने लिहिले, तेव्हा तो औद्योगिक दृष्टीने पुढारलेल्या देशाबद्दलच विचार करीत होता आणि ब्रिटनचे उदाहरण घेतल्यास, आज तेथील उत्पादन-सामुग्री मार्क्सच्या काळापेक्षा अवाढव्य प्रमाणात वाढली असली तरी, आजच्या

शास्त्रीय ज्ञानाच्या जोरावर तिची जी वाढ होण्याची शक्यता आहे तिच्या तुलनेने ती मागासलेलीच आहे. भांडवलशाही समाज-पद्धतीमुळे ती मागासलेली राहिली आहे; आर्थिक अरिष्टांमुळे उत्पादनावर सतत बांध बसतो म्हणून ती मागासलेली राहते; उत्पादन बाजारपेठेसाठी असते आणि भांडवलशाहीत बाजारपेठ मर्यादित असते म्हणून उत्पादनशक्तीच्या वाढीवर मर्यादा पडते. मक्तेदार तांत्रिक शोध विकत घेऊन त्याच्यावर ताबा मिळवितात आणि त्याचा सार्वत्रिक उपयोग होऊ देत नाहीत; म्हणून उत्पादन पद्धती मागासलेली राहते; उत्पादनात योजनाबद्धता नसते म्हणून त्याची पद्धतशीर वाढ होऊ शकत नाही; भांडवलशाही अवाढव्य साधनसामुग्री गटागटांतील लढायांसाठी व वसाहत देशांविरुद्ध लढाया करण्यासाठी वापरते; भांडवलशाहीत बौद्धिक व शारीरिक श्रमांची फारकत केली जाते, म्हणून संशोधनाला महापूर येत नाही; वर्गलढ्यात अमाप श्रमशक्ती खर्ची पडते; भांडवलशाहीत लक्षावधी लोक बेकार राहतात...या सर्वांच्या परिणामी उत्पादनशक्ती मागासलेल्या राहतात.

आणि म्हणून समाजवादी समाजाने कारखाने व खाणी, विद्युत्-केंद्रे व रेल्वे, शेती व मच्छिमारी या सर्वांची पुनर्संघटना केली पाहिजे; त्यांना अधिक अद्यावत् बनविले पाहिजे. असे केले म्हणजे उत्पादनाची फारच वरची पातळी गाठता येईल. हे करण्याचा उद्देश काय? **जनतेचे राहणीमान वाढविणे हा उत्पादन-वाढीचा उद्देश असतो.**

समाजवादाच्या विरोधकांचा आवडता मुद्दा हा असे की, ब्रिटनमध्ये होणारे सर्व उत्पादन सर्वांना सारखे वाटले तरी कामगारांच्या राहणीमानात फारसा फरक पडणारच नाही. हे अर्थातच खरे नाही. परंतु खरे असते तरी या कल्पनेचा मार्क्सवादी समाजवादाच्या विचारांशी काडीमात्र संबंध नाही. समाजवादात उत्पादनाची पातळी कल्पनातीत उंचीवर चढेल हे मार्क्सचे भाकित होते. १९१३ पेक्षा १९५० मध्ये सोविएत युनियनचे औद्योगिक उत्पादन **१५ पटींनी** जास्त होते, याचे कारण त्या काळचा झारचा रशिया मागासलेला होता हेच केवळ नाही. उद्योगप्रधान ब्रिटनमध्ये देखील समाजवादाच्या काळात अमर्याद वाढ करता येण्यासारखी आहे आणि केली जाईल.

सांस्कृतिक विकास

उत्पादन पातळीमधील ही वाढ आणि त्यामुळे जनतेच्या

जीवनमानात होणारी वाढ हाच जनतेच्या बौद्धिक व सांस्कृतिक विकासाची पातळी उंचाविण्याचा भौतिक पाया आहे **आणि या पाया-वरच हा विकास झपाट्याने होतो.**

परंतु या सर्व विकासासाठी **योजनाबद्ध उत्पादन** लागते. भांडवलदारी समाजात एखाद्या धंद्यात जर उत्पादनवाढीच्या जोरावर जादा नफा कमाविण्याची शक्यता निर्माण झाली तरच नवे कारखाने उघडले जातात व विशिष्ट तऱ्हेच्या वस्तूंच्या उत्पादनात वाढ केली जाते. अर्थात अधिक नफा म्हणजे त्या वस्तूची जनतेला अधिक गरज भासते असेही नसते. मागणी अत्यंत श्रीमंत लोकांच्या अगदी छोट्याशा विभागाची असू शकते; अगर एखाद्या असामान्य परिस्थितीत त्या वस्तूंच्या किंमती एकाएकी चढलेल्या असल्यामुळे जादा नफा मिळणार असतो; **ज्या ठिकाणी नफा हीच प्रेरणा असते त्या ठिकाणी उत्पादनात निव्वळ अराजकता उत्पन्न होते. परिणामी, एका बाजूला सतत अतिउत्पादन होते, तर दुसऱ्या बाजूला कमी उत्पादन होते.**

समाजवादी समाजात उत्पादन नफ्यासाठी नसते, तर उपयोगासाठी असते आणि म्हणून त्या ठिकाणी योजनाबद्ध उत्पादन शक्य असते. उद्योगधंद्यांचे संपूर्ण सामायिकीकरण करण्यापूर्वीच ते शक्य होते. काही मुख्य कारखाने समाजाच्या मालकीचे झाले, इतर कारखाने नियंत्रित झाले म्हणजे मग उत्पादनाची योजना आखता येते--ही योजना वर्षानुवर्ष अधिकाधिक बिनचूक बनत जाते.

योजनाबद्ध विकास

तेव्हा आर्थिक क्षेत्रात समाजवादाचा मार्क्सने सांगितलेला अर्थ हा की, उत्पादनाची साधने सबंध समाजाच्या मालकीची होतात, उत्पादन-शक्तीत विलक्षण वेगाने वाढ होते आणि उत्पादन योजनाबद्ध बनते. **आणि या उत्पादनाच्या योजनेचे स्वरूपच असे असते की, उत्पादनाची साधने सतत वाढत असतानाही समाजवादात अति-उत्पादन** होऊ शकत नाही. ते का होऊ शकत नाही, हे गुपित या स्वरूपातच साठविलेले असते.

उत्पादनाची राष्ट्रीय योजना दोन भागांची असते; इमारती, यंत्रे, कच्चा

माल, इत्यादी उत्पादनाच्या नव्या साधनांच्या निर्मितीची योजना आणि नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनाची योजना—यात केवळ अन्न व वस्त्र यांचाच समावेश होत नाही; तर प्रशासनाच्या जोडीला शिक्षण, आरोग्य, करमणूक, खेळ इत्यादींचाही होतो; त्याचप्रमाणे जोपर्यंत संरक्षण शक्तींची गरज असते तोपर्यंत योजनेत त्यांचीही सोय करावी लागते.

समाजवादी पद्धतीत अति-उत्पादन कधीच होत नाही, कारण नित्योपयोगी वस्तूंचे संपूर्ण उत्पादन जनतेसाठी राखून ठेवलेले असते. म्हणजे या वस्तूंच्या एकूण किंमतीच्या बरोबरीइतका पगार व इतर भत्ते देण्यात येत असतात. कधी कधी योजनेत चुका होऊ शकतात. उदाहरणार्थ, लोकांना पाहिजेत त्यापेक्षा जास्त सायकली व कमी बूट एखाद्या वर्षी तयार होतात; परंतु अशा चुका योजनेच्या दुसऱ्या हप्त्यात सहज सुधारता येतात व समतोल निर्माण होतो. या ठिकाणी एका वस्तूच्या उत्पादनाचा दुसरीच्या उत्पादनाबरोबर प्रमाण जमवून घेण्याचाच फक्त प्रश्न असतो; एकूण उत्पादनात कपात करण्याचा प्रश्न कधीच नसतो; कारण **नित्योपयोगी वस्तूंच्या एकूण उत्पादनापेक्षा त्यांचा वापर कधीच कमी होत नाही. वस्तूंच्या उत्पादनात योजनाबद्धता दृढमूल होत जाते त्याप्रमाणेच ती त्यांच्या वाटपातही होत जाते.**

परंतु उत्पादनाचे जनतेत विभाजन वस्तूंच्या रूपांत होत नसते, त्यासाठी पगाराच्या व भत्त्याच्या रूपाने मिळणाऱ्या पैशांच्या वाटपाची यंत्रणाच कामाला येते. या वस्तूंच्या किंमती निश्चित केलेल्या असतात त्यामुळे या सर्व वस्तूंच्या एकूण किंमतींइतका पगार, वगैरे देता येतो. अशा रीतीने उत्पादन व त्यांचा उपयोग यात कधी अंतर पडत नाही. जे जे उत्पादन केले जाते ते सर्व लोक घेऊ शकतात. उत्पादन वाढले की बाजारात उपलब्ध असलेला मालही वाढतो आणि लोकांना मिळणाऱ्या वस्तूंत वाढ होते.

समाजवादी समाजात किंमतीचे हे जे कार्य आहे त्याबद्दल पुष्कळदा गरसमज होतात. भांडवलदारी समाजपद्धतीत किंमतीच्या चढउतारावरून मागणी व पुरवठा यांच्यांतील संबंध समजून येतात. किंमती वाढल्या की त्याचा अर्थ पुरवठा अपुरा आहे असा होतो; किंमती उतरल्या की त्याचा अर्थ पुरवठा जास्त झाला, आता उत्पादन कमी केले पाहिजे असा होतो. म्हणून किंमती भांडवलदारी समाजात उत्पादनाचे नियंत्रण करण्याचे काम करतात;

परंतु समाजवादी समाजात किंमती केवळ वस्तूंच्या वापराचे नियंत्रण करतात, उत्पादन योजनेप्रमाणे चालते, किंमती आधीच निश्चितपणे ठरविलेल्या असतात आणि त्याही अशा रीतीने की, जितके उत्पादन झालेले असते तितके सर्व विकत घेतले जाते.

नित्योपयोगी वस्तूंच्या एकूण उत्पादनाचे जनतेत वाटप कोणत्या पद्धतीने होते ? सर्वांना सर्व वस्तू सारख्याच मिळाल्या पाहिजेत असे मार्क्सचे म्हणणे होते, ही समजूत चुकीची आहे; असे होऊ शकत नाही, कारण समाजवादी समाजाची उभारणी संपूर्णपणे नव्याने केलेली नसते, ती भांडवलशाहीकडून आलेल्या वारशाच्या पायावरच उभारली जाते. सर्वांना सर्व वस्तू सारख्याच वाटून द्यावयाच्या म्हणजे ज्यांची राहणी सर्वसाधारण राहणीपेक्षा वरची असते अशा सर्वांना शिक्षा करणे होय; उत्पादनवाढीला मोठी मदत करणाऱ्या आणि समाजाच्या दृष्टीने अकुशल कामगारांपेक्षा ज्यांच्या कामाला अधिक महत्त्व आहे अशा कुशल कामगारांना शिक्षा देणे होय. म्हणून भांडवलशाहीने मागे ठेवलेल्या विषम परिस्थितीवर आधारलेली समानता न्याय्य ठरणार नाही, तर अन्यायाची ठरेल. या बाबतीत मार्क्सचे विचार अगदी स्पष्ट होते; त्याने लिहिले आहे : "हक्क समान नसतील, तर असमान असतील... समाजाच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा आणि तिने निर्माण केलेल्या सांस्कृतिक विकासापेक्षा न्याय श्रेष्ठ असे कधीच होऊ शकत नाही."

प्रत्येकाला काम–कामाप्रमाणे दाम

भांडवलदारी समाजातून नुकत्याच बाहेर पडलेल्या माणसात विषमताच असते आणि समाजाने त्यांना योग्य रीतीची वागणूक द्यायची तर त्यांच्यात असमानता आहे हे जाणूनच त्यांना वागणूक दिली पाहिजे. अर्थात त्यांनी समाजाची सेवा केली तरच त्यांच्या बाबतीतील हे कार्य पार पाडण्याची जबाबदारी समाजावर राहते आणि म्हणून, "**जो काम करणार नाही त्याला खायला मिळणार नाही,**" हे तत्त्व पुढे येते. यावरून पुढचा निष्कर्ष हा निघतो की, **जो समाजासाठी जास्त काम करील त्याला समाज अधिक वरच्या दर्ज्याचे राहणीमान देईल आणि म्हणून समाजात वापरासाठी तयार झालेल्या नित्योपयोगी वस्तूंची वाटणी "प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीनुसार काम करून घेतले**

जाईल, आणि प्रत्येकाला त्याच्या कामाच्या प्रमाणात दिले जाईल,'' या तत्त्वावर होते.

परंतु समाजवादी समाज भांडवलशाहीकडून मिळालेल्या वारशाच्या पातळीवरच राहत नाही, तो प्रत्येक वर्षी उत्पादन वाढवीत जातो आणि त्याबरोबरच जनतेचे तांत्रिक कौशल्य व संस्कृतीचाही विकास करतो. आणि वेतनातील असमानतेमुळे कुशल आणि सुसंस्कृत श्रमिकांना अकुशल श्रमिकांपेक्षा अधिक पगार मिळत असल्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी ते एक प्रलोभनच ठरते. त्यामुळे वाढत जाणाऱ्या कुशलतेबरोबर उत्पादन अधिक होते. वाटपासाठी अधिक वस्तू तयार होतात आणि त्यामुळे **प्रत्येकाचेच** राहणीमान सुधारते. अशा रीतीने, **समाजवादी समाजात विषमता सबंध समाजाची पातळी उंचावण्याची पहिली पायरी ठरते. भांडवलदारी समाजाप्रमाणे ती मूठभर श्रीमंतांची श्रीमंती वाढविण्याचे व असंख्य गरिबांचे दारिद्र्य वाढविण्याचे साधन ठरत नाही.**

कुवतीप्रमाणे काम–गरजेनुसार दाम

विषमता भावी समाजाचे कायमचे अंग म्हणून राहील, असे मार्क्सला वाटत होते का? नाही. कारण, पुढे समाजाच्या विकासात अशी अवस्था निर्माण होईल की, जेव्हा प्रत्येकजण समाजाची जितकी कामगिरी पार पाडतो त्या प्रमाणातच त्याला वाटा देण्याची आवश्यकता उरणार नाही.

कामाप्रमाणे उत्पादनातील वाटा देणाऱ्या अगर अशाच दुसऱ्या तत्त्वाच्या आधारावर उत्पादनाची वाटणी करणे याचा अर्थ अखेरीस हाच असतो की, सर्वांच्या गरजा पूर्ण करण्याइतके उत्पादन समाजात होत नाही. भांडवलदारी समाजात, ज्या कुटुंबात सर्व व्यक्तींना पुरेल इतके अन्न मिळू शकते, ती कोणत्याही तत्त्वावर अन्नाची वाटणी करीत नाहीत, कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती तिला जितके लागेल तितके अन्न खात असते. त्याचप्रमाणे, समाजवादी समाजात, सर्व नागरिकांनी गरजेइतके स्वतःसाठी घेतले तरी कोणालाही कमी पडणार नाही इतक्या पातळीवर उत्पादन गेले, तर त्यातून मोजूनमापून वाटणी काढण्याचा अगर वाटण्यावर **नियंत्रण** घालण्याचा प्रश्नच कोठे येतो? ही अवस्था प्राप्त होते त्यावेळी, उत्पादन व त्याची वाटणी

"प्रत्येकाकडून त्याच्या शक्तीनुसार आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार" या तत्त्वावर चालू होते.

हे ज्या वेळी शक्य होते त्याच वेळी साम्यवादाचे (कम्युनिझमचे) समाजवादापासून (सोशालिझमपासून) असलेले वेगळेपण स्पष्ट होऊ लागते. समाजवाद या संज्ञेची मांडणी केली आहे ती अशीः समाजवाद ही पहिली पायरी असते; त्या वेळी उत्पादनाची साधने जनतेच्या मालकीची असतात. आणि म्हणून त्या अवस्थेत माणसाची माणसाकडून पिळवणूक होत नाही; परंतु प्रत्येक व्यक्तीला पाहिजे तितके मुक्तपणे मिळू शकेल, इतक्या उंचीवर समाजवादी योजनाबद्ध उत्पादन पोहोचण्यापूर्वीची ही अवस्था असते.

साम्यवादी समाज-आदर्श समाज

आणि तरीसुद्धा, **समाजाची साम्यवादी अवस्था या संज्ञेत** केवळ भौतिक सुबत्तेपेक्षा कितीतरी अधिक अर्थ भरलेला आहे. कामगारवर्गाने सत्ता हातांत घेऊन समाजवादाचा मार्ग आक्रमण करण्यास प्रारंभ केल्यापासून, जनतेच्या दृष्टिकोनातही बदल घडू लागतो. भांडवलशाहीत अनुल्लंघनीय भासणारे सर्व प्रकारचे अडथळे निर्बल बनून अखेर नाहीसे होतात. शिक्षण व विकासाच्या इतर सर्व वाटा सर्व मुलांना सारख्याच मोकळ्या होतात; मग त्यांच्या पालकांचा सामाजिक दर्जा अगर आर्थिक परिस्थिती कशीही असो. 'जाती'भेदांचा प्रभाव नष्ट होतो. मुले बुद्धिप्रमाणेच हातांचाही उपयोग करायला शिकतात, आणि बौद्धिक व शारिरीक श्रमांची ही समानता हळूहळू सर्व समजात पसरू लागते. प्रत्येकजण 'बुद्धिजीवी' बनतो आणि बुद्धिजीवी लोक स्वतःला शारिरीक मेहनतीपासून अलिप्त ठेविनासे होतात.

स्त्रियांना कमी दर्जाचे मानण्यात येत नाही अगर समाजातील कोणत्याही क्षेत्रातील कामाला त्यांना असमर्थ किंवा नालायक समजले जात नाही. काम करणे त्यांना सोपे व्हावे म्हणून खास सोई करण्यात येतात. शिशुसंगोपनाची व्यवस्था कारखान्यांतून, रहात्या घरांतून वगैरे करण्यात येते आणि अशा रीतीने मातांना अधिक मोकळीक मिळवून देण्यात येते. सामायिक स्वयंपाक-गृहांच्या, धोबीखान्यांच्या व भोजन-गृहांच्या साहाय्याने स्त्रियांचे घरातील काम कमी करण्यात येते. काम करण्याची

सक्ती त्यांच्यावर करण्यात येत नाही; परंतु काम करणे त्यांना सोपे होईल अशा सोई त्यांना उपलब्ध करून दिल्या जातात.

राष्ट्रगटांतील भिंती फोडून टाकण्यात येतात. समाजवादी समाजात अंकित जातीजमाती नसतात; अमक्याचा अमूक एक वर्ण आहे किंवा तो अमूक एका राष्ट्रगटाचा आहे, म्हणून कोणालाही वरिष्ठ किंवा कनिष्ठ मानले जात नाही. आपल्या आर्थिक सुप्त धनसंपत्तीचा, तसेच वाङ्मयीन आणि कलात्मक परंपरांचा विकास घडवून आणण्याच्या कामात सर्वच राष्ट्रगटांना मदत देण्यात येते.

दर पाच वर्षांनी पार्लमेंटसाठी प्रतिनिधी निवडून देण्याच्या स्वातंत्र्यावरच लोकशाही थांबत नाही. प्रत्येक कारखान्यात, राहत्या घराच्या प्रत्येक ब्लॉकमध्ये, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया व पुरुष आपले व आपल्या देशाचे भवितव्य घडवीत आहेत. अधिकाधिक लोकांना सार्वजनिक कामात ओढले जात आहे, स्वतःच्या व दुसऱ्याच्या कल्याणाची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात येत आहे. इतरत्र वसत असलेल्या कोणत्याही दुसऱ्या प्रकारच्या लोकशाहीपेक्षा ही लोकशाही अधिक भरीव व अधिक सत्य असते.

शहरे व खेडी यांच्यांतील फरक नष्ट केला जातो. खेड्यांतील कामगार यंत्रांचा उपयोग करायला शिकतात आणि आपल्या तंत्रकौशल्याची बाढ शहरातील कामगारांच्या बरोबरीने करतात. पूर्वी फक्त शहरातच मिळणाऱ्या शिक्षणाच्या व सांस्कृतिक विकासाच्या सोई खेडे विभागांतही मिळू लागतात.

थोडक्यात म्हणजे, समाजवादाने अस्तित्वात आणलेल्या भौतिक परिस्थितीतील परिवर्तनामुळे स्त्री-पुरुषांच्या दृष्टिकोनात व व्यक्तित्वात विलक्षण बदल घडून येतो. ज्यांचा सर्वांगीण विकास झालेला आहे, ज्यांना सर्वांगीण शिक्षण मिळालेले आहे, जे जगात कोणतीही कामगिरी पार पाडण्यास समर्थ बनले आहेत, असे ते लोक बनतील.

आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट अशी की, **भांडवलशाही समाजात परिपुष्ट झालेल्या स्वार्थी व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनाच्या जागी खराखुरा सामाजिक दृष्टिकोन, समाजाबद्दलच्या जबाबदारीचा दृष्टिकोन निर्माण होतो.** मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, "श्रम हे केवळ उपजीविकेचे साधन राहत नाहीत, तर ती जीवनातील सर्वांत आवश्यक बाब बनते." समाजविकासाच्या या अवस्थेत, साम्यवादी समाजात, काम

करण्यासाठी कोणत्याही प्रलोभनाची गरज उरणार नाही, कारण त्या काळातील स्त्री-पुरुषांना समाजाच्या आणखी विकासाला हातभार लावण्याचे कार्य पार पाडण्याशिवाय दुसरा निराळा दृष्टिकोन उरणारच नाही.

हे मनोराज्य आहे का? नाही. पण ज्यांना मार्क्सवादाचा भौतिक पाया समजलेला नाही, त्यांना हे सर्व केवळ मनोराज्यवादीच वाटेल. (मार्क्सवादी भौतिकवादासंबंधीचे विचार या पुस्तकातील दुसऱ्या प्रकरणात त्रोटकपणे मांडलेले आहेत.) माणसाचा अनादि अनंत असा स्वभाव-धर्म अगर दृष्टिकोन नसतो; प्राथमिक अवस्थेतील जमातीच्या समाजात जमातीविषयीच्या जबाबदारीची जाणीव फारच मोठी असते. अशा समाजाच्या आजच्या अवशेषांतही ती आढळून येते. त्यानंतरच्या समाजात, वर्गभेद निर्माण झाल्यानंतर, सामाजिक जबाबदारीची जाणीव कमी झाली; तरीही केवळ आपल्या **वर्गापुरती** ती काही प्रमाणात शिल्लक राहिली. भांडवलशाही समाजात सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेचा संपूर्ण विध्वंस झाला, "ज्याने त्याने स्वतःपुरते पाहावे." हे या समाजात जीवनाचे प्रमुख तत्त्वज्ञान बनते.

दोन दृष्टिकोन–मूलभूत बदल

पण भांडवलदारी समाजातसुद्धा कामगारांत "ऐक्याची भावना" असते. ही समान हित-संवर्धनाची, समान जबाबदारीची भावना असते. ही ऐक्याची कल्पना कोणाच्या तरी मनात स्फुरली आणि ती त्याने कामगारांच्या डोक्यात भरली, असे होत नाही; ती कामगारवर्गाच्या जीवनाच्या भौतिक परिस्थितीतून ते एकत्र काम करतात आणि एकाच मार्गाने जीवनावश्यक वस्तू मिळवितात, या परिस्थितीतून निर्माण होते. त्यांच्या उलट, सामाजिक अगर सामुदायिक जबाबदारीचा अंशही ज्याच्यामध्ये उरलेला नाही असा नमुनेदार स्वार्थी, व्यक्तिनिष्ठ माणूस म्हणजे भांडवलदार. त्याच्याभोवती दुसऱ्याला मारून, स्वतः गबर बनण्यासाठी धडपडणाऱ्या, स्पर्धा करणाऱ्या, भांडवलदारांचे कडे असते. अर्थात सत्ताधारीवर्गाची ही प्रतिस्पर्धी बनून स्पर्धा करण्याची विचारसरणी कामगारवर्गातही पसरू पाहाते आणि त्यांच्यातील ऐक्याच्या भावनेवर ताबा मिळविते; विशेषतः ज्यांना मालक खास सवलती देऊन आर्थिक विकासाची संधी देतात, त्यांच्यात तिचा विशेष प्रसार होतो. आणि तरीसुद्धा, [व्यक्ती म्हणून नव्हे], वर्ग म्हणून, प्रत्येक वर्गाचा एक खास

दृष्टिकोन असतो आणि त्या वर्गाच्या जीवनाची भौतिक परिस्थिती, त्याच्या जीवनाच्या उपजीविकेची पद्धत त्या दृष्टिकोनाचा मूलभूत पाया असते.

यावरून निष्कर्ष निघतो तो हा की, **जीवनाच्या भौतिक परिस्थितीत बदल घडवून आणला, उपजीविका करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणला की, जनतेच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणता येतो.** सोविएत युनियनमधील शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनात जो बदल झालेला आहे त्यापेक्षा अधिक उत्तम उदाहरण या बाबतीत दुसरे मिळणार नाही. प्रत्येक लेखकाने झारशाहीतील रशियन शेतकऱ्यांच्या स्वार्थसाधू व हावरट व्यक्तिनिष्ठेचे वर्णन केलेले आहे. क्रांतीच्या विरोधकांचा हा दावा होता की, शेतकऱ्यांना कधीही समाजवाद पटवून देता येणार नाही; शेतकरी क्रांतीचा धुव्वा उडवतील आणि हे अगदी खरेच होते की, जीवनाच्या परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचा दृष्टिकोन इतका संकुचित, इतका दृढमूल झालेला होता की, वादविवादाने त्यांना समाजवाद पटवून देणे, अगर सक्तीने त्यांच्यावर समाजवाद लादणे अशक्यच होते; पण हे टीकाकार मार्क्सवादी नसल्यामुळे, एखादे आदर्श शेतकी केंद्र, जवळपास असलेले ट्रॅक्टर स्टेशन, यांचा शेतकऱ्यांवर किती परिणाम होतो, आणि मोठ्या प्रमाणावर शेती करण्यामुळे पिके कशी भरघोस मिळताहेत हे त्यांना व्यवहारात कसे समजते, हे त्यांच्या लक्षात आले नाही. सोविएत सरकारने यांत्रिक शेती व मोठ्या प्रमाणावरील मशागत या कार्यक्रमासाठी त्यांना तयार केले; परंतु छोट्या छोट्या शेतीच्या सीमारेषा पुसल्याशिवाय व सामुदायिक पद्धतीने शेती केल्याशिवाय हे करणे शक्य नव्हते. तसे झाल्यानंतर त्यांच्या दृष्टिकोनातील विभक्तपणाही नाहिसा झाला. त्यांनी सामुदायिक जीवन जगण्यास प्रारंभ केला आणि ते एका नव्या प्रकारचे शेतकरी बनले, त्यांच्यात सामुदायिक जबाबदारीची भावना निर्माण झाली आणि ही भावना त्यांना सामाजिक दृष्टिकोनाच्या मार्गावर बऱ्याच पुढच्या टप्प्यापर्यंत घेऊन जाणारी आहे.

आणि म्हणून कोणत्याही देशाचा भौतिक पाया जेव्हा समाजवादी उत्पादन व वाटप हा असतो, जेव्हा सबंध समाजासाठी काम करून सर्व लोकांना उपजीविका करता येते, तेव्हा एका अर्थी अगदी स्वाभाविकपणे सामाजिक जबाबदारीची भावना वाढीला लागते; त्यानंतर लोकांना हे पटवूनही द्यावे लागत नाही की, सामाजिक तत्त्वच बरोबर असते. 'मानवी स्वभावाच्या'

सहज प्रवृत्तीवर ही अमूर्त, नैतिक कर्तव्याची भावना कलम करण्याचा प्रश्नच नसतो. मानवी स्वभावच व्यवहारातून, सवयीतून बदलत असतो.

समाजवादी अगर साम्यवादी समाजपद्धती सर्व जगभर पसरल्यानंतर आणखी काय काय परिणाम होतील याचा अद्याप आपण विचार केला नाही. मार्क्सच्या लेखनावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, त्या काळात युद्धे नाहिशी होतील; कारण प्रत्येक देशात उत्पादन व वाटप समाजवादी पायावर होऊ लागल्यानंतर, कोणत्याही देशात इतर देश जिंकण्याची यत्किंचितही इच्छा बाळगणारे गट अस्तित्वात राहणार नाहीत. भांडवलशाहीचा विस्तार करण्यासाठी, बँक भांडवलदारांच्या गटांना भांडवल गुंतविण्यास नव्या संधी मिळविण्यासाठी, रेल्वे, डॉक्स व खाणींना नवी यंत्रे पुरविण्याची कंत्राटे मिळविण्यासाठी, स्वस्त कच्च्या मालाची नवी कुरणे मिळविण्यासाठी आणि बाजारपेठा मिळविण्यासाठी, तौलनिक दृष्टीने मागासलेल्या देशांना भांडवलदारी राष्ट्रे गुलाम बनवतात. समाजवादी देश युद्धे पेटविणार नाहीत, कारण त्यांना अगर त्यांच्यातील कोणत्याही गटांना युद्धातून कसलाही फायदा मिळणार नसतो.

समृद्ध व सुसंस्कृत समाज

याच कारणासाठी, **कोणत्याही समाजवादी राष्ट्राला, जगातील कोणताही देश मागासलेला रहावा अशी यत्किंचितही इच्छा नसते.** उलट प्रत्येक देशाची औद्योगिक प्रगती झाल्यास आणि त्यांची सांस्कृतिक उन्नती झाल्यास सर्व समाजवादी राष्ट्रांचा फायदाच होईल, कारण जगात सर्वांचेच राहाणीमान वाढले की जीवन समृद्ध होईल. आणि म्हणून औद्योगिक दृष्टीने पुढारलेले समाजवादी देश मागालेल्या देशांच्या विकासाला मदत करतील, त्यांचा विकास थांबवून धरणार नाहीत आणि अर्थातच त्यांची पिळवणूक कधीच करणार नाहीत.

अशा जागतिक समाजवादी पद्धतीत मानवाची आणखी किती प्रगती होईल याची कल्पना करणे अशक्य आहे. प्रत्येक देशातील आर्थिक जीवन योजनाबद्ध झाल्यानंतर आणि प्रत्येक देशातील योजनांना सूत्रबद्ध करणारे एक जागतिक नियोजन आल्यानंतर, सर्व देश तांत्रिक व यांत्रिक शोधांचा लाभ एकाच वेळी करून घेत असताना आणि सर्व तऱ्हेच्या सांस्कृतिक

प्रगतीची मुक्त देवाण-घेवाण चालू झाल्यानंतर माणसाची प्रगती अतिवेगाने होईल, यात कोणतीच शंका नाही.

भरधाव वेगाने पुढे जाणारी ही प्रगती माणसाला कोठे घेऊन जाईल या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न मार्क्सने कधी केला नाही, कारण शास्त्रीय भविष्य सांगण्याच्या दृष्टीने परिस्थिती फारच अज्ञात होती व आजही आहे. परंतु, जगभर साम्यवादाची स्थापना झाल्यानंतर मानवी इतिहासातील वर्गभेद व वर्गलढे यांचे दीर्घ पर्व संतुष्टात आलेले असेल, ही गोष्ट स्पष्ट आहे. त्यानंतर समाजात नवे वर्गभेद व वर्गलढे निर्माण होणार नाहीत; त्याचे मुख्य कारण असे की, साम्यवादी समाजात त्यांना जन्म देणारी परिस्थितीच नसेल. माणसाची उत्पादनशक्ती कमी होती त्यावेळी वर्गविभागणीमुळे उच्च उत्पादन शक्तीचा शोध लावणाऱ्यांना व संघटनकर्त्यांना मदत झाली, पुढेही तिने ही कामगिरी पार पाडली आणि भांडवलशाहीत वर्गविभागणीमुळे उत्पादनाच्या केंद्रिकरणाला व तंत्र-कौशल्याच्या अवाढव्य विस्ताराला साहाय्य झाले.

परंतु साम्यवादी अवस्थेत माणसाने प्रगत केलेल्या उत्पादनशक्तींनी त्याला इतके सुसंपन्न बनविले असेल की, **दिवसाला दोन तास काम केले तरी ते पुरेसे होऊ शकेल.** अशा अवस्थेत वर्गभेद नष्ट होऊ शकतात व झालेच पाहिजेत. **त्यानंतर मानव निसर्गाशी चाललेल्या लढ्याचे धागे पुनः आपल्या हाती घेईल. पण आता त्याची बाजू जास्त भक्कम असेल.** त्याला जादूटोण्याने निसर्गावर जय मिळविण्याचे कारण उरणार नाही. नैसर्गिक आपत्तींना रोखण्यासाठी प्रार्थना म्हणाव्या लागणार नाहीत, वर्गलढे व युद्धाच्या खाईतील आंधळेपणाने धडपडण्याची गरज उरणार नाही, तर **आत्मविश्वासाने, निसर्गशक्तींना स्वतःसाठी राबविण्याच्या निश्चयाने, तो सतत पुढे पुढे जात राहील.....** साम्यवादी समाजातील मानवाचे मार्क्सने रेखाटलेले चित्र हे असे आहे.

निसर्गासंबंधी मार्क्सवादी दृष्टिकोन

मार्क्सवाद मानवाला आणि म्हणूनच मानवी समाजाला निसर्गाचा एक भाग मानतो, हा मुद्दा पूर्वी आलेला आहे. म्हणून मानवाच्या उत्पत्तीचा शोध सृष्टीच्या विकासात घेतला पाहिजे. जीवावस्थेच्या पूर्वीच्या प्रकारातून माणसाची उत्क्रांती झाली. या उत्क्रांतीच्या क्रियेत विचारशक्तीचा व सहेतूक कार्याचा जन्म झाला. याचा अर्थ असा की, सचेतन मन असलेली सत्यसृष्टी अस्तित्वात येण्यापूर्वी अचेतन सत्यसृष्टी-भूततत्त्व-अस्तित्वात होते. याचाच दुसरा अर्थ असा होतो की, बाह्य जगाचे –भूततत्त्वाचे- अस्तित्व स्वतंत्र असते, ते मानवी मनावर अवलंबून नसते. निसर्गासंबंधीच्या या दृष्टिकोनाला "भौतिकवादी" दृष्टिकोन म्हणतात.

याच्या विरोधी असलेला दृष्टिकोन, बाह्य जग असत्य मानतो, बाह्य जगाचे अस्तित्व फक्त मानवी मनात असते, किंवा एखाद्या सर्वश्रेष्ठ शक्तीच्या मनात असते, असे समजतो. या दृष्टिकोनाला "अध्यात्मवादी" विचारसरणी म्हणतात. अध्यात्मवादाचे अनेक प्रकार आहेत. पण त्या सर्वांचा मुख्य आशय हाच आहे की, मानवी अगर "दैवी" मनच आद्य सत्य असून, जड वस्तूंना खरेखुरे अस्तित्व असलेच तर ते दुय्यम असते.

मार्क्सवादी विचारांच्या लोकांच्या दृष्टीने मात्र, एंगल्सने म्हटल्याप्रमाणे, **"जगासंबंधीचा भौतिकवादी दृष्टिकोन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून, हातचे काहीही राखून न ठेवता निसर्ग जसा आहे तसा तो मानणे होय."** बाह्य जगत् सत्य आहे, आपल्याला त्याची जाणीव असो अगर नसो, ते अस्तित्वात असतेच आणि त्याची गती व विकास निश्चित स्वरूपाच्या नियमानुसार चालतात, हे नियम आपण शोधून काढून त्यांचा उपयोग करू शकतो; परंतु त्यांच्यावर कोणत्याही मनाची सत्ता चालत नाही, असा हा दृष्टिकोन आहे.

बाह्य जगत् अगर वस्तुमात्र सत्य नाही; असलेच तर ते, केवळ दुय्यम सत्य आहे असे अध्यात्मवाद मानतो. तो असेही समजतो की, आपल्याला सत्य कधीच समजून येणार नाही. जगाचे "अद्‌भुत चमत्कार" अनाकलनीय आहेत, असे तो मानतो.

निसर्ग बदला-स्वतःही बदला

भौतिकवाद व अध्यात्मवाद यांच्यातील वादाला महत्त्व का आहे? महत्त्व यासाठी आहे की, हा केवळ कल्पनेचा अगर अमूर्त विचारांचा प्रश्न नाही, हा व्यावहारिक प्रश्न आहे. **माणूस केवळ निसर्गाचे निरीक्षणच करीत नाही, तो निसर्गाला बदलतो आणि त्याच्या बरोबर स्वतःही बदलतो.**

दुसरा मुद्दा हा की, भौतिकवादी दृष्टिकोनानुसार, माणसाच्या मनात जे असते, म्हणजे माणसाला ज्याची जाणीव असते, ती बाह्य सत्यसृष्टी असते, माणसाच्या मनातील कल्पना सत्याचे प्रतिबिंब असतात, त्यांचा उगम बाह्य जगात होतो. याचा अर्थ असा नव्हे की, सर्वच कल्पना व विचार खरेच असतात, अगर सत्याची खरी प्रतिबिंबे असतात; मुद्दा असा की सत्याच्या अनुभवावरूनच त्यांच्या खरेपणाची परीक्षा होत असते.

याच्या उलट, अध्यात्मवादी चिरंतन तत्त्वांवर विश्वास ठेवतात आणि ती सत्याशी जुळतात की नाही याची त्यांना पर्वा करावीशी वाटत नाही. सध्याच्या परिस्थितीतील उदाहरण द्यायचे, तर शुद्ध शांततावादी अगर अहिंसावादी दृष्टिकोनाचे देता येईल. अशी माणसे आपल्या सभोवतालच्या जगाकडे संपूर्णपणे दुर्लक्ष करतात, वस्तुस्थितीत, आपल्या जीवनाच्या अनुभवाच्या दृष्टीने, जुलूमजबरदस्तीचा प्रतिकार केला नाही तर अधिक जबरदस्ती, अधिक आक्रमण व अधिक पशुता बोकांडी बसते या गोष्टींना ते महत्त्वच देत नाहीत. जगाचा अध्यात्मवादी दृष्टिकोन बाह्य जगाला असत्य मानण्याची प्रवृत्ती हाच या शुद्ध शांततावादाचा मूलभूत पाया असतो. अर्थात् कधीकधी आपला तात्त्विक दृष्टिकोन असा आहे याची त्यांना जाणीवही नसते.

मार्क्सवाद मात्र आपले सर्व सिद्धांत जगाबद्दलच्या भौतिकवादी विचारांवर, आधारतो, या दृष्टिकोनातून तो जगाचे निरीक्षण करतो, जग ज्यानुसार चालते ते नियम शोधून काढण्याचा प्रयत्न करतो आणि मानव याच सत्याचा भाग

असल्यामुळे मानवी समाजाची हालचाल ज्या नियमानुसार चालते, ते शोधण्याचा प्रयत्न करतो. आणि मग तो आपले सर्व निष्कर्ष प्रत्यक्ष अनुभवांच्या निकषावर घासून पहातो. आणि त्यातील जे सिद्धांत अगर जे निष्कर्ष (अगदी सोप्या शब्दात सांगायचे तर) वस्तुस्थितीशी जुळत नाहीत, ते सुधारण्याचा प्रयत्न करतो किंवा टाकून देतो.

जगाबद्दलच्या (यात नेहमीच मानवी समाजाचा अंतर्भाव असतो) या दृष्टिकोनात अशी सर्वसाधारण स्वरूपाची वैशिष्ट्ये आहेत की जी सत्य आहेत, मनाने लादलेली नाहीत. हा मार्क्सवादी दृष्टिकोन मूलतः शास्त्रीय आहे, सत्यावर आधारलेला आहे, कोणीही बुद्धिमान व्यक्तीने डोक्यातून शोधून काढलेले ते तत्त्वज्ञान नाही. आणि म्हणून जग केवळ भौतिक आहे एवढेच पाहून तो थांबत नाही, तर त्याची दुसरीही अंगे आहेत हे त्याच्या लक्षात येते. त्याचे वर्णन तो 'विरोधविकासात्मक' या शब्दाने करतो. जगाबद्दलचा हा 'विरोधविकासात्मक भौतिकवादी' दृष्टिकोन बहुधा गूढ समजला जातो. पण तो खरोखरी गूढवादी नाही, कारण तो सत्याचे प्रतिबिंब आहे आणि प्रत्येकाला माहीत असलेल्या सामान्य वस्तूंच्या वर्णनाच्या आधारावर "विरोधविकासात्मक" या शब्दाची फोड करून दाखविता येते.

निसर्ग व मानव परस्परसंबंधीत

पहिला मुद्दा हा की, **मानवी समाजाचा ज्यात अंतर्भाव आहे, ते हे जग, अगर निसर्ग एकमेकापासून वेगळ्या व संपूर्णपणे स्वतंत्र अशा वस्तूंचा संग्रह नाही.** प्रत्येक शास्त्रज्ञाला हे माहीत असते आणि ज्या विशिष्ट वस्तूचा तो अभ्यास करीत असतो, तिच्यावर परिणाम घडविणाऱ्या महत्त्वाच्या कारणाचीसुद्धा दखल घेताना त्याला फार अडचण भासते. पाणी हे पाणीच असते, परंतु त्याचे तपमान विशिष्ट अंशापर्यंत वाढविण्यात आले (किती ते हवेच्या दाबावर अवलंबून राहते) की त्याची वाफ होते; त्याचे तपमान कमी करण्यात आले तर त्याचा बर्फ होतो, अशा प्रकारे इतर सर्व परिस्थितीचा त्याच्यावर परिणाम होतो. सर्वसामान्य माणसालाही कोणत्याही वस्तूचा अभ्यास करावयाचा झाला तर जगात एकही वस्तू संपूर्णपणे स्वतंत्र अस्तित्व असलेली नाही, प्रत्येक दुसरीवर अवलंबित्व आहे, हे कळून येते.

खरे पाहता, वस्तूंचे हे परस्परावलंबित्व इतके स्वाभाविक वाटण्याचा संभव आहे की, त्याचा खास उल्लेख करण्याची काही आवश्यकता दिसत नाही पण त्याची दखल मात्र लोक नेहमीच घेतात असे नाही. एका परिस्थितीत जे खरे आहे, ते निराळ्या परिस्थितीत खरे असेलच असे नाही, हे लोकांच्या लक्षात येत नाही. ते एका परिस्थितीत बनलेले विचार सतत दुसऱ्या परिस्थितीला लागू करीत असतात. भाषण–स्वातंत्र्याकडे पाहण्याच्या वृत्तीचा मुद्दा उदाहरणादाखल घेऊ या. सर्वसाधारणपणे, भाषणस्वातंत्र्यामुळे लोकशाहीला मदत मिळते, त्यामुळे निरनिराळ्या विषयांवर लोकांना आपली मते व्यक्त करता येतात आणि म्हणून ते समाजाच्या विकासाला साहाय्यकारी असते. परंतु फॅसिस्टांना भाषण-स्वातंत्र्य देणे म्हणजे जे मूलतः लोकशाहीला विरोधी आहे त्याला स्वातंत्र्य देणे ठरते; त्याने समाजाची प्रगती खुंटून जाते आणि म्हणून "भाषण-स्वातंत्र्याच्या" मंत्राचा कितीही जयघोष केला तरी नित्याच्या परिस्थितीत त्यातला जो भाग खरा आहे, लोकशाही हेच आपले ध्येय आहे असे मानणाऱ्या पक्षांच्या दृष्टीने खरा आहे, तो भाग फॅसिस्ट पक्षांच्या दृष्टीने खरा नसतो. त्यांचा हेतू लोकशाहीला बदनाम करून अखेरीस ती नष्ट करणे हाच असतो.

विरोध विकासवादी दृष्टीला आणखीही एक गोष्ट दिसते.

जग गतिमान व विकसनशील आहे

जगात काहीही स्थिर नाही, सर्व काही गतिमान असते, बदलत असते, एक उदय तर पावत असते, विकास पावत असते, अगर अस्ताला जात असते व नष्ट होत असते सर्व शास्त्रीय ज्ञानाचा या सिद्धांताला पाठिंबा आहे. खुद्द पृथ्वीही सतत बदलत आहे. जिवंत प्राणीमात्रांच्या बाबतीत तर ही क्रिया फारच स्पष्टपणे दिसणारी आहे. आणि म्हणून सृष्टीची खरोखरीच शास्त्रीय दृष्टीने तपासणी करायची असेल तर या बदलाची दखल घेणे जरूर आहे; आणि वस्तू कायमच्या बांधल्या गेलेल्या आहेत, नित्य आहेत या दृष्टीने त्यांच्याकडे पाहता कामा नये.

सत्याचे हे स्वरूप इतके उघड असताना ते मुद्दाम सांगण्याची काय आवश्यकता आहे? हे पुन्हा सांगण्याचे कारण इतकेच की, माणसे जगाकडे आणि विशेषतः मानवी समाजाकडे व व्यक्तींच्याकडे पाहताना जो दृष्टिकोन स्वीकारतात,

तो हा नसतो. नफ्यासाठी उत्पादन हे मानवी समाजाचे नित्य स्वरूप नाही, ते विशिष्ट काळी आस्तित्वात आले, वाढले आणि आता विनाश पावत आहे. हे ज्यांना पटत नाही, असे लोक सत्यासंबंधी वर वर्णन केलेला व अत्यंत स्पष्ट असा दृष्टिकोन व्यवहाराला लागू करत नाहीत "जसे आजपर्यंत होते, तसेच पुढे चालणार," असे म्हणणारे बहुतेक सर्वत्र भेटतात आणि व्यक्तीच्या व समाजाच्या विकासाला ही विचारसरणी कायमचा अडथळा बनते.

प्रत्येक घटक बदलत असतो, विकास पावत असतो, अगर विनाश पावत असतो, या मुद्याचे नीटपणे आकलन झाले म्हणजे आणखीन एक मुद्दा उपस्थित होतो. हे असे आहे म्हणून, आपला ज्या ज्या गोष्टीशी संबंध येतो, तिने कोणती अवस्था गाठली आहे हे लक्षात घेणे व्यावहारिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. गाय विकत घेणाऱ्या शेतकऱ्याला या गोष्टीची पूर्ण जाणीव असते, घर विकत घेणारा माणूसही नीट पाहून घेतो; वास्तविक जीवनाच्या साध्या व्यवहारात ह्या नियमाकडे कोणीच दुर्लक्ष करीत नाही. परंतु दुर्दैवाने मानवी समाजसंस्थांना व विशेषतः उत्पादन पद्धतींना व त्याच्या अनुषंगाने येणाऱ्या विचारांच्या बाबतीत मात्र ह्या नियमाची जाणीव फारशी ठेवली जात नाही. (या मुद्याची सविस्तर चर्चा पुढे करण्यात येणार आहे.)

तेव्हा, पहिल्या विषयाकडे पुन्हा वळावयाचे म्हणजे, वस्तुमात्राचे परस्परावलंबित्व व गतिमानता–त्यांच्यात सतत परिवर्तनाची प्रक्रिया चालू असते ही गोष्ट सत्याची अत्यंत स्पष्ट अंगे आहेत. "विरोध-विकासवादी" विचारसरणीत अंतर्भूत असलेले तिसरे अंग त्याची मांडणी होताच सहज समजून येण्याइतके सोपे आहे, हे जरी खरे असले तरी ते तितके स्पष्ट मात्र नाही.

क्रांती कशी घडते?

हा तिसरा मुद्दा असा : वस्तुमात्रात होणारा विकास सरळ, संथ होत नाही. तो काही विशिष्ट बिंदूवर खटकन तुटतो. सरळ व संथ विकास कधी कधी पुष्कळ काळपर्यंत होत रहातो, त्या काळात त्यात एकच एक बदल होत असतो; म्हणजे विशिष्ट परिमाणाचे आधिक्य वाढत जाते. पुन्हा एकदा पाण्याचे उदाहरण घेऊ या. पाण्याचे तपमान वाढत असताना पाणी हे पाणीच रहाते, पाण्याचे सर्व गुणधर्म तेच राहतात, फक्त त्यातील उष्णता वाढत जाते.

त्याचप्रमाणे, पाण्याचे तपमान कमी करीत नेल्यास त्याचे इतर सर्व गुणधर्म तेच राहतात, फक्त त्यातील उष्णता कमी होत जाते.

परंतु ही क्रिया तशीच चालू असताना, एका विशिष्ट बिंदूवर, म्हणजे पाणी उकळण्याच्या अगर गोठण्याच्या बिंदूवर, एकाएकी चालू क्रियेत खंड पडतो, पाण्याचे गुणधर्म पूर्णपणे बदलतात, पाणी पाणी रहात नाही, ते वाफ अगर बर्फ बनते. सत्याचे हे स्वरूप रसायनशास्त्रात अधिक स्पष्टपणे दिसून येते. तेथे एखादा घटक कमी अगर अधिक घेतल्यास परिणामाच्या स्वरूपात साफ बदल घडून येतो.

मानवी समाजात, अनेक वर्षेपर्यंत, क्रमशः बदल होत रहातो; या काळात समाजाच्या स्वरूपात कोणताही मूलभूत बदल होत नाही. मग एकाएकी या क्रियेत खंड पडतो. क्रांती होते. समाजाचा जुना प्रकार नष्ट केला जातो आणि नवा प्रकार जन्माला येतो व तो आपल्या विकासाचा मार्ग आक्रमू लागतो. अशा रीतीने, सरंजामदारी समाजात, उत्पादन स्थानिक गरजेसाठी होत असताना, अधिक उत्पादन बाजारात जाऊ लागताच त्यातून बाजारपेठेसाठी उत्पादन सुरू झाले आणि होता होता त्यातून भांडवलदारी उत्पादनाचा उगम झाला. ही एक संपूर्णपणे संथपणे होत जाणाऱ्या विकासाची क्रिया होती; परंतु एका विशिष्ट वेळी उगवत्या भांडवलदारवर्गाचा सरंजामदारी व्यवस्थेशी संघर्ष निर्माण झाला, त्याने सरंजामदारी व्यवस्थेचा पाडाव केला, उत्पादनाचे स्वरूप संपूर्णपणे बदलले, भांडवलशाहीने सरंजामशाहीची जागा घेतली आणि उत्पादनाची विलक्षण भरभराट केली.

विरोधविकासी तत्त्वाचा चौथा मुद्दा, (पूर्वी आपण पाहिल्याप्रमाणे) **विश्वव्यापी असलेल्या या विकासाचा कारणे शोधून काढण्या-संबंधीचा आहे.** विरोधविकासवादाप्रमाणे कोणतीही वस्तू एकसंध नसते, संपूर्णपणे एकाच स्वरूपाची नसते. प्रत्येक वस्तूला भावात्मक व अभावात्मक अशा दोन बाजू असतात, प्रत्येक वस्तूत विकास पावणारी अगर अधिक प्रबल होणारी लक्षणे असतात आणि त्याच बरोबर विलयास जाणारी, निर्बल होणारीही लक्षणे असतात. एका गुणाचा विस्तार होत असतो. दुसरे त्याला प्रतिबंध घालीत असतात, आणि विरोधी गुणांचा हा संघर्ष पहिल्याचा प्रभाव नष्ट होण्यासाठी उगवता घटक करीत असलेला लढा आणि प्रथम प्रबळ असलेला घटक नव्या घटकाचा विकास थोपवून धरण्यासाठी करीत असलेला

लढा हाच परिवर्तनाच्या या समग्र प्रक्रियेचा गाभा असतो. आणि अखेरीस तो स्फोटक स्वरूपात बाहेर फुटतो.

मानवीसमाजात ही क्रिया अत्यंत स्पष्टपणे पाहावयास मिळते. प्रत्येक ऐतिहासिक अवस्थेत, समाजाची विभागणी निरनिराळ्या दोन वर्गांत झालेली होती; त्यातील एक विकास पावणारा होता आणि दुसरा विनाशाकडे जाणारा होता. सरंजामदारी समाजात बीजरूपाने भांडवलदारी वाढत होती आणि जशी जशी ती वाढत गेली, तसे तिचे सरंजामशाहीशी मोठमोठे संघर्ष होऊ लागले. भांडवलदारी समाजात हेच चालू आहे. "भविष्यकाळचो किल्ली हाताच्या मुठीत वाळगणारा" कामगारवर्ग उगवत. वर्ग आहे. भांडवलदारी समाज एकसंघ नाही, जसे भांडवलदार वाढतात, तसे कामगारही वाढतात. या दोन वर्गांतील संघर्ष वाढतो. भांडवलशाहीतील हा संघर्ष, हा "**विरोध**" आणि वर्गभेदामुळे निर्माण होणारे प्रत्यक्ष लढे, यातूनच अखेरीस तीव्र प्रस्फोट, म्हणजे क्रांती होते.

आता इतके स्पष्टीकरण झाल्यानंतर "विरोधविकासी भौतिकवाद" या शब्दसमुच्चयाने अभिप्रेत असलेले विचार एकत्र मांडता येतील. हा दृष्टिकोन असे मानतो की, **वस्तुमात्राचे अस्तित्व आपल्या मनावर अवलंबून नाही. आपल्याला त्याच्या अस्तित्वाविषयी जाणीव नसली तरी ते असतेच. ते अलग अलग व स्वतंत्र नसते, तर परस्परावलंबी असते. ते गतिहीन नसते, सदोदित गतिमान असते. विकास व विनाश पावत असते. हा विकास विशिष्ट बिंदूपर्यंत हळू हळू होतो, त्या बिंदूला पोहोचताच एकाएकी परिस्फोट होतो आणि काही तरी नवे जन्माला येते. हा विकास अंतर्गत विरोधामुळे होतो, आणि अखेरचा स्फोट म्हणजे उगवत्या घटकाने मावळत्यावर मिळवलेली विजयश्री असते.**

मानवी समाजासहित सर्व जगाबद्दलच्या ह्या दृष्टिकोनामुळेच मार्क्सवादाचे इतर सर्व दृष्टिकोनांहून असलेले वेगळेपण उठावदारपणे दिसून येते. याचा अर्थ असा नव्हे की, विरोधविकासी भौतिकवाद सत्य घटनांच्या पलीकडचा आहे. कोणातरी प्रतिभावंताने आपल्या सुपीक डोक्यातून शोधून काढलेली ही कल्पना आहे, जगाला आपल्या चौकटीत अळेबळे बसवू पाहणारा हा दृष्टिकोन आहे, असाही याचा अर्थ नाही. उलट त्याचा असा दावा आहे की, सत्याचे व

जगाचे ते यथातथ्य चित्र आहे आणि मानवाच्या संचित ज्ञानांतून व अनुभवांतूनच ते काढण्यात आले आहे. ते बाह्य जगात आहे, म्हणूनच मार्क्सवादी लोकांच्या मनात ते उमटते : "वस्तुमात्राची ती खरी ठेवण आहे."

हा दृष्टिकोन खरा आहे याचा पुरावा विज्ञानाने लावलेल्या शोधात अधिकाधिक प्रमाणात मिळू लागला आहे. निसर्गाचे विरोधविकासी दृष्टिकोनातून निरीक्षण करताना नवी नवी माहिती मिळत असल्याचे आढळून येते, पूर्वी अनाकलनीय वाटणारे स्पष्ट होते. परंतु आजच्या मानवी समाजाच्या विकासाच्या अवस्थेत विरोधविकासी भौतिकवादी दृष्टिकोनाला मानवी समाजाच्या दृष्टीने फारच मोठे महत्त्व प्राप्त झालेले आहे.

या प्रकरणात प्रारंभी जी उदाहरणे दिलेली आहेत, त्यावरून मानवी समाजाचा विकास आणि या विकासातून निर्माण होणारे विचार यांच्यासंबंधी मार्क्सवाद मानणाऱ्यांचा दृष्टिकोन व मार्क्सवाद न मानणाऱ्यांचा दृष्टिकोन यांच्यातील फरक कळून येईल. आणखी काही उदाहरणे इतर प्रकरणांतही आलेली आहेत; परंतु सत्याच्या स्वरूपाचा प्रश्न स्त्री-पुरुषांच्या जीवनात व कार्यात इतक्या महत्त्वाचा आहे की त्याचा अधिक खोलवर अभ्यास करणे इष्ट ठरते.

भौतिक परिस्थितीच विचार घडवते

पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, भौतिकवादी दृष्टिकोन म्हणजे, जड पदार्थ, अगर बाह्य जगत्, प्रथम निर्माण झालेले असून, मन त्याच्या आधाराने नंतर निर्माण झाले आहे, (दुय्यम अगर गौण आहे) असे मानणे होय. यावरून पुढे असा निष्कर्ष निघतो की, माणसाचे पार्थिव जीवन आणि ते टिकवून धरण्याचे मार्ग प्रथम अस्तित्वात येतात आणि स्वतःच्या जीवनाबद्दल व जीवनक्रमाबद्दल तो ज्या कल्पना व विचार बनवितो त्यांचा जन्म नंतर होतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर व्यवहार आधी आणि विचार नंतर, असे असते. **जीवनपोषणासंबंधीचे विचार निर्माण होण्यापूर्वी कितीतरी आधीपासून माणूस आपले जीवनपोषण करीत आला आहे,** परंतु त्याने आपले विचार बनविले ते व्यवहाराशी सांगड घालूनच. म्हणजे सिद्धांत आणि व्यवहार यांची चाल जोडीनेच झाली. आणि ही गोष्ट सुरुवातीच्याच अवस्थांत नव्हे तर सर्वच अवस्थांत घडली.

माणसाला ज्या व्यावहारिक मार्गाने जीवनावश्यक वस्तू मिळतात तोच त्याच्या विचारांचा आधार असतो; त्याच्या राजकीय विचारांचा पायाही तोच असतो. त्याच्या राजकीय संस्था त्या त्या वेळेचे उत्पादनप्रकार टिकवून धरण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या असतात; त्या कोणत्याही अमूर्त तत्त्वांच्या पायांवर उभारलेल्या नसतात. कोणत्याही युगातील विचार व संस्था त्या त्या युगाच्या व्यवहाराची प्रतिबिंबे असतात; त्यांना स्वतंत्र अस्तित्व व इतिहास नसतो. **विचारातून विचारांचा विकास होत रहात नाही; तर जेव्हा उत्पादनाचा भौतिक प्रकार बदलतो तेव्हा विचार बदलतात. जुन्या चालीरीतींच्या जागी नव्या चालीरीती येतात आणि त्यांच्यातून नवे विचार निर्माण होतात.**

परंतु, नव्याच्या जोडीने जुने विचार व संस्थाही टिकून राहतात. उदाहरणार्थ सरंजामदारी उत्पादनांतून निर्माण झालेले विचार, आजही इंग्लंड-अमेरिकेत प्रभावी आहेत. तेथे भांडवलदारी उत्पादनपद्धतीतून निर्माण झालेले विचार आहेतच; काही विचार जुन्यांची सुधारून काढलेली नवी आवृत्ती आहेत. (उदाहरणार्थ--जन्म उमराव घराण्यात झालेला असो वा नसो, श्रीमंता-बद्दल आदर वाळगणे वगैरे.) त्याच्या जोडीला समाजवादी विचारही आहेत. भांडवलशाहीत उत्पादन अधिकाधिक सामाजिक, अधिकाधिक सामुदायिक व परस्परावलंबी बनत जाते त्यामुळे हे विचार निर्माण झाले आहेत. आजच्या समाजात हे तीन प्रकारचे विचार-प्रवाह वाहात आहेत, आणि त्यांच्यातील कोणताही एक; अंतिम सत्य, अनंत काळपर्यंत खरा ठरणारा व टिकणारा नाही.

याचा अर्थ, मार्क्सवाद या तीनही प्रकारच्या विचारसरणींना सारखाच अ-वास्तव मानतो असे नाही. उलट, तो सरंजामदारी कल्पनांना संपूर्णपणे जीर्ण समजतो, भांडवलदारी विचार उतरणीच्या मार्गावर आहेत असे मानतो, आणि समाजवादी विचार जगात सत्य ठरणार आहेत असे समजतो. किंवा 'ठरणार आहेत' असे म्हणणेही योग्य नाही. कारण नोव्हेंबर १९१७ च्या रशियन क्रांतिनंतर आता समाजवादी विचारांना तावून सुलाखून घेणे आणि ते वस्तुस्थितीला जुळणारे आहेत, हे प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध करणे, शक्य झाले आहे. उत्पादनाची अत्यंत अवाढव्य व गुंतागुंतीची आधुनिक यंत्रणा नफ्यासाठी नव्हे, तर समाजाच्या उपयोगासाठी संघटित करता येते, हा मुख्य विचार व्यवहारानेच सिद्ध झाला आहे. अनुभवाने हेही सिद्ध झाले आहे की,

समाजवाद म्हणजे उत्पादनात कल्पनातीत वाढ, अरिष्टांचा अंत आणि जनतेच्या राहणीमानात सतत होत जाणारी सुधारणा. म्हणजे, आर्थिक व सामाजिक विकासाच्या घटनांचे निरीक्षण करून मार्क्सने शास्त्रीय पद्धतीने समाजवादाच्या ज्या कल्पनांचा विकास केला, त्या कल्पना १९१७ पर्यंत केवळ शास्त्रीय अनुमाने होती, आता ती अनुभवाने खरी असल्याचे सिद्ध केले आहे.

जाणीवपूर्वक कार्याची संधी

रशियन कम्युनिस्ट पार्टीचा दृष्टिकोन मार्क्सवादी होता आणि तिने जाणीवपूर्वक कार्य केले. त्यामुळे, जुनी समाजपद्धती उलथून पडली आणि नव्या समाजपद्धतीची स्थापना झाली. त्यावेळेपासून बहुसंख्येने मार्क्सवादी नसलेली रशियन जनता, नव्या समाजपद्धतीचा अनुभव घेऊ लागली आणि व्यवहारात समाजवादी होऊ लागली. त्या आधारावर समाजवाद्यांच्या जाणीवपूर्ण, सैद्धांतिक व शैक्षणिक कार्याला शीघ्र यश मिळाले आणि व्यवहार व शिक्षण यांचा मिलाफ होऊन त्यामुळे संपूर्ण जनतेच्या दृष्टिकोनांत शीघ्र परिवर्तन घडून येत आहे.

येथे ही गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, विरोधविकासी भौतिकवादाचा हा दृष्टिकोन, शास्त्रीय ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रातील संशोधकांना वस्तुस्थितीचे निरीक्षण व आकलन करण्यास मदत करतो, यापेक्षा अधिक श्रेय मार्क्सवादी घेत नाहीत. तो तपशीलाविषयी काहीच सांगत नाही. ते काम प्रत्येक क्षेत्रातील सखोल अध्ययनानेच व्हावे लागते. विशिष्ट वस्तुस्थितीचा अलगपणे अभ्यास केला असताही शास्त्रीय ज्ञान प्राप्त होऊ शकते, हे मार्क्सवादी अमान्य करीत नाहीत; मात्र ते आग्रहपूर्वक सांगतात की, वस्तुस्थितीचा अभ्यास, संबंधित घटकांच्या परस्परावलंबित्वाच्या विकासाच्या प्रक्रियेत, संख्येच्या अधिक्याने नव्या गुणांत परिवर्तन होत असताना, अंतर्गत विरोध लक्षात घेऊन केला असता जे शास्त्रीय ज्ञान उपलब्ध होते, ते अनंत पटींनी अधिक मूल्यवान, अधिक सत्य असते.

आणि समाजशास्त्रावद्दलही हेच खरे आहे. व्यक्तिशः स्त्री-पुरुषांच्या निरीक्षणावरून, अगर विशिष्ट काळच्या व ठिकाणच्या समाजाच्या अभ्यासावरून जे निष्कर्ष निघतात, ते अत्यंत मर्यादित स्वरूपाचे असतात. ते इतर समाज-गटांना अगर त्याच समाजाला दुसऱ्या परिस्थितीत लागू पडत नाहीत.

समाजाच्या मार्क्सवादी अध्ययनाला जे महत्त्व प्राप्त झाले आहे त्याचे मुख्य कारण हेच आहे की, ते आजच्या समाजाचाच केवळ अभ्यास करीत नाही, (अर्थात् त्यालाही कमी महत्त्व नाही) तर हा समाज पूर्वी कसा होता आणि त्याच्या अंतर्गत विरोधामुळे तो कसा विकास पावत आहे, याचाही अभ्यास करतो. यामुळे आज प्रत्यक्षपणे घडत असलेल्या परिवर्तनाच्या क्रियेत, मार्क्सने म्हटल्याप्रमाणे, "आपल्या डोळ्यादेखत घडत असलेल्या आंदोलनात जाणीवपूर्वक कार्य करून सहभागी होण्याची संधी, प्रथमच स्त्री-पुरुषांना प्राप्त झाली आहे." वास्तविक जुन्या काळातील विचारांचे प्रतिबिंब असलेल्या दुसऱ्या कोणत्याही अमूर्त विचारांमुळे अगर तत्त्वांमुळे सध्यःस्थितीत योग्य कार्याच्या शोधात असणाऱ्यांना जे मार्गदर्शन मिळू शकत नाही, ते मार्क्सवादामुळे मिळू शकते.

कृतीला मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान :

मार्क्सने प्रारंभीच्या एका ग्रंथात म्हटले आहे :—" तत्त्ववेत्त्यांनी निरनिराळ्या प्रकारांनी जगाचा **अर्थ लावला आहे.** परंतु खरे महत्त्वाचे कार्य जग बदलण्याचे आहे." जगाबद्दलच्या मार्क्सच्या संपूर्ण दृष्टिकोनात या मुद्याला अत्यंत महत्त्व आहे. "मार्क्सवाद" हे केवळ पुस्तकी शास्त्र नाही, तर जग बदलण्यासाठी माणसाने उपयोगात आणावयाचे ज्ञान आहे.

भांडवलशाही ही विलयास जात चाललेली समाज-अवस्था असून, तिच्या मागोमाग समाजवादाचा उदय होणार आहे, हे नुसते माहीत असून उपयोग नाही. केवळ आर्थिक बदल झाले म्हणून हा बदल आपोआप घडून येणार नाही, हे स्पष्टच आहे. कितीही अरिष्टे आली, भांडवलशाहीमुळे कितीही हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, तरी ज्याप्रमाणे शून्य अंशावर तपमान उतरले की, पाण्याचे आपोआप बर्फ बनते त्याप्रमाणे भांडवलशाहीचे रूपांतर आपोआप समाजवादात होण्याचा बिंदू येत नाही. उत्पादनाच्या एका पद्धतीमधून दुसरीमध्ये मानवजातीची उडी पडण्यासाठी, मानवी प्रयत्नांची व कार्याची आवश्यकता असते. हे ध्येय गाठण्यासाठी, करावयाच्या मानवाच्या कार्याला मार्गदर्शन देईल, असे ज्ञान मानवजातीच्या अनुभवावरून, निष्कर्षरूपाने वेचून काढण्याचे काम, मार्क्सवाद अगर शास्त्रीय समाजवाद करतो.

समाज बदलण्याच्या कार्याच्या स्वरूपाबद्दलची कल्पना दुसऱ्या प्रकरणात देण्यात आलेली आहे. वर्गसंघर्ष (आजच्या अवस्थेत, भांडवलशाहीविरुद्ध चाललेला कामगारवर्गाचा लढा) हे ते कार्य आहे. परंतु या सर्वसाधारण सूत्रात प्रत्यक्ष अनुभवाची भर घालावी लागते आणि विकासाची विशिष्ट अवस्था लक्षात घेऊन देशातील परिस्थितीला तो देशपरत्वे लावावा लागतो.

या प्रश्नाचा मार्क्स सतत विचार करीत होता; केवळ अनुमानाने नव्हे, तर आजुबाजूला जे प्रत्यक्ष घडत होते त्याचा अभ्यास करून करीत होता.

त्याच्या मताने कामगार संघटनाच सर्व भविष्यकालीन कार्याचा आधार होत्या. म्हणून या संघटनांची उभारणी करण्यास मदत करीत असतानाच तो या प्रश्नाचेही उत्तर शोधीत होता. सन १८४८ मध्ये प्रसिद्ध झालेला सुप्रसिद्ध **कम्युनिस्ट जाहीरनामा हा कम्युनिस्ट लीगचा** जाहीरनामा होता आणि या संस्थेत मार्क्स प्रत्यक्षपणे काम करीत होता. **पहिली इंटरनॅशनल** या नावाने ओळखली जाणारी "इंटरनॅशनल वर्किंगमेन्स असोसिएशन" त्याच्याच प्रयत्नांनी १८६४ मध्ये स्थापन झाली होती. त्याच्या काळातील ब्रिटिश कामगार चळवळीशी व इतर देशांतील कामगार चळवळीशी मार्क्सचे निकटचे संबंध होते.

त्या काळात, कामगारवर्गाचा एक अगदी लहानसा विभागच ट्रेड युनियन्स व सहकारी संस्थांत संघटित झालेला होता आणि कोणत्याही देशात नाव घेण्यासारखा अगर वजनदार असा कामगारवर्गाचा पक्ष नव्हता. बहुतेक देशांत कामगारवर्ग उदयास आलेला नव्हता. ब्रिटनबाहेर भांडवलदारी उद्योगधंदे अगदीच प्रथमावस्थेत होते आणि अनेक देशांत उगवत्या भांडवलदारवर्गाचे सरंजामदारी अमीरउमराव अगर त्यांचे वंशज यांच्या विरुद्ध स्वतःचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे लढे चालू होते. १८४८ मध्ये युरोपात सर्वत्र झालेल्या क्रांतिकारक उठावात, मार्क्सने व त्याच्या समाजवादी सहकाऱ्यांनी राजेशाहीविरुद्धच्या लढ्यात भाग घेतला. एंगल्सने जर्मन लोकशाही सैन्यात सामील होऊन प्रशियाच्या राजाच्या सैन्याविरुद्धच्या युद्धात भाग घेतला.

यापूर्वी १८४८ च्या सुरुवातीला कम्युनिस्ट जाहीरनामा प्रसिद्ध झालेला होता आणि त्यात समाजवादाची आणि समाजवाद अस्तित्वात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या कामगारक्रांतीची गरज प्रतिपादन करण्यात आली होती. कामगारवर्गाच्या क्रांतीचा सिद्धांत मांडणे आणि त्या सिद्धांताच्या जन्मदात्यांनी भांडवलदार, छोटे भांडवलदार अगर मध्यमवर्ग यांच्या पुढाकाराखालील लोकशाही लढ्यात सामील होणे, या दोन घटनांत सुसंगती नाही, असे मार्क्सवादाला ठोकळेबाज सिद्धांतांची मालिका मानणाऱ्यांना वाटते; कारण त्या लढ्याचा उद्देश समाजवादाची स्थापना करण्याचा नव्हता, तर उगवत्या भांडवलदारांच्या ताबडतोबीच्या हितासाठी पार्लमेंटरी लोकशाहीचे काही हक्क मिळविण्याचा होता.

मार्क्सला मात्र प्रश्न अगदी स्पष्ट ठाऊक होता. ऐतिहासिक प्रक्रियेच्या त्या विशिष्ट अवस्थेत, पुढील प्रगतीचा मार्ग मोकळा करण्यासाठी जनतेच्या इतर विभागांबरोबर हातमिळवणी करूनच या प्रक्रियेला पुढे नेण्याच्या कार्यात कामगारवर्ग मदत करू शकत होता. कामगारवर्गाच्या व्यूहरचनेचे ताबडतोबीचे ध्येय सरंजामदारी परिस्थितीवर आधारलेल्या राजेशाहीचा नाश करणे, हे होते. या पहिल्या लढ्यात मिळणाऱ्या यशावर, लढ्यांची पुढची अवस्था किती लवकर येईल हे अवलंबून होते.

ब्रिटनमध्ये ट्रेड युनियन्स व सहकारी संघटना निर्माण झालेल्या होत्या; पण कामगारवर्गाचा राजकीय पक्ष अस्तित्वात आलेला नव्हता. लहान लहान समाजवादी गट अस्तित्वात होते, पण सर्वसामान्यतः कामगारांचे संबंध जहाल पक्षांबरोबर (म्हणजे भांडवलदारांच्या डाव्या गटांबरोबर होते) आणि म्हणून ते भांडवलदारी पक्षांबरोबरचे कामगारांचे संबंध तोडून कामगारवर्गाच्य पक्षाची स्थापना करणे आवश्यक होते.

गेल्या शतकाच्या अखेरीस, युरोपातील अनेक देशांत कामगारवर्गाचे राजकीय पक्ष स्थापन झाले आणि त्यांनी पार्लमेंटमध्ये प्रतिनिधीत्व मिळविले. ब्रिटनमध्ये नंतरच्या काळात लेबर पार्टीचा (मजूर पक्षाचा) जन्म झाला; मात्र तिचे पुढारी समाजवादी दृष्टिकोनाचे नव्हते. जहाल (भांडवलदारी) विचारसरणीचे होते.

चालू शतकाच्या प्रारंभी ४ थ्या प्रकरणात वर्णन केल्याप्रमाणे, भांडवलशाहीने साम्राज्यशाहीची अवस्था गाठली आणि 'युद्धांचा व क्रांत्यांचा कालखंड' सुरू झाला. आता वर्गलढ्याचे डावपेच व व्यूहरचना यांचा विकास मार्क्स-एंगल्सच्या काळापेक्षा अधिक पुढच्या अवस्थेपर्यंत नेऊन पोहोचवण्याची आवश्यकता निर्माण झाली. या साम्राज्यशाहीच्या अवस्थेत मार्क्सवाद परिस्थितीला लागू करण्याचे कार्य **लेनिननी** केले.

पक्षाची आवश्यकता कशासाठी?

या काळात, लेनिननी दाखवून दिले की, फक्त पार्लमेंटरी व प्रचारकार्य करणाऱ्या जुन्या धर्तीच्या कामगारवर्गीय पक्षाचे कार्य पुरेसे नाही. **भांडवलशाहीचा शेवट करण्याचा प्रश्न इतिहासाच्या कार्यक्रमपत्रिकेवर आलेला आहे. त्यासाठी नव्या धर्तीच्या पक्षाची आव-**

श्यकता आहे. पार्लमेंटमध्ये चालणारा संघर्ष व कारखान्यांत आणि रस्त्यारस्त्यांत लढविला जात असलेला संघर्ष यांची सांगड घालणाऱ्या, भांडवलशाही उलथून टाकून समाजवादाच्या रचनेसाठी कामगारवर्गाचे नेतृत्व करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या पक्षाच्या स्थापनेची आवश्यकता आहे.

आपल्या आधीच्या सत्ताधारीवर्गाचा पराभव करणारा आणि तिच्या जागी सत्तेवर येणारा नवा वर्ग जनतेच्या इतर विभागांना बरोबर घेऊनच लढ्यात उतरतो, या मुद्यावर मार्क्सने वारंवार भर दिलेला होता. कामगारवर्ग पोकळीत जगत नसतो; त्याच्या भोवती निश्चित स्वरूपाचे व जीवंत जग असते. त्यात देशकालमानाप्रमाणे निरनिराळे वर्ग व वर्गांचे विभाग समाविष्ट होत असतात. नव्या धर्तीच्या कामगारवर्गाच्या पक्षाच्या व्यूहरचनेचा प्रश्न हा असतो की, त्याला आपापल्या देशांत सामाजिक प्रगतीचा जो मुख्य शत्रू असेल त्याविरुद्ध एकजुटीचा लढा उभारण्यासाठी फक्त कामगारवर्गालाच नव्हे, तर जनतेच्या इतर विभागांनाही बरोबर घ्यावे लागते.

१९१७ मधील मार्च क्रांतीच्या पूर्वीच्या झारशाही रशियाचेच उदाहरण पाहा. त्या काळात कामगारवर्ग संख्येने लहान होता. तो शेतकरी समुदायांच्या महासागराने वेढला गेलेला होता; शेतकऱ्यांचाही झारच्या हुकुमशाहीला विरोध होता आणि त्यांना जमीन पाहिजे होती. आणि म्हणून रशियन सोशल डेमोक्रॅटिक पार्टीतील लेनिनच्या नेतृत्वाखालील बोल्शेविक (बहुमतवाल्या) विभागाला कामगारवर्गाचे संपूर्ण शेतकरी समाजाबरोबर ऐक्य घडवून आणणे शक्य झाले. शेतकरी समाजात काही शेतकरी तुलनात्मकदृष्ट्या श्रीमंत व उरलेले गरीब होते, तरी ही गोष्ट घडून आली. शहरी व ग्रामीण विभागांतील ऐक्याच्या त्यांच्या सामर्थ्याने १९१७ च्या मार्चमध्ये झारचा पराभव केला; आणि सामाजिक प्रगतीला अडथळा आणणाऱ्या मुख्य शत्रूचा पाडाव झाला; परंतु झारच्या पाडावानंतर जे तात्पुरते सरकार स्थापन करण्यात आले ते भांडवलदारी हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे होते. आता सामाजिक प्रगतीतील मुख्य अडथळा, मुख्य शत्रू भांडवलदारवर्ग बनला होता; पण सर्व शेतकरी भांडवलदारवर्गाला शत्रू मानावयाला तयार नव्हते. त्यांच्यातले श्रीमंत शेतकरी, (म्हणजे कुलक), स्वतः शेतमजुरांना कामावर ठेवीत होते; व्यापार करीत होते; सट्टेबाजी करीत होते आणि वास्तवात स्वतः भांडवलदार

होते आणि म्हणून त्या अवस्थेत सर्व शेतकऱ्यांच्या बरोबर कामगारवर्गाचे ऐक्य होणे शक्य नव्हते. फक्त गरीब शेतकरी व भूमिहीन शेतमजुरांबरोबरच ऐक्य होणे शक्य होते. या ऐक्यातूनच १९१७ च्या नोव्हेंबरमध्ये शहरातील व ग्रामीण विभागांतील क्रांती यशस्वी झाली. परंतु मार्च क्रांतिपूर्व काळात जर कामगार-शेतकऱ्यांचे व्यापक ऐक्य झाले नसते, तर मार्चमध्ये झारचा पराभव झाला नसता आणि नोव्हेंबर क्रांतीला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली नसती.

कामगारवर्गाने इतरांशी ऐक्य केले पाहिजे

मुख्य शत्रूविरुद्ध कामगारवर्गाने समाजातील इतर सर्व विभागांबरोबर ऐक्य केले पाहिजे या सिद्धांताची मांडणी लेनिननी रशियाच्या परिस्थितीतून, म्हणजे व्यवहारातून केली. आणि त्यानंतरच्या काळात, कामगारवर्गाच्या कार्याचे मार्गदर्शक तत्त्व या नात्याने, मार्क्सवादी विचारसरणीच्या पुढील विकासात त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले.

भांडवलशाहीविरुद्ध सुसंगतपणे अखेरपर्यंत फक्त कामगारवर्गच लढतो; कारण भांडवलशाहीच्या विस्ताराबरोबर त्याचीही वाढ होते आणि भांडवलदार-वर्गाकडून त्याची प्रत्यक्षपणे पिळवणूक होते. उलट, शेतकऱ्यांचा जमीनदारां-विरुद्ध सतत संघर्ष चालू असतो आणि भांडवलशाहीच्या विकासाबरोबर ते वर्गभ्रष्ट होत जातात. गरीब शेतकरी (शेतमजूर बनून) कामगारवर्गात सामील होतात आणि श्रीमंत शेतकरी शेतमजूरांना कामावर ठेवणारे भांडवल दार बनतात आणि म्हणून, भांडवलदारवर्गविरोधी एकजुटीच्या कल्पनेत भांडवलदारवर्गाविरुद्धच्या एकजुटीचा गाभा कामगारवर्ग असतो, ऐक्यदलांची ती नेतृत्व करणारी शक्ती असते, हा अर्थ जरूर असतो. **परंतु कामगार-वर्गालाही ऐक्याची गरज असते.** कारण ज्या वेळेला भांडवलशाही-विरुद्ध लढा चालू होतो, तेव्हा इतर विभाग एकतर कामगारवर्गाकडे, नाहीतर भांडवलदारवर्गाकडे ओढले जात असतात. आणि एखादा विभाग कामगार-वर्गाबरोबर ऐक्यात सामील करून घेणे म्हणजे भांडवलदारवर्गाला त्या विभागाच्या पाठिंब्यापासून वंचित करणे असते.

भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेत आर्थिक (व म्हणून राजकीय) सत्ता जितक्या प्रमाणात लहान आणि धनाढ्य गटांच्या हाती अधिकाधिक केंद्रित होऊ लागते, तितक्या प्रमाणात मुख्य शत्रूविरुद्ध कामगारवर्ग व इतर

विभाग यांचा संयुक्त मोर्चा बनविण्याला परिस्थितीही अधिक अनुकूल बनते. भांडवलदारवर्गात कमीअधिक श्रीमंत लोक नेहमीच असतात. पण, जगव्यापी मक्तेदाऱ्यांच्या अवस्थेत, मक्तेदार भांडवलदार आणि इतर छोटे भांडवलदार यांच्यात फार मोठी दरी निर्माण झालेली असते. उद्योग व व्यापार यांवरील आपली पकड वाढविणे, पिळणुकीसाठी नवे प्रदेश जिंकणे आणि दुसऱ्या देशांतील प्रतिस्पर्धी भांडवलदार गटांबरोबर व्यवहार करणे (म्हणजे त्यांच्या बरोबर बाजारपेठा वाटून घेणे, किंमत ठरविण्याबाबत करारमदार करणे, जकाती बसवून त्यांच्याशी लढा देणे आणि वेळ प्रसंगी युद्धे करणे,) हे उद्योग करीत असताना मक्तेदार भांडवलदारांच्या हिताचा लहान व्यापारी आणि छोटे कारखानदार यांच्या हिताशी सरळसरळ संघर्ष येतो. हे मक्तेदार आपल्याला जीवनातूनच उठविणार, अशी भीती या लहान व्यापाऱ्यांना आणि छोट्या कारखानदारांना वाटू लागते. एकामागून दुसरा असे प्रश्न निर्माण होतात आणि हे लहान दुकानदार व भांडवलदार–प्रथम व्यक्तिशः आणि नंतर त्यांचे संपूर्ण विभाग–मक्तेदार भांडवलदारांना आपले "मुख्य शत्रू" मानू लागतात.

हा विरोध केवळ आर्थिक कारणांवरूनच सुरू होतो असे नाही, हे नीट ओळखले पाहिजे. त्याला महत्त्व आहे. कामगारवर्ग, वसाहत राष्ट्रे व लहान भांडवलदार यांच्याविरुद्धच्या आर्थिक मक्तेदारीतून निर्माण होणाऱ्या मोहिमेत मक्तेदारवर्ग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत प्रतिगामी धोरणांचा अंगीकार करतो. लहान भांडवलदार व मध्यमवर्ग, व्यावसायिक मंडळी व बुद्धिजीवींचा एक मोठा विभाग यांच्यावर भांडवलशाहीच्या प्रारंभीच्या काळातील उदार व लोकशाहीवादी परंपरेचे संस्कार असतात; त्यांच्यामुळे ते या परंपरा पायाखाली तुडविणाऱ्या मक्तेदारांच्या विरुद्ध जातात. काही देशांत मक्तेदार उघड रीतीने अनियंत्रित हुकूमशाहीचा (फॅसिस्ट पद्धतीचा) स्वीकार करून सर्व लोकशाही संस्था–संघटनांचा नाश करतात आणि जगभर मान्य असलेल्या माणुसकीच्या साध्या तत्त्वांनाही हरताळ फासतात; त्यावेळी ह्या विरोधी मंडळींचे बळ वाढते.

संयुक्त मोर्चा केव्हा बनतो ?

अशा परिस्थितीत फॅसिस्ट हेच शांतता व सामाजिक प्रगतीच्या आड येणारे मुख्य शत्रू आहेत, हे जेव्हा जनतेच्या अत्यंत विस्तृत विभागांना दिसून येते तेव्हा कामगारवर्गाचे व मधल्या विभागांचे हितसंबंध एकरूप होतात

आणि त्यावेळी फॅसिस्टांविरुद्ध एक व्यापक संयुक्त मोर्चा–जनतेची संयुक्त आघाडी–उभारणे शक्य होते.

कामगारवर्गाचे व जनतेच्या इतर विभागांचे हितसंबंध जेथे जुळतात अशाच प्रश्नांवर खरा संयुक्त मोर्चा बनू शकतो. इतर प्रश्नांवर बनू शकत नाही. अशा मोर्चात कामगारवर्ग अगर त्याचे दोस्त यांनी आपले खास हितसंबंध सोडून द्यावेत अगर आपली ध्येये लपवून ठेवून एकजुटीतील आपल्या मित्रांना फसवावे असा प्रश्नच नसतो. तो दृष्टिकोन खास फॅसिस्टांचा आहे. वर्गीय दोस्तीचा अर्थ हाच असतो की, विशिष्ट परिस्थितीत, काही काळापुरते, दोस्तांचे हितसंबंध एकच झालेले असतात. १९३६ मध्ये बडे जमीनदार, बँकवाले आणि जनरल फ्रँकोशी संगनमत करून स्पेनवर स्वारी करणारी परकीय मंडळी यांच्याविरुद्ध, स्पेनमधील कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग, लहान भांडवलदार व राष्ट्रवादी गट यांचा संयुक्त मोर्चा उभारला गेला तो याचमुळे.

असेही नाही की, असा संयुक्त मोर्चा फक्त फॅसिझमच्या विरुद्धच उभारता येतो. परकीय राजवट अगर परचक्राविरुद्ध लढण्यासाठी जनतेच्या जवळ जवळ संपूर्ण विभागांची "राष्ट्रीय आघाडी" उभारली गेल्याची अनेक उदाहरणे इतिहासात नमूद आहेत; उदाहरणार्थ, दुसऱ्या महायुद्धाचा काळ. अशा संयुक्त आघाड्या परकीय साम्राज्यशाहीविरुद्ध, वसाहत जनतेच्या स्वातंत्र्य लढ्यांत सर्व परतंत्र देशांतून अस्तित्वात येतात. कारण बडे जमीनदार, बँक भांडवलदार व बडे भांडवलदार सोडून, इतर सर्वांच्या ते हिताचे असते. फक्त वरील मूठभर लोक मात्र जनतेची पिळवणूक करण्याचा त्यांचा हक्क परके साम्राज्यवादी सुरक्षित ठेवतील, असे समजून त्यांना पाठिंबा देतात. लढ्याच्या सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व उगवते भांडवलदार करतात. परंतु, वसाहतदेशांत भांडवलदारी उत्पादनपद्धतीचा विकास झाल्यामुळे आणि परकीय साम्राज्यवाद्यांच्या कृतीमुळे, कामगारवर्गाचा उदय होतो. हा कामगारवर्ग जसा संख्येने वाढत जातो आणि संघटित होतो, तसा स्वातंत्र्यलढ्याच्या नेतृत्वात तो वाढता भाग घेतो. मार्क्सवादी विचारसरणीच्या पक्षांच्या स्थापनेने ह्या प्रक्रिया पुढे जाण्याला मदत होते; आणि ज्या वेळी, स्वातंत्र्यलढ्यात सामील असलेला भांडवलदारवर्गाचा एक विभाग साम्राज्यवाद्यांबरोबर करारमदार करून जनतेच्या विरुद्ध त्यांची बाजू घेऊन उभा राहतो, तेव्हा ही क्रिया अति वेगाने होऊ लागते.

राष्ट्रीय आघाडीचो उदाहरणे

या संदर्भात चीनचे उदाहरण घेता येईल. तेथे परकीय साम्राज्यवाद्यांच्या पाठिंब्याने राज्य करणाऱ्या सरंजामदारी राजवटीविरुद्धच्या भांडवलदारी क्रांतीने सन १९११ मध्ये निर्णायक अवस्था गाठली. औद्योगिक शहरांतील व बंदरांतील कामगारांचे सामर्थ्य व संघटना १९२० पर्यंत चांगल्याच वाढल्या. १९२१ मध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. या काळात राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यातील मुख्य शक्ती सन-यत्-सेनने १९१२ मध्ये स्थापन केलेला कुओमिन्टांग पक्ष हीच होती. परंतु साम्राज्यशाहीचे वार झेलण्याचे कार्य कामगारवर्ग अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर करू लागला होता. १९२४, १९२५ व १९२६ साली, साम्राज्यशाहीविरुद्ध त्याने औद्योगिक शहरांतून फार मोठे संप व निदर्शने घडवून आणली होती. १९२५ मध्ये सन् यत् सेन यांचा मृत्यू झाल्यानंतर, कामगारवर्ग व कम्युनिस्ट पक्षाच्या संपूर्ण सहकार्याने कुओमिटांगच्या सैन्याने चीनचे एकीकरण करण्यासाठी व मूलगामी सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने, कॅन्टनहून उत्तरेकडे मोर्चा काढला. परंतु १९२७ च्या एप्रिलमध्ये, कुओमिंटांगच्या लष्कराचा नेता चिआंग कै-शेक याने परकीय साम्राज्यवाद्यांबरोबर संगनमत केले आणि तो कम्युनिस्ट पक्ष व कामगारवर्ग यांच्यावर उलटला. त्या वेळेपासून, राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व कुओमिंटांगकडून निघून, कम्युनिस्ट पक्षाकडे आले. अर्थात्, जपानी परचक्राविरुद्ध जे लढे नंतर झाले, त्या लढ्यांच्या काही विशिष्ट अवस्थांत सर्वांची एक राष्ट्रीय आघाडी पुनः स्थापन करण्यात आली, हे खरेच आहे

मुख्य शत्रूविरुद्ध कामगारवर्गाने जनतेबरोबर करावयाच्या ऐक्याचा सिद्धांत मार्क्सने मांडला आणि लेनिनने भांडवलदारी वसाहती व अर्धवसाहती देशांतील स्वातंत्र्यलढ्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारावर त्याचा अधिक विस्तार केला. हाच नव्हे तर एकंदर सर्वच मार्क्सवादी सिद्धांत, अनुभवांवरून काढलेले सर्वसामान्य निष्कर्ष असतात आणि इतर शास्त्रीय सिद्धांतांप्रमाणे त्यांच्यात पुढील अनुभवांच्या जोरावर सुधारणा अगर विस्तार करण्यात येतो. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व विशेषतः त्याचा शेवट झाल्यानंतर अनेक देशांतील नव्या अनुभवांच्या आधारावर, समाजवादाचा लढा विजयी करण्यासाठी, कामगारवर्गाच्या संयुक्त मोर्चाच्या व व्यूहरचनेच्या सिद्धांतात अत्यंत मोलाची नवी भर पडली आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, एका विशिष्ट अवस्थेत, नाझी जर्मन फौजांनी व्यापलेल्या युरोपियन राष्ट्रांत, कामगारवर्गाच्या बळावर आधारलेल्या व कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या राष्ट्रीय प्रतिकार चळवळीचा उदय झाला. चळवळीत त्या त्या देशांतील "क्विसलिंग" (अगर राष्ट्रद्रोही) सोडून जनतेचे सर्व विभाग सामील होते. या राष्ट्रद्रोह्यांत बडे जमीनदार व भांडवलदार प्रमुख होते; आपले नफे व हक्क टिकविण्यासाठी त्यांनी नाझी नेत्यांशी संगनमत केले होते; उलट छोट्या भांडवलदारांच्या मोठ्या विभागाने व बहुतेक मधल्या विभागांनी नाझी आक्रमणाला तोंड देण्यासाठी आणि देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी कामगारवर्ग व शेतकऱ्यांच्याबरोबर हातमिळवणी केली.

नाझी लष्कराचा पराभव झाला; त्यांनी व्यापलेले प्रदेश मुक्त झाले, आणि त्या त्या देशात या व्यापक राष्ट्रीय मोर्चावर आधारलेली तात्पुरती सरकारे स्थापन झाली. त्यांत कम्युनिस्ट पक्ष व सोशल डेमोक्रेटिक पक्ष या कामगारवर्गाच्या पक्षांना महत्त्वाचे स्थान होते. राष्ट्रीय मोर्चाच्या पायावर स्थापन झालेल्या आणि श्रमिक जनतेशी अत्यंत निकटचे संबंध असलेल्या, विस्तृत स्थानिक समित्यांमुळे कामगारवर्गाचे वजन वाढले आणि त्यामुळे पूर्वीच्या बड्या जमीनदारांचे व भांडवलदारांचे स्थानिक वजन नष्ट झाले. या परिस्थितीमुळे या सरकारांचे सर्वसाधारण कार्यक्रम प्रगतिशील राहिले. पूर्व युरोपातील अशा सरकारांनी जमीनदारांच्या मोठ्या मोठ्या इस्टेटी ताब्यात घेतल्या आणि त्या शेतकऱ्यांना वाटून दिल्या आणि राष्ट्रीय व स्थानिक प्रमाणावर लोकशाही सरकारांची स्थापना केली. ही पूर्व युरोपांतील "जनतेच्या लोकशाही सरकारां"ची पहिली अवस्था होती.

या देशांतील कम्युनिस्ट पक्षांच्या हे लक्षात आले की, **या नव्या प्रकारच्या सरकारांच्या व राज्यसत्तांच्या साहाय्याने भांडवलशाहीच्या जागी समाजवाद आणणे शक्य आहे.** एकीकडे भांडवलदारी व शेतकरी पक्षांच्या, त्याचप्रमाणे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्य पुढाऱ्यांना, मूलभूत सामाजिक सुधारणा घडवून आणण्याची मुळीच इच्छा नव्हती. आणि जनतेच्या दबावामुळे त्यांना मान्य करावा लागलेला प्रारंभीच सरकारी कार्यक्रम म्हणजे परिवर्तनाची परिसीमा झाली, असे त्यांचे मत होते. त्याच्या उलट, शहरांतील व ग्रामीण भागांतील बहुसंख्य जनता, फॅसिझमवर व पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांवर मिळविलेल्या विजयाने उत्साहित झालेली होती;

इतिहासात प्रथमच तिला पूर्ण राजकीय हक्क मिळालेले होते आणि त्यामुळे, संयुक्त मोर्चा बांधला गेला त्यावेळी ती दुसऱ्या पक्षांच्या वतीने त्यात सामील झालेली असली तरी, नंतर कम्युनिस्ट पक्षाने आग्रह धरलेल्या, दूरगामी सुधारणांना ती संपूर्ण पाठिंबा देऊ लागली होती.

जनतेचा लोकशाही मार्ग

अशा रीतीने, **संयुक्त मोर्चातील, कम्युनिस्ट पक्षाव्यतिरिक्त इतर पक्षांच्या पुढाऱ्यांचे त्या त्या पक्षांतील श्रमिक जनतेवरील वजन कमी झाल्यानंतर, त्यांनी परराष्ट्रांकडे धाव घेतली.** अमेरिकन व ब्रिटिश लष्कराच्या व मुत्सद्यांच्या प्रतिनिधींच्या मदतीने त्यांनी कारस्थाने रचली आणि पूर्वीच्या सत्ताधाऱ्यांना परत सत्तेवर आणण्याचा व समाजवादाकडे होणारी समाजाची प्रगती थांवविण्याचा घाट घातला. ही कारस्थाने उघडकीस आल्यानंतर त्यापैकी अनेक पुढाऱ्यांची त्या त्या पक्षांच्या सभासदांत साफ बदनामी झाली आणि सर्व श्रमिक जनतेच्या हितासाठी कम्युनिस्ट पक्षाने मांडलेल्या कार्यक्रमाला संपूर्ण मान्यता देणाऱ्या नव्या पुढाऱ्यांची निवडणूक झाली जनतेच्या लोकशाहीच्या विकासातील ही नवी अवस्था समाजवादी रचनेचा प्रारंभबिंदू ठरली, सोशल डेमोक्रॅटिक पक्ष कम्युनिस्ट पक्षात विलीन झाला आणि अशा रीतीने तयार झालेल्या श्रमिकवर्गाच्या एकमेव पक्षाला इतर पक्षांचा संपूर्ण पाठिंबा मिळू लागला; कारण तेही पक्ष आता फक्त श्रमिकवर्गाच्या हिताचेच प्रतिनिधित्व करू लागले होते. जनतेच्या प्रचंड बहुमताच्या जोरावर, जनतेच्या लोकशाही सरकारांनी यानंतर, पार्लमेंटमध्ये कायदे करून उद्योगधंदे व व्यापार सरकारी मालकीचा केला आणि योजनाबद्ध अर्थव्यवस्थेला प्रारंभ केला. त्यांनी राज्य-कारभारव्यवस्थेत अनेक सुधारणा घडवून आणल्या आणि सैन्य, नागरिक खाती, राष्ट्राच्या मालकीचे उद्योगधंदे व व्यापार यातील प्रमुख स्थानी असलेल्या भांडवलदारांच्या पाठिराख्यांच्या जागी समाजवादाला पाठिंबा देणाऱ्यांच्या नेमणूका केल्या. सामुदायिक शेतीचा प्रारंभ केला. म्हणजे, तेथे कामगारवर्गाची सत्ता––जनतेच्या प्रचंड बहुसंख्येसाठी अस्तित्वात आलेली खरीखुरी लोकशाही–खंबीरपणे प्रस्थापित झाली. (पाचव्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे, ही लोकशाही जनतेच्या इच्छा-आकांक्षांना विरोध करणाऱ्यांवर

व मोडतोड करणाऱ्यांवर हुकूमशाहीही असते.) तिच्या प्रस्थापनेसाठी, वर वर्णन केल्याप्रमाणे, सोविएत रशियात क्रांती यशस्वी करण्यासाठी करावे लागले तसे सशस्त्र संघर्ष या देशांना करावे लागले नाहीत तरी, प्रत्येक पुढे पडणाऱ्या पावलाच्या वेळी जुन्या सत्ताधारीवर्गाच्या प्रतिकाराविरुद्ध आणि परकीय साम्राज्यांच्या मदतीने देशाची प्रगती रोखण्यासाठी त्यांनी केलेल्या खटाटोपाविरुद्ध, संघर्ष करावा लागला.

जनतेच्या लोकशाहीच्या मार्गाने समाजवादाकडे झालेले हे स्थित्यंतर समाजवादी सोविएत युनियनच्या अस्तित्वामुळे आणि तिच्या सक्रीय मदतीमुळेच शक्य झाले. सोविएत फौजांनी नाझी फौजांचा धुव्वा उडविल्यानंतर, आणि त्या त्या देशातील मुक्ति-आंदोलनांनी तेथे त्यांच्या तात्पुरत्या सरकारांची प्रस्थापना केल्यानंतर त्यांना सोविएत युनियनप्रमाणे परकीय साम्राज्यवाद्यांच्या हस्तक्षेपाला तोंड द्यावे लागले नाही आणि समाजपरिवर्तनाचा सर्वमान्य कार्यक्रम पार पाडता आला. ही सरकारे एकाकी नव्हती आणि सोविएत सरकाराप्रमाणे त्यांना समाजवादाची उभारणी संपूर्णपणे शत्रूने वेढलेल्या जगात करावी लागली नाही. परकीय फौजांच्या हस्तक्षेपापासून त्यांचा बचाव झालेला होता आणि त्यांना धन, धान्य व यंत्रसामुग्रीची मदत सोविएत युनियनने दिली. याशिवाय, आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक समाजवादी पद्धतीने करण्यासंबंधी सोविएत युनियनने संचित केलेल्या अनुभवाचा त्यांना अत्यंत उपयोग झाला.

मक्तेदारांविरुद्ध संयुक्त आघाडी

जनतेच्या लोकशाही राष्ट्रांचा विकास झाला, जवळजवळ तसाच विकास दुसऱ्या महायुद्धात जपानचा पराभव झाल्यानंतर चीनमध्ये झाला. चिआंग कैशेक व वायव्य चीनमध्ये स्थापन झालेले कम्युनिस्ट सरकार यांच्यांतील सशस्त्र संघर्ष युद्धकाळात काही अंशी स्थगित झाला होता, कारण जपानविरोधी राष्ट्रीय एकजुटीची हाक कम्युनिस्ट पक्षाने दिली होती; परंतु युद्धसमाप्तीनंतर चीनमध्ये संयुक्त लोकशाही सरकार स्थापन करण्याचे कम्युनिस्ट पक्षाचे प्रयत्न चिआंग कैशकने धुडकावून लावले आणि अमेरिकन सरकारने पुरविलेल्या प्रचंड लष्करी व आर्थिक सामुग्रीच्या जोरावर त्याने कम्युनिस्टांविरुद्ध सशस्त्र युद्ध पुन्हा एकदा सुरू केले. पुढे १९४९ पर्यंत पराभूत व बदनाम झालेला

चिआंग फोर्मोसात पळून गेला आणि कम्युनिस्ट पक्षाने नवे सरकार स्थापन करण्यासाठी 'जनतेची सल्लागार समिती' बोलावली. अशा रीतीने, चिनी जनतेच्या लोकसत्ताकाची स्थापना झाली. कामगारवर्ग, शेतकरी, नागरी विभागातील छोटे भांडवलदार विभाग, (आणि चिआंग कै-शेकशी संलग्न असलेल्या 'नोकरशाही' किंवा मक्तेदारी-भांडवलदारी-गटांव्यतिरिक्त उरलेले] 'राष्ट्रीय' (अगर देशाभिमानी) भांडवलदार यांच्या संयुक्त मोर्चावर आधारलेले सरकार तेथे निर्माण झाले. अशा प्रकारे जनतेचा बळी देऊन गब्बर बनलेल्या व अमेरिकन साम्राज्यवाद्यांचे हस्तक झालेल्या देश-द्रोह्यांच्या एका लहान गटाविरुद्ध सर्व राष्ट्राची एकजूट झाली; जमीनदारांची जमीन शेतकऱ्यांत वाटून देण्यात आली; उद्योगधंदे व व्यापार बसले होते; त्यांच्यावरील खाजगी मालकी कायम ठेवण्यात आली; परंतु सरकारी नियंत्रण आणून त्याची घडी पुनः बसविण्यात आली. नगरात व गावांत लोकशाही संस्था निर्माण करण्यात आल्या. संयुक्त व लोकशाहीवादी चीनमध्ये जनतेच्या लोकशाही प्रजासत्ताकाची सत्ता दृढमूल झाली आणि समाजवादाच्या दिशेने करावयाच्या प्रगतीच्या दृष्टीने आधारभूत असलेले आर्थिक स्थित्यंतर सुरू झाले. कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील, राष्ट्रीय एकजुटीच्या विस्तृत पायावर उभारलेले सरकार हे कार्य पार पाडू लागले.

पूर्व युरोपातील देशांच्या आणि निमवसाहती चीनच्या अनुभवावरून हे दिसून येते की, समाजवादाकडे जाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आता नवी परिस्थिती तयार झाली आहे. भांडवलशाहीच्या या सर्वव्यापी अरिष्टाच्या काळात जनतेची लुटालूट चालू ठेवण्यासाठी मक्तेदारी गट अधिकाधिक आततायी मार्गांचा अवलंब करतात. फॅसिझम, युद्ध, जनतेच्या राहणीमानावर हल्ला–चित्राची ही एक बाजू झाली आहे. जगात झालेली समाजवादी विभागाची वाढ, कामगार व वसाहती जनतेचा वाढता प्रतिकार व मार्क्सवादी विचारसरणीने काम करणाऱ्या कम्युनिस्ट पक्षांची मक्तेदारीविरोधी लढ्यात (कामगारवर्गालाच नव्हे तर) बहुसंख्य जनतेला सामील करून घेण्याची ताकद, ही ह्या चित्राची दुसरी बाजू आहे. मक्तेदारांनी स्वीकारलेल्या आततायी मार्गांनी प्रगतीचा मार्ग फार काळपर्यंत अडविला जाऊ शकत नाही; मक्तेदार अधिकाधिक प्रमाणावर अलग पडत जातात; उलट शांतता, राष्ट्रीय स्वातंत्र्य, लोकशाही व अधिक चांगल्या प्रतीचे जीवन यांसाठी चालणाऱ्या

लढ्यांतून मक्तेदारांविरुद्धचा जनतेचा संयुक्त मोर्चा अधिक विस्तृत व बलशाली बनत जातो. त्यामुळे जनतेची लोकशाही व जनतेची सरकारे यांना समाजवादातील परिवर्तन घडवून आणणे शक्य होते.

परंतु मक्तेदारांविरुद्ध मिळविण्याच्या या विजयासाठी कामगारवर्गीय आंदोलनातील संधिसाधू पुढारीपणाचा अगर स्वतःला सोसल डेमोक्रॅट्स म्हणून घेणाऱ्यांचा पराभव करावा लागतो. कारण, इतिहासाचा व कामगार-वर्गाचा मूलभूत अनुभव (जो मार्क्सवादी विचारसरणीत घनीभूत झालेला आहे तो) हेच सिद्ध करतो की, मानवी समाजाच्या नव्या अवस्थेचा मार्ग वर्गसंघर्षातून जातो; तो जीर्ण समाजातील सत्ताधाऱ्यांबरोबर वर्गसहकार्य करून गाठता येत नाही. तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात "दुहेरी" धोरण ठेऊन आक्रमता येत नाही; कामगारवर्गाचे धोरण अंमलात आणले आणि **मक्ते-दारांच्या विरुद्ध सक्रिय लढाऊ धोरण** स्वीकारले, तरच कामगार-वर्गाला आपली ऐतिहासिक जबाबदारी पार पाडण्याचे अप्रतिहत सामर्थ्य व निर्धार प्राप्त होऊ शकतात.

मूलभूत सिद्धांत कायम

समाजवादाचा मार्ग आता सुगम झाला असला, तरी पूर्वीच्या अनुभवावरून मार्क्स व लेनिन यांनी काढलेले मूलभूत निष्कर्ष निखालसपणे खरेच राहिलेले आहेत. अधिक उच्च प्रकारच्या समाजव्यवस्थेकडे प्रगती आजही भांडवल-शाहीच्या व साम्राज्यशाहीच्या विरुद्ध लढा उभारूनच करता येते आणि जुन्या सत्तांच्या व स्वदेशातील अवशेषांविरुद्ध व परकीय साम्राज्यवाद्यांविरुद्ध लढा पुढे चालू ठेवला तरच ही प्रगती टिकवून धरता येते. समाजाचे परिवर्तन राज्यसत्ता हातात आली तरच घडवून आणता येते. यासाठी, कामगारवर्गाच्या नेतृत्वाखालील श्रमिक जनतेच्या संयुक्त मोर्चाची आणि वर्गलढ्याच्या अनुभवावरूनच मार्क्स आणि लेनिन यांनी काढलेले निष्कर्ष आत्मसात केलेल्या क्रांतिकारक पक्षांच्या मार्गदर्शनाची, आवश्यकता असते. सोविएत युनियनच्या दीर्घकालीन अनुभवावरून हे सिद्ध झाले असून, जनतेच्या लोकशाही सरकारांच्या व चिनी जनतेच्या लोकसत्ताकाच्या दैनंदिन अनुभवातून त्याला सतत दुजोरा मिळत आहे.

देश काल परिस्थितीनुसार भिन्न भिन्न मार्ग

भांडवलदारी समाजाचे समाजवादी समाजात परिवर्तन करण्याचा प्रकार या नात्याने, जनतेच्या लोकशाही सरकारचे अनुभव, भांडवलदारी व परकीय साम्राज्यशाहीच्या जोखडाखालील सर्व देशांना उपयुक्त आहेत. आजच्या जागतिक परिस्थितीत हा प्रकार सर्वत्र लागू होणार आहे; अर्थात जनतेची लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी लागणाऱ्या संयुक्त लोकशाही मोर्चाचा नेमका आधार कोणता राहील, नव्या राज्यसत्तेचे स्वरूप कोणते असेल आणि परिवर्तनाची गती कशी असेल या गोष्टी त्या त्या देशातील परिस्थितीवर अवलंबून राहतील.

ब्रिटनमध्ये कम्युनिस्ट पक्षाने, "समाजवादाचा ब्रिटिश मार्ग" या नावाने आपला कार्यक्रम जाहीर केला आहे. जनतेचे सरकार अस्तित्वात आणण्यासाठी उभारावयाच्या विस्तृत संयुक्त लढ्याचा पाया म्हणून लेबर पार्टी व कम्युनिस्ट पार्टीच्या ऐक्याची हाक त्यात देण्यात आलेली आहे. अशा रीतीने निर्माण झालेले हे जनतेचे सरकार जनतेच्या पाठिंब्याच्या जोरावर उद्योगधंद्याचे समाजवादी राष्ट्रीयीकरण करून मक्तेदारांची आर्थिक सत्ता उलथून टाकील; जनतेच्या सत्तेचा निर्धाराने व निष्ठेने पुरस्कार करणाऱ्या स्त्री-पुरुषांची नेमणूक अधिकारांच्या सर्व जागांवर करून राज्ययंत्राचे स्वरूप बदलून टाकील; वसाहतींना राष्ट्रीय स्वातंत्र्य देऊन सध्याच्या साम्राज्याचे रूपांतर समान दर्जाच्या राष्ट्रांच्या संघटनेत करील आणि समाजसुधारणेचा विशाल कार्यक्रम पार पाडील. बडे भांडवलदार प्रतिकाराचा कोणताही प्रकार हाताळोत, त्या सर्वांना तोंड देऊन संयुक्त आंदोलनाच्या जोरावर, हे सर्व हेतू सिद्धीस नेण्यात येतील.

कामगारांशी, शेतकऱ्यांशी आणि जनतेच्या सरंजामशाहीविरोधी, साम्राज्यशाहीविरोधी आणि लोकशाहीवादी विभागांशी घडवून आणलेल्या कामगारवर्गाच्या विशाल मोर्चावर आधारलेला, अशाच प्रकारचा एक कार्यक्रम भारतीय कम्युनिस्ट पक्षाने तयार केला आहे. राष्ट्रीय लोकशाही सरकारची स्थापना करून 'प्रगती, सांस्कृतिक वाढ आणि स्वातंत्र्य' यांच्या प्रशस्त मार्गावर देशाला नेणे हा या कार्यक्रमाचा हेतू आहे.

समाजवादाच्या मार्गावरील पहिले पाऊल या नात्याने, जनतेच्या लोकशाहीची स्थापना करण्याच्या ध्येयाने आखण्यात आलेले कार्यक्रम इतरही अनेक देशांच्या कम्युनिस्ट पक्षांनी तयार केले आहेत.

अशा रीतीने जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली मार्क्सवादी विचारधारा कामगारवर्गाला अशा प्रकारच्या कार्याची प्रेरणा देण्यात समर्थ ठरली आहे की, तिच्यामुळे आजच्या जागतिक परिस्थितीत तो अतिसहजतेने व जलद गतीने समाजवादी समाज अस्तित्वात आणू शकेल.

युद्धविरोधी शांतता आघाडी

परंतु साम्राज्यवादी देशांतील मक्तेदार भांडवलदारांच्या गटांनी तिसरे जागतिक महायुद्ध पेटविण्यासाठी चालविलेल्या खटाटोपाला शह देण्यात कामगारवर्ग व त्याचे सहकारी यशस्वी झाले, तरच वर निर्देश केलेल्या विकासाची शक्यता आहे.

या युद्धाची तयारी करीत असताना अमेरिकेच्या मक्तेदार भांडवलदारांनी आपल्या प्रचंड उत्पादन साधन-सामुग्रीचा आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात व नंतर साठवलेल्या महाप्रचंड नफ्याचा वापर करून साम्राज्यवादी ब्रिटन व फ्रान्ससहित सर्व भांडवलदारी देशांवर आपली आर्थिक व राजकीय पकड बसविली. संयुक्त राष्ट्रसंघात हुकमी बहुमत प्रस्तापित करून त्यांनी कोरियातील आक्रमक युद्धात त्याचा हत्यार म्हणून उपयोग केला. त्यांनी पश्चिम युरोपातील भांडवलदारी देशांना उत्तर अटलांटिक लष्करी करारात सामील करून घेतले आणि अमेरिकन सुप्रीम कमांडर्सच्या अधिकाराखाली त्यांची प्रचंड लष्करे एकत्रित केली. त्यांनी जर्मनीचे विभाजन केले आणि पश्चिम जर्मनीत नाझींना व जपानमध्ये प्रतिगाम्यांना पुनः शस्त्रसज्ज करण्याची धडपड केली. त्यांनी जगभर युद्ध-तळ व्यापले व त्यात ब्रिटनमधील डझनवारी युद्धतळांचाही समावेश आहे. त्यांनी त्यांच्या या दोस्त-संघातील आपल्या जी–हुजूर भागीदारांना समाजसत्तावादी देशांशी व्यापार करण्यास बंदी केली आणि त्यांच्या बाजारपेठा खिळखिळ्या केल्या.

या परिस्थितीत अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या नियंत्रणाखालील सर्व देशांत शांततेसाठी चाललेल्या आंदोलनाची अमेरिकन नियंत्रण व लष्करीतळ यांविरुद्धच्या आंदोलनाशी सांगड घालण्यात आली आणि अशा रीतीने स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या अत्यंत विस्तृत राष्ट्रीय आघाडीच्या उभारणीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

मार्क्सवादी विचारसरणीच्या वर्गीय दृष्टिकोनामुळे कामगारवर्गाला, युद्ध-प्रचाराच्या धुमधडाक्यातही युद्ध पेटविणाऱ्या शक्ती कोणत्या व शांततेसाठी झगडणाऱ्या शक्ती कोणत्या यांचे बरोबर आकलन होते. एका बाजूला साम्राज्य-वादी गट व मुख्यतः अमेरिकन साम्राज्यवादी गट, साम्राज्यविस्तारासाठी आणि समाजवादी राष्ट्रांत पुन्हा भांडवलशाही प्रस्थापित करण्यासाठी आटापीटा करीत आहेत. दुसऱ्या बाजूला ज्यांची प्रगती शांततेवर अवलंबून आहे, अशी समाजवादी राष्ट्रे, स्वातंत्र्यासाठी लढणारी वसाहत राष्ट्रे आणि (अमेरिकेसहित) सर्व भांडवलशाही राष्ट्रांतील बहुसंख्य जनता आहे. (ही जनता नित्य केवळ युद्धाच्या यातनांची आणि युद्धतयारीच्या आर्थिक आणि राजकीय परिणामांची धनी बनते आणि म्हणून ती सतत युद्धाला विरोध करीत असते.)

साम्राज्यवाद्यांनी युद्ध पेटविण्यासाठी चालविलेल्या कारवायांवरून हा निष्कर्ष निघतो का की, भांडवलदारी व समाजवादी राष्ट्रे यांचे शांततापूर्ण सहअस्तित्व अशक्य आहे? नाही, असा निष्कर्ष निघत नाही. कारण दुसऱ्या जागतिक महायुद्धापूर्वीच्या २० वर्षांच्या अनुभवावरून हे दिसून आले होते की, तुलनात्मकदृष्ट्या कमजोर असलेले एक समाजवादी राष्ट्र भांडवलशाही जगाबरोबर शांततेने अस्तित्वात राहू शकले आणि नित्याचे व्यापारी संबंध ठेऊ शकले. बरोबर हीच परिस्थिती आताही शक्य आहे; कारण साम्राज्यवादी अमेरिका अधिक आक्रमक असली, पूर्वीच्या कोणत्याही भांडवलदारी देशांपेक्षा अधिक आतताई असली, तरी आज समाजवादी राष्ट्रे अधिक बलशाली आहेत आणि शांतता-आंदोलन अधिक सामर्थ्यशाली आहे. युद्धखोरीचे धोरण व त्याचे परिणाम भांडवलदारी देशांतील जनतेला दिवसेंदिवस अधिकाधिक स्पष्ट दिसून येत आहेत, त्यामुळे खोट्या प्रचाराचे जाळे तुटून पडत आहे. हे जाळेच पूर्व-पश्चिमेमध्ये असलेला खरा पोलादी पडदा आहे. साम्राज्यवाद्यांच्या योजना हाणून पाडून त्यांना शाततेचा अंगिकार करायला लावण्याइतके सामर्थ्य जनतेच्या अंगी आले आहे. शांततेला आणखीही एक अर्थ आहे आणि तो म्हणजे जनतेच्या लोकशाहीसाठी व समाजवादाच्या विकासासाठी अनुकूल परिस्थिती.

मार्क्सवादाचे विश्वविजयी सामर्थ्य

भांडवलदारवर्गाचे राज्य असलेल्या देशांवर आजही युद्धाचे ढग जमलेले

आहेत. आर्थिक अडचणींनी ते गांजलेले आहेत. त्यांची सामाजिक प्रगती खुंटली आहे. भय व भवितव्याविषयी निराशा यांनी त्यांना ग्रासले आहे.

परंतु ज्या देशांत कार्य मार्क्सवादाप्रमाणे चालते, तेथे युद्धाला स्थान नाही; तेथे उद्योगधंदे व शेतीउत्पादन द्रुत गतीने पुढे धावत आहेत; सामाजिक प्रगतीचा तोच आधार आहे. सोविएत युनियनमध्ये समाजवादाकडून साम्यवादाकडे होणाऱ्या परिवर्तनाच्या पहिल्या खुणा प्रचंड रचनात्मक योजनांच्या रूपाने दिसत आहेत; सुखी व संपन्न भवितव्याच्या आशा व विश्वास तेथील जनतेला स्फूर्ती देत आहेत.

जनतेचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून मार्क्सवादाचा स्वीकार केला म्हणजे मग मार्क्सवादाचे विश्वविजयी सामर्थ्य प्रत्ययास येते, या विधानाची सत्यता वरील दोन जगांच्या चित्रांतील दरसाल वाढत जाणाऱ्या विलक्षण विरोधांतून प्रगट होत आहे.

□ □ □

REFBK-0024929

मराठी ग्रंथ संग्रहालय दादर
३७५५
दा. क्र. २४८२९
शाखा (स्थळ

आमची पुनर्मुद्रणे

मार्क्सवाद आणि भगवद्गीता
एस. जी. सरदेसाई, दिलीप बोस

जमातवाद आणि भारतीय इतिहास-लेखन
रोमिला थापर, बिपन चंद्र

बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप
राहुल सांकृत्यायन, रामविलास शर्मा इत्यादी.

नवी प्रकाशने ।

अर्नेस्टो चे गुएवारा
अनुवादक : दि. वा. फडणवीस

मनुस्मृती : काही विचार
नरहर कुरुंदकर

डॉ. आंबेडकर : विचारमंथन
डॉ. वा. ना. कुबेर

लोकवाङ्मय गृह प्रा. लि., मुंबई ४०० ०२५.